# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ३९** **// स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त//** **दिनांक : ३०/१२/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.३०/१२/२०२० बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त. खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | काळे अमित पांडुरंग |
| देशमुख प्रतिभा गजानन | पाटील कुलभुषण विरभान |
| काळे रेश्मा कुंदन | लढढा नितीन बालमुकुंद |
| चव्हाण ज्योती बाळासाहेब | बरडे नितीन मनोहर |
| बेंडाळे उज्वला मोहन | नाईक प्रशांत सुरेश |
| बाविस्कर किशोर रमेश | शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, उपायुक्त,किरण देशमुख उपायुक्त,प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार, सहा.आयुक्त .श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त.आकाश डोईफोडे व नगरसचिव ,श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्या नेरकर सरिता अनंत तसेच सन्मा.सदस्य श्री.सोनवणे मुकुंदा भागवत यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केला आहेत.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्या नेरकर सरिता अनंत तसेच सन्मा.सदस्य श्री.सोनवणे मुकुंदा भागवत यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केले आहेत.

मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे दि.०९ सप्टेंबर २०२० नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सभा जे आहे व्हिडिओ कॉन्फ्रन्सींगद्वारे घेणे असे सुचना होत्या. त्यानुसार जळगांव महानगरपालिकेने सभा ह्या व्हिडिओ कॉन्फ्रन्सींगद्वारे घेतलेल्या आहेत. तद्नंतर उक्त मा.अवर सचिव, नगर विकास विभाग यांचे दि.२१ डिसेंबर २०२० चे पत्र प्राप्त झालेले असुन ते सर्व सन्मा.सदस्यांना वितरीत करण्यात आलेले आहे. सदर पत्रामध्ये महानगरपालिका / नगरपरिषदा /नगरपंचायतच्या स्थायी समिती व वैधानिक समित्यांच्या बैठका या प्रत्यक्ष सहभागाने आणि उपस्थितीने घेणेबाबत त्यांनी मान्यता दिलेली आहे. कोविड-१९ संदर्भातील विहित कार्यपध्दतीचे पालन करुन सदर बैठकांमध्ये मास्कचा वापर, योग्य शारिरीक अंतर ठेवणे, हातांची स्वच्छता, सर्दी व खोकतांना घ्यावयाची काळजी, बैठकीसाठी पुरेशी शक्यतो मोकळी हवेशीर जागा, सॅनिटायझरचा वापर यानुसार सुरक्षित अंतरावर बैठक व्यवस्था करुन सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या सुचनांचे / निर्देशांचे तंतोतंत पालन करणेबाबत सदर पत्रामध्ये निर्देश दिलेले आहे. तर सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करण्यात येते की, या पत्राची सर्वांनी नोंद घ्यावी.

**मा.सभापती :-** जवळ जवळ नऊ महिन्यापासुन कोरोनाच्या काळामध्ये आपण स्थायी समितीची सभा ही ऑनलाईन घेत आलेलो आहे शासन निर्देशानुसार आणि त्या काळात नेटचा प्रॉब्लेम असेल, काही तांत्रिक अडचणींमुळे सदस्यांना संपर्काच्या समस्यांना तोंड द्याव लागत होत आणि आपले जे अजेंडयावरील विषय आहे ते मांडतांना काही अडचणी निर्माण व्हायच्या आणि आज आपल्याला शासनाने ऑफलाईन सभा घेण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. यासाठी इतर महापालिकांसोबतच आपल्या महापालिकेचे नगरसचिव असतील यांनी आयुक्त साहेबांच्या माध्यमातुन वेळोवेळी पत्र व्यवहार करुन पाठपुरावा करुन आपल्या या स्थायीच्या सभा ऑफलाईन घेण्यासाठी विनंती करण्यात आलेली होती. आणि शासनाने ती मान्यता देऊन आज आपली ही पहिली ऑफलाईन पध्दतीने आपण घेत आहोत. मी यासाठी प्रशासनाला धन्यवाद देतो. व आजच्या या ऑफलाईन सभेमध्ये उपस्थित सदस्य असतील, अधिकारी असतील, वृतपत्राचे मिडीयाचे लोक असतील, या सर्वांच मी या सभेमध्ये स्वागत करतो आणि या सभेमध्ये आपल्याला जी परवानगी मिळालेली आहे ऑफलाईन सभा घेण्यासाठी आपण सर्वांनी या सभेच्या प्रत्येक क्षणाचा सदउपयोग शहराच्या विकासासाठी आणि नागरीकांचे जे प्रश्न असतील ते प्रश्न सोडविण्यासाठी आपण उपयोग घ्यावा. अशी मी सर्व सभागृहातील सदस्यांना विनंती करतो.धन्यवाद.

**नगरसचिव :-** विषय पत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.२४/११/२०२० रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** इतिवृत्त कायम करण्यापुर्वी मागील सभेमध्ये विषय क्र.३ याच्यामध्ये जी कुत्रे उचलण्यासाठी जी दोन लोक आहेत. याच्या संदर्भात चर्चा झाली होती. तो विषय आयुक्त साहेबांनी सांगितल होत की, पुढच्या सभेत आपण चर्चा करु. त्यांना कायम कराव अशी मागणी आम्ही सर्व सदस्यांनी केली होती. त्यांना आपण सहा सहा महिन्याच एक्टेन्शन देतो, त्यांना सहा सहा महिने न करता, त्यांना परमंन्ट कराव. यासाठी आम्ही मागणी केली होती. तर आयुक्त साहेब आपण बोललेले होते की, त्या विषयावर चर्चा करु.तर त्याच उत्तर आम्हाला द्याव.

**मा.सहा.आयुक्त श्री.आकाश डोईफोडे :-** आपण ज्यांच्यासाठी मागणी करीत आहे. आपण सन २०१५ मध्ये या दोन व्यक्तींना श्री.अशोक सोनवणे आणि श्री.नंदु नाडे यांना साफसफाई कामगारांमध्ये कायम करणेसाठी प्रस्ताव पाठविलेला होता प्रधान सचिवांकडे, तर त्याचा पाठपुरावानंतर उत्तर ही मिळाल होत की, त्यांनी सांगितल की, असे अनियमित किंवा कंत्राटी पध्दतीने जी काही नियुक्त्या करण्यात आलेली आहेत. या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार आणि वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार आपल्याला या नियुक्त्या करता येणार नाही. तरी एकंदरीत पुन्हा एक वेळेस सर्व महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींचा विचार करावा. अश्या प्रकारचे प्रस्ताव आपल्याकडे पाठवु नये अश्या प्रकारची सुचना त्यांनी केलेली आहे. तर ते पत्र आपल्याला प्राप्त आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** असे प्रस्ताव पाठवु नये अस म्हटल आहे का ?

**मा.सहा.आयुक्त श्री.आकाश डोईफोडे :-** हो. सर्वोच्च न्यायालयाचा येथे संदर्भ दिलेला आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने वेळोवेळी आपण महानगरपालिकेला सुचित केलेल आहे. अश्या प्रकारची माहिती दिलेली आहे. आणि ज्यांच्या नियुक्त्या या कंत्राटीपध्दतीने किंवा अनियमित्त पध्दतीने झालेल्या असतील नियमित करण्यासाठी अश्या प्रकारचे प्रस्ताव यापुढे पाठवु नये अश्या प्रकारचा संदर्भ देण्यात आलेला आहे.

**श्री.नितीन लढढा :-** पाठवु नये असच म्हटल आहे ना, परंतु जर रिक्त पदे असतील तर रिक्त पदांवर यांना जाहिरात करुन यांना सेवेत समावेश करण्याचा प्रयत्न का केला जात नाही. जरी यांच्या नियुक्त्या आपण मानधनावर करतो, सहा सहा महिन्याने खंड देऊन परंतु याला कायदेशीर रित्या राज्य शासन मान्यता देत नाही.परंतु स्वच्छता कर्मचाऱ्यांची रिक्त पदे आहे आपल्याकडे. तर त्याची सरळ जाहिरात करुन या लोकांना संधी देण्याच्या संदर्भात प्रस्ताव का येत नाही. म्हणजे कुठेतरी आपण बघत आहोत की, गेल्या ५ ते १० वर्षापासुन प्रत्येक वेळेला त्या दोन्ही कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संपुर्ण सभागृहाला त्यांच्या संदर्भात सहानुभुती आहे. आणि प्रत्येक वेळेला अश्याच पध्दतीचे आश्वासन मिळतात. म्हणजे आज जो खुलासा झाला. हा जवळपास पाच वर्षापुर्वी खुलासा झाला असता, तर कमीतकमी या पध्दतीने त्या कर्मचाऱ्यांना सेवेत समावुन घेता आल असत. तर तश्या पध्दतीचा प्रस्ताव देता येईल का ?

**मा.आयुक्त :-** मागच्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये हा जो विषय उपस्थित केला होता. माझ्या माहितीप्रमाणे नितीनभाऊंनी हा मुद्दा उपस्थित केला होता आणि याच्या बाबतीमध्ये आपण जो प्रस्ताव पाठविला त्याची सद्यास्थिती सर्व सभागृहाच्या लक्षात आणुन द्यावी. अश्या प्रकारची सुचना दिलेली होती. २०१५ ला त्या वेळेला जसा आपण सहा सहा महिने मानधनावर या कर्मचाऱ्यांच्या कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या करतो तश्या पध्दतीने प्रस्ताव सन २०१५ मध्ये स्थायी समिती मध्ये आलेला होता. आणि या प्रस्तावाला मान्यता देत असतांना तत्कालीन स्थायी समितीने त्याच्या मध्ये स्वत:हुन हा एक विषय उपस्थित केला होता की, यांना कायम करणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवावा. जसा आता सहा.आयुक्तांनी सांगितल तसा त्याप्रमाणे प्रस्तावही आपण पाठविलला होता. परंतु शासनाने अस म्हटल की, अश्या प्रकारच्या जी रोजंदारी,कंत्राटी पध्दतीचे, थोडक्यात विहित पध्दतीचा अवलंब न करता ज्या नेमणुका केलेल्या आहेत. अश्या प्रकारच्या नेमणुका करु नये असा मा.सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. म्हणुन अश्या प्रकारच्या नेमणुका उपयोगी होणार नाही. आणि अश्या प्रकारे तुम्ही केलेल्या ज्या नेमणुका नियमित करणेसाठी राज्य शासनाला तुम्ही मान्यता मिळणेसाठी कुठल्या कायद्याच्या आधारे तुम्ही चुकीचा प्रस्ताव पाठविलला आहे हे स्पष्ट करा. थोडक्यामध्ये शासनाला अस म्हणायच आहे की, अश्या प्रकारचे अधिकार हे महानगरपालिकेला कुठल्याही कायद्याच्या तरतुदीनुसार असु शकत नाही. यामुळेच हे प्रकरण २०१५ पासुन तिथेच थांबलेल आहे. आता आपण जस म्हणत आहे की, गेल्या ५ वर्षामध्ये ही विनंती सभागृहाला का केली गेली नाही हा एक वेगळा विषय आहे. परंतु आता जो सन्मा.सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. तर त्याच्यामध्ये हे जे काही राज्य शासनाच म्हणण आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे अश्या नेमणुका करु नये. तर याची आपल्याला दखल घेऊन जी आपली सुचना आहे की, यांच्या अस्थापना सुचीवरील रिक्त जागा हे जाहिरात पध्दतीने आपण नेहमी

करत असतो. अश्या प्रकारे या लोकांना संधी देता येईल का ? तर आपल्या या सुचनेप्रमाणे परिस्थिती, व्यवहार कायद्याची वैद्यता आम्ही तपासुन बघु आणि त्याप्रमाणे पुढची कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.नितीन लढढा :-** मागच्या १० वर्षामध्ये या सभागृहात प्रत्येक प्रशासकीय अधिकाऱ्याच हेच वक्तव्य ऐकलेल आहे. आणि ते बिचारे कर्मचारी जे काम कोणीच करु शकत नाही. कमीतकमी एक मानविय दृष्टीकोणातुन जरी बघितल ना, त्यांच्यावर खऱ्या अर्थाने अन्याय होत आहे. मेलेले जनावरे ज्यांच्याकडे आपण ढुकुन सुध्दा पाहु शकत नाही किंवा त्यांच्या ५-५० फुटापर्यंत सुध्दा जाऊ शकत नाही. तस काम दैनंदिन ती मंडळी करत आहे. संपुर्ण सभागृहात सत्तेत आम्ही असो की, सत्तेत हे असो. ते असे नाही का की, कुठेतरी आम्हाला न्याय द्या. आणि अश्या पध्दतीने त्यांना न्याय मिळत नसेल, सातत्याने त्यांना अश्याच पध्दतीचे वक्तव्य ऐकावे लागतील. तर मला वाटत हे योग्य नाही. आपण कुठेतरी याची कालमर्यादा निश्चित करा की, साधारणता पुढच्या एक महिन्यामध्ये या संपुर्ण विषयाची कायदेशीर जो काही अभ्यास असेल तो परिपुर्ण करुन त्यांना संधी देता येत असेल तर निश्चित मी म्हणतो, तश्या पध्दतीची जाहिरात काढावी, आणि त्यांना संधी देऊन त्यांना कमीत कमी न्याय द्यावा.

**मा.आयुक्त :-** पुढील एक महिन्यात जर काही कायदेशीर अडचणी येत नसेल कुठलेही न्यायालयाच्या निर्णयाची अडचणी येत नसेल, मग आपण म्हणतो आहे, त्या सुचनेचा आपल्याला विचार करता येईल. तर ही प्रक्रिया किंवा निर्णयापर्यंतची कार्यवाही पुढील दोन महिन्यामध्ये आपण करुन घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** परंतु कुठेतरी सकारात्मक दृष्टीकोण ठेवा. बघा कस असत. सकारात्मक दिशेने जायच आहे तर सकारात्मक दिशेने जाईल आणि नकारात्मक दिशेने काम केल तर प्रकरण नकारात्मक दिशेने जात. तर मला वाटत की, आपणास विनंती आहे दोघ कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तुम्ही खरच त्यांच कार्य बघाल निश्चितपणे मी म्हणतो की, दया येते आणि मला सांगा रु.१०,०००/- च्या मानधनावरती इतक घाणेरड कृत्य त्यांच्याकडुन करुन घेणे हे सुध्दा आपल्या बुध्दीला पटत नाही. कमीतकमी त्यांच्या या मेहनतीचा योग्य मेहनताना त्यांना मिळायला पाहिजे. या संपुर्ण बाबींचा विचार करुन पुढच्या दोन महिन्यात आजची तारीख लिहुन घेतो. पुढच्या दोन महिन्यात आम्हाला परिपुर्ण त्याच्या संदर्भातला प्रस्ताव या सभागृहासमोर चर्चेसाठी आणावा.

**मा.आयुक्त :-** अनेक वर्षापासुन काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्याबाबतीत सहानभुती प्रत्येकाला आहे, मानवता प्रत्येकाला आहे. पण तसा त्यांना न्याय देत असतांना कायद्याची चौकट आपल्याला कशी पाळता येईल ते आपण बघु या. त्याची व्यवहारीकता आपल्याला योग्य वाटली तर पुढे आपल्याला त्याचा निर्णय घेता येईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, २४/११/२०२० रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** १५ व्या केंद्रीय वित्त आयोग निधी प्राप्त अनुदान व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चिती बाबत पारित शासन निर्णयाची माहिती घेणे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, आयुक्त साहेब, १५ व्या वित्त आयोगाची माहिती घेणे आधी १४ व्या वित्त आयोगाबद्दल बोलायच आहे. १४ व्या वित्त आयोगाची पुर्ण रक्कम संपली की काय ? काय केल तुम्ही ? त्याच्या बद्दल माहिती द्या किती होत ते. आणि मग आपण १५ व्या वित्त आयोगाबद्दल बोलु. काय काय काम आपल्याला ठरवायचे आहे त्याच्या बद्दल.

**मा.मुख्यलेखा अधिकारी, श्री.कपील पवार :-** १४ व्या वित्त आयोगामध्ये एकुण शिल्लक निधी ४० कोटी पर्यंत आहे. १४ व्या वित्त आयोगामध्ये दोन प्रकारे आपण याला खर्च केला होता. एक मुलभुत अनुदान ते आपल्याला मंजुर होत दर वर्षाला,या मुलभुत अनुदानामधुन आपण ५०% जे होते ते आपण स्वच्छता, शौचालय आणि वनिकरण याच्यावर खर्च करु शकत होतो आणि उर्वरित ज्या बाबी दिलेल्या आहे शासनाने स्वच्छतेच्या रिलेटेडच होत्या. चिन्हांकित आणि अचिन्हांकित अश्या दोन बाबींवर खर्च होत होता. आणि आता ४० कोटी शिल्लक आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** ४० कोटी शिल्लक आहे आणि खर्च किती झाला.

**मा.मुख्यलेखा अधिकारी, श्री.कपील पवार :-** एकुण आपल्याकडे ११६ कोटी रुपये आले होते आणि त्या ११६ कोटी पैकी आता आपल्याकडे ४० कोटी उरलेले आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** पण या ४० कोटी मधुन पण खर्च करता येईल ना आपल्याला.

**मा.मुख्यलेखा अधिकारी, श्री.कपील पवार :-** स्वच्छतेच्या बाबतीत जे काही देयक आहे ते आता त्याच्यातुन अदा होत आहे. शौचालयाच्या संदर्भात असतील, त्याच्यात जे जे आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** ठिक आहे आता १५ व्या वित्त आयोगाबद्दल तुम्ही काय नियोजन केलेल आहे कारण आपल्याला केंद्राकडे हे पाठवायच आहे ना की, आताचा निधी आपल्याला किती मिळालेला आहे, १६ कोटी आहे वाटत,

**मा.मुख्यलेखा अधिकारी, श्री.कपील पवार :-** १४ व्या वित्त आयोगामध्ये फक्त मुलभुत अनुदान येत होत आणि त्याची दोन बाजु होती. ५०% आणि ५०% आता शासनानेच अशी सुविधा करुन दिलेली आहे. मुलभुत अनुदान आणि बंधनकारक अनुदान, आपल्याला मुलभुत अनुदान हे ६.८० कोटी आलेला आहे आणि बंधनकारक अनुदान हे ६.८८ कोटी आलेला आहे. मुलभुत अनुदान म्हणजे नेमक काय आणि बंधनकारक अनुदान म्हणजे काय ते सांगतो. बंधनकारक अनुदान दोन गोष्टीवर खर्च करता येणार आहे. एक (Soild Waste Management म्हणजे घनकचरा व्यवस्थापन याच्यावर खर्च करणार आहे आणि दुसर Drinking Water पिणेच्या पाण्यावर खर्च करणार आहे. Drinking Water म्हणजे तरतुद अश्या दिलेल्या आहेत. Recycling of water म्हणजे वापरलेल पाणी परत वापरु शकतो आपण. आणि दुसर Rain Harvesting म्हणजे जे पाऊसाच पाणी पडत त्याच संवर्धन करणे अश्या बाबींवर बंधनकारक अनुदान खर्च करु शकतो आणि मुलभुत अनुदान मध्ये तीन मुख्य बाबी दिलेल्या आहेत. एक विज बिल आपण त्याच्यातुन भरु शकतो. त्याच्यात फक्त जे दंड लागलेला आहे ते वगळुन. त्यानंतर मनपाचा हिस्सा कुठे वर्ग करायचा असेल एखाद्या योजनेमध्ये तर मनपाचा हिस्सा वर्ग करु शकतो. तिसर मनपाच जर काही कर्ज असेल तर ते कर्ज आपण त्याच्यातुन भरु शकतो. अस आपल्याला हे आलेल आहे. आता याच्याबाबतीत नियोजन हे महासभेने करायच असत. आणि नियोजन केल्यानंतर प्रशासकीय मान्यता देणेचे पुर्ण अधिकार हे आयुक्त साहेबांना असता. आणि आपल्याला २०२०-२१ साठी जे निधी भेटलेल आहे. तर त्या निधीसाठी आपल्याला कोणतेही निकष नव्हते मात्र सन २०२१-२२ साठी जो निधी भेटलेला आहे. त्यास निकष दिलेला आहे. त्या निकषांची जर आपण पुर्तता करत गेलो. तरच आपल्याला ती ग्रँट मिळत राहणार आहे. त्याच्या संदर्भातच आम्ही उद्या बैठक लावलेली आहे सर्व विभाग प्रमुखांची.

**सौ.ज्योती चव्हाण :-**बरं. घनकचऱ्याच सेपरेट निधी पण आलेला आहे आपल्याकडे. आणि याच्यात ही वापरु शकतो.

**मा.मुख्यलेखा अधिकारी, श्री.कपील पवार :-** आता शासनाने तरतुद केलेली आहे की, घनकचरा व्यवस्थापन मध्ये हे खर्च दाखविण्यात येणार आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-**तो सर्वात महत्वाचा मुद्दा आहे घनकचरा, घनकचऱ्याच डि.पी.आर.पण मंजुर काय आहे. ते पण राहिलेल आहे. ते बघाव लागेल. आणि डि.पी.आर. मंजुर नाही झाल तर मासिक दंड पण भरावा लागणार आहे. तुम्ही त्याच्या बद्दल काही माहिती घेतली आहे का तुम्ही ? डी.पी.आर.मंजुर नाही म्हणुन आपल्याला दर महिन्याला दंड भरावा लागणार आहे. मी अशी माहिती घेतलेली आहे. जर १४ व्या वित्त आयोगातुन आपल्याला खर्च करता येत आहे तर ते पेंडींग का आहे?

**मा.आयुक्त :-** हे दंड कशा बद्दल म्हणत आहात आपण?

**सौ.ज्योती चव्हाण :-** डी.पी.आर. मंजुर नाही घनकचऱ्याचा, तीन वर्ष झाले तो निधी पडुन आहे आपला.

**मा.आयुक्त :-** नाही, नाही.

**सौ.ज्योती चव्हाण :-** नॅशनल ग्रीन ट्युब त्याच्यानुसार ते आहे आपल, आणि मासिक दंड जो आहे जवळ जवळ १० लाख आपल्याला भरावा लागणार आहे. माहिती मी घेतलेली आहे त्याच्यातली.

**मा.आयुक्त :-** तुम्ही बसा, मी सांगतो. आता आपला जो डि.पी.आर. आहे तो खुप जुना आहे. घनकचरा व्यवस्थापनाचा आपला जो डि.पी.आर. होता तो ३२ कोटीचा मंजुर आहे. त्याच्याप्रमाणे निधी आला. त्याची एजन्सी आपण नेमली. त्याच काम काही अंश प्रगती पथकावर आहे. आता त्याच्या मध्ये जी होणारी वाढ आहे. त्या वाढीच्या बद्दलचा आपला सुधारीत ४९ कोटीच्या खर्चाचा डि.पी.आर. आपण मागच्या ऑनलाईन महासभेमध्ये मंजुर करुन घेतलेला आहे. आणि तो तांत्रिक मान्यतेनंतर शासनाकडे जाईल. डि.पी.आर. मंजुर आहे. डि.पी.आर. मंजुर

नाही म्हणुन दंड काहीच लागणार नाही. दुसरा जो विषय आहे जो आपण NGT च मांडल. तर नॅशनल ग्रीन ट्रब्युनल जे आहे. तर त्याची काही रुपरेषा आहे. त्याच्या प्रमाणे आपल्या शहरात जमा होणार जो काही घनकचरा आहे किंवा आपल Sewage water म्हणजेच सांड पाणी या दोन्हीवरती प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावली जाईल. आणि ही जर प्रक्रिया करुन आपण विल्हेवाट लावली नाही. तर आपल्याला इन्व्हायर्नमेंट टॅक्स खाली इन्व्हायर्नमेंट सेल MESP प्रमाणे आपल्याला काही दंड होऊ शकतो. तो सर्व स्वराज्य संस्थांबाबतीत लागु आहे. त्याच डि.पी.आर.शी काही संबंध नाही. परंतु कचरा हा प्रक्रिया करुनच त्याची विल्हेवाट लावली पाहिजे. जे आता आपण डंपींग करत आहोत ती योग्य नाही नियमाला धरुन नाही. दुसरी गोष्ट जे आपल शहरामधील सांड पाणी आहे त्यावर आपण कुठलीही प्रक्रिया न करता नाल्यामध्ये सोडतो आणि ते पुढे नदी मध्ये जात. तर हे ही इन्व्हार्नमेंट ॲक्टला सोडुन आहे. तर या दोन्ही विषयांच्या बाबतीत आपल्याला प्रक्रिया प्रकल्प उभे करावे लागणार आहेत. त्याच्या करीता आपल्याला शहराच्या मध्यवर्ती भागात साधारण ५५ ते ६० टक्के लोकसंख्या ठरवली अश्या एरियासाठी आपण भुयारी गटार प्रक्रिया राबवत आहोत. असही ट्रिटमेंट प्लॅन्ट त्याच्यामध्ये आहे. ज्याच्यामध्ये सांड पाण्यावर प्रक्रिया होणार आहे. आणि ते प्रक्रिया केलेल पाणी आपण शेतीलाही देऊ शकतो किंवा मागणी नाही आली तर ते आपण कुव्यांमध्ये ही सोडु शकतो. प्रक्रिया केलेल असल्यामुळ त्याच्यावर ॲबजेक्शनही येणार नाही. उरलेला जो शहराचा भाग आहे की, ज्याच्यामध्ये आपण भुयारी गटार घेऊ शकत नाही. त्याच्यासाठी दुसऱ्या टप्प्यामध्ये राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवुन शहराच्या उर्वरीत लोकसंख्यासाठी भुयारी गटार प्रस्ताव करुन घ्याव लागल तरच आपल्याला शहरामध्ये निर्माण होणारा १००% सांड पाणी हे आपल्याला प्रक्रिया करुन त्याच पुर्ण वापर करता येईल किंवा नाल्यामध्ये सोडता येईल. दुसरी गोष्ट आपला जो घनकचऱ्याचा प्रकल्प आहे. त्याच्या मध्ये आपण कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी मेकॅनिकल कम्पोस्टींगचा प्लॅन्ट अपेक्षित आहे. ज्या आवारामध्ये कचरा डेपो प्लॅन्ट उभारला जातो, पुर्वी कचरा साठवलेली डंपींग साईट आहे. ही डंपींग साईट जी आहे ती क्लियर झाल्यानंतर त्याच्या ठिकाणी आपल्याला कंपोस्टींगचा प्रकल्प उभारायचा आहे. त्यासाठी आपल्याकडे स्वतंत्र जागा आहे. त्याच्यासाठी आता जे बायोमाईनींगचा प्रकल्प चालु आहे तो बायोमाईनींगचा प्रकल्प पुर्ण झाला, आता पर्यंत आपण जे काही कचरा वर्षानुवर्षापासुन आपण तेथे डंप केलेला आहे. त्याच बायोमाईनींग करुन त्याच्यावर पुर्ण वेगळ केल की, ती साईट क्लियर होईल आणि मग त्या साईटवरती आपल्याला कंपोस्टींगचा प्रकल्प सुरु करता येईल. त्यामुळे एकच जागेवरती बायोमाईनींगनंतर आपल्याला हे काम करायच आहे. बायोमाईनींगच जे काम आहे ते पहिल्या टप्प्यात पर्यंत काम पुर्ण झालेल आहे. साधारण ७० ते ८० हजार घनमिटर ऐवढा कचरा युनिट पुर्ण झ ाालेल आहे. जवळपास १ लाख घनमिटर ऐवढा कचरा तेथे आहे. त्याच्यासाठी सुध्दा जो प्रकल्प आहे. तो जर आता सुरू करायचे म्हंटले तर याच्यासाठी सुध्दा आपण तिन कोटींची तरतुदीची मागणी केलेली आहे शासनाला, ती जर मंजुर झाली तर आपल्याला पुर्ण बायोमाईनींगच प्रकल्प पुर्ण करुन जुन्या कचऱ्याची आपल्याला विल्हेवाट लावता येईल. आणि ती साईट क्लियर करुन आपल्याला तेथे घनकचऱ्याचा प्रकल्प उभारता येईल. अर्थात याला काही वेळ लागणार आहे. निधीची उपलब्धता होणे गरजेच आहे. आणि याबाबत आपण वेळोवेळी प्रदुषन नियंत्रण मंत्रालय असेल, राज्य शासन असेल. राज्य हरीत विभाग असेल राज्य शासनास आपण याची वस्तुस्थिती कळवत आहोत. आता याच्यामध्ये शासनाच्या सुचनेप्रमाणे आपल्याला प्रक्रिया प्रकल्प सांड पाणी असेल किंवा घनकचरा असेल हे लवकरात लवकर पुर्ण करुन देणे गरजेचे आहे. आणि त्याची कार्यवाही आपण महानगरपालिकेमार्फत करतो.

**श्री.नितीन बरडे :-** हे किती दिवसापुर्वी केले होते.

**मा.मुख्यलेखा अधिकारी, श्री.कपील पवार :-** १४ व्या वित्त आयोगाचा जो निधी होता त्या निधी अंतर्गत हे काम झालेले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मागच्या वर्षी जी कामे केले, शौचालय दरुस्ती केली होती आपण, दार दुरुस्त केले होते आणि इतर ही कामे केले होते. वर्षापुर्वी केलेले कामं, आज तेथे दिवाबत्ती बंद आहे, जे आपण हायमस्ट लावलेले आहे, त्याच्यावर दिवाबत्ती बंद आहे. दार अक्षरश: तुटलेले आहे. आणि शौचालयाची हालात तुम्ही बघितली तर अत्यंत खराब झालेली आहे. शौचालयसाठी नागरीक बाहेरच येऊन राहिले. कुठुन तुमच उद्दिष्ट पुर्ण होत आहे. लाईट दोनच महिन्यात बंद पडलेले आहे. दारावर असे बारीक बारीक स्क्रु लावलेले आहे, आपल्या घरात टिकत नाही तर ते सार्वजनिक ठिकाणावरील कसे टिकतील. बारीक स्क्रुवर कस काय टिकतील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सन २०१९-२० चे जो नितीन भाऊ सांगत आहे खर्च झालेला आहे, तर बरोबर बोलत आहे भाऊ. खर्च झालेल आहे, ४० कोटी शिल्लक म्हणत आहे. तो तुम्ही कोणत्या विकासावर १४ व्या वित्त आयोगाचा खर्च केला. त्याची माहिती ते विचारत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** त्याच्यानंतर त्याच्यावरती कोणी बघितल का, बिले काढुन मोकळे झालेले आहे, बिल झाल आम्हाला टक्केवारी भेटली, इतके टक्के संरक्षण झाल खुप झाल, पण आज परिस्थिती काय ? समता नगर मधील तीन शौचालयांची परिस्थिती ती आहे.

**श्री.नितीन लढढा :-** हे खरे अर्थाने जो उद्दिष्ट आहे स्वच्छ भारत अभियानचा मुळात त्याला काळिमा फासला जात आहे. म्हणजे निधीच खर्च होत आहे परंतु कालांतराने त्याला लागणारा मेनटेनन्सचा पार्ट जो असेल, तो जर होत नसेल वेळेवरती तर मला सांगा, त्या एरियातील त्या नागरीकांनी त्या शौचालयात प्रवेश कसा करावा. आणि पर्यायाने ते नागरीक पुन्हा उघडयावर बसतात. ठिक आहे, आपल्याला मनाला समाधानसाठी टिम येते. कुठल्या पध्दतीने आपण त्याच्याकडुन सर्टीफिकेशन करुन घेतो तो एक भाग वेगळा आहे. परंतु खऱ्या अर्थाने जर मनाला विचारल की, खऱ्या अर्थाने स्वच्छ भारत अभियानाच उद्दिष्ट पुर्ण होत आहे का ? त्याच उत्तर नाही आहे साहेब, म्हणजे खर्च करतांना मोठया प्रमाणात ही खर्च केला जातो. परंतु कालांतराने त्याची जी दुर्दशा होते. त्याच्याकडे डुंकुन कोणी .पाहायला तयार नाही. आणि त्या वेळेला नगरसेवकांकडे सामान्य नागरीक तक्रार करतो, नगरसेवक प्रशासनाकडे तक्रारी करत असतो, परंतु नगरसेवकांच्या तक्रारीकडे प्रशासन अक्षम्य दुर्लक्ष करतो, हे योग्य नाही, काम कमी झाल चालेल, पण काम गुणवत्तापुर्वक पाहिजे. व्यवस्थीत पाहिजे आणि ज्या ज्या वेळेला त्याला डागडुगीची गरज असेल, पथदिवे बदलण्याची गरज असेल, पोल लावण्यावरती आणि पथदिवे लावण्यावरील आपण लाखो रुपये खर्च करुन टाकतो. परंतु कालांतराने ते पथदिवे सुरु आहे की नाही याची मात्र प्रशासन काळजी घेत नाही. सन्मा.सदस्य पोटतिडकीने याच्यावर चर्चा करतात. तरी सुध्दा त्याच्यामध्ये खुप काही त्याचे परिणाम जाणवतात. असली वस्तुस्थिती नाही. याला कुठेतरी गांभिर्याने विचार करायला पाहिजे साहेब.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझ्या वार्ड क्र.१ ला तसच आहे वार्ड क्र.२ ला तसच आहे.

**मा.सभापती :-** मला वाटत, सन्मा.सदस्य पोटतिडकीने आपल्याकडे तक्रारी मांडतात, मला वाटत प्रशासन त्याच्याकडे दुर्लक्ष करत आहे. आता नितीनभाऊ बरडे मला वाटत दोन तीन मिटींग झाली तोच विषय आहे.

**श्री.नितीन बरडे :-** तार तुटलेले आहे साहेब, कोणी गेल नाही तेथे रिपेरींगला,

**मा.सभापती :-** कोण आहे अधिकारी त्यांनी खुलासा करावा त्यांच्या विषयाचा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आयुक्त साहेब, माझी एक सुचना आहे.

**मा.सभापती :-** एक मिनीट ताई, त्यांच उत्तर होऊन जाऊ द्या.

**सौ.ज्योती चव्हाण :-** त्याच विषयावरती आहे. आपण जेव्हा काम देतो, ते वर्षात दोन वर्षात पुर्ण होत. ते पुर्ण झाल्यावर त्याला तुम्ही काही कालावधी द्या पुढच्या तीन वर्षापर्यंत आम्हाला हे काम अश्या स्थिती मध्ये दिसलच पाहिजे. काही तरी मेनटेनन्सचा भाग म्हणुन तुम्ही ते राखुन ठेवला पाहिजे. मला तुम्हाला ही सुचना करायची आहे. कारण काय होत तो ठेकेदार काम करून निघुन जातो. त्याची गुणवत्ता खरच कामात राहत नाही. कुठेतरी ५-६ महिन्यात ते सर्व काम खराब होत. तो पर्यंत त्याचा सर्व पैसा निधी निघुन गेलेला असतो. त्याच्यामुळे अशी जर काही तरतुद करता आली तर १५ व्या वित्त आयोगाचे कामे घेतांनाच आपण करुन ठेवा.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती साहेब, शहर अभियंता येऊन गेले, उपमहापौरांचा दौराही झाला. आहे तेथे जाण्यासाठी रस्ता नाही नागरीकांना, टॉयलेट तयार होऊन पडलेले आहे. ते फाईल आपल्या टेबलवर येऊन पडलेल आहे. आणि ४० कोटी रुपये शिल्लक आहे आणि त्याची मुदत दि.३१ मार्च २०२१ पर्यंतच आहे.

**मा.आयुक्त :-** जे दुरुस्तीच काम असेल त्याचा दर्जा आणि दुरुस्तीच काम झाल्यानंतर पुढील एक वर्ष त्याची देखभाल दुरुस्ती करणे, आता याच्यामध्ये इंजिनिअरींग डिपार्टमेंट जे आहे विद्युत असो किंवा बांधकाम असो. त्यांनी आता खुलासा करा, काम करत असतांना त्याचा व्यवस्थीत दर्जा कुठ पर्यंत आहे, कशी सुपरव्हिझन केली गेलेली आहे. ते योग्य होत. दुसरी गोष्ट हे काम केल्यानंतर हे काम कायम स्वरुपी राहील का ? आणि विशेष सार्वजनिक शौचालय जर असतील तर अशी पध्दत बरोबर नाही. त्याच वारंवार आपण मेनटेनन्स केल पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की, सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, सार्वजनिक सोईसुविधांचा सुध्दा वापर नागरीकांकडुन कालमर्यादेने केला जाईल, त्याची सुरक्षा, संरक्षण व्यवस्थीत केल जाईल या बाबतीत नगारीकांना जनजागृती त्या भागातील जी वापर करणारे लोक आहे त्यांना करणे गरजेचे आहे. सार्वजनिक मालमत्ता म्हटल्यानंतर त्याची जबाबदारी कोणावरच नाही अस म्हटल्यानंतर ही सर्व साधारण जनतेवर असते. जर एखादी सुविधा द्यायची, विद्युत व्यवस्था केली असेल, बल्ब लावायच असेल सर्व केल असेल परंतु कालंतराने त्याची मोडतोड होते. जाणुनबुजुन काही

कोणी तोडत असेल, काही ठिकाणी चोऱ्याही झाल्या असणार. आपल्याकडे रिपोर्ट त्याचा आहे. या बाबतीत आपल्याला नागरीकांचा थोडा सहभाग घेता आला पाहिजे. कारण सुविधा पुरविणे सोपे आहे पण ते सांभाळण मेनटेन करन फार महत्वाच आहे. आपली जी जबाबदारी आहे ती आपल्याला पाडावीच लागेल. परंतु यात नागरीकांना सुध्दा विनंती करावी लागेल. आता हे काम होत असतांना त्याच्या दर्ज्याच्या बाबतीत जर काही तक्रारी असतील तर सुपरव्हिझन करणारे इंजिनिअरने त्याच्या बद्दल सांगाव. जस आता नितीनभाऊ म्हणत आहे. खुप बारीक स्क्रु बसविलेल असत. अस जर असेल तर ते दरवाजा किती दिवस टिकेल हे इंजिनिअरने सांगाव.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब, आम्ही नागरीकांना खुप जागृत केलेल आहे. नागरीक त्याच परिस्थितीत आहे. लाईटांचा विषय सांगतो तुम्हाला आम्ही खाली लाईट लावलेले नाही. किंवा संडास बाथरुमला लाईट लावलेले नाही. पोलवर लाईट आहे. एकही माणुस चढु शकत नाही त्याच्यावर ते लाईट कसे काय बंद झाले. तेथे कोणी तोडले, मी तुम्हाला स्क्रुच सांगितल. तुम्ही सादा लोंखडी एवढुसा स्क्रु लावतात. तो आपल्या घरात टिकत नाही तो सार्वजनिक ठिकाणी कस काय टिकेल. तुम्ही दर्ज्याबद्दल सांगितल मला, तुम्ही आल्यापासुन पहिल्या दिवसापासुन आजपर्यंत जेवढे आयुक्त आले माझ्या येच्यात प्रत्येक आयुक्त साहेबांना मी दर्ज्याबद्दल विनंती केली आहे. प्रत्येक आयुक्त साहेबांना दर्ज्याबद्दल विनंती केली आहे. गटारी असो, रस्ते असो की, हे अस प्रकरण असो. कोणत्या अधिकाऱ्यांनी दर्ज्याबद्दल काळजी घेतलेली आहे ते सांगा मला.

**मा.शहर अभियंता, श्री.भोसले :-** प्रत्येक कामाची पाहणी करुन ती जबाबदारी मी घेतो.

**श्री.नितीन बरडे :-** आज ते बंद आहे. याच काय ?

**श्री.नितीन लढढा :-** याच्यापुर्वी प्रशासन जबाबदारी स्विकारत नव्हत अस तुमच्या बोलण्यावरुन जाणवत.

**श्री.नितीन बरडे :-** त्यांच बोलण्याचा उद्देश व्यक्तीश: आहे.

**मा.शहर अभियंता, श्री.भोसले :-**मी स्वत: पाहुन खात्री करुन, करुन देतो.

**मा.आयुक्त :-** नितीनभाऊ आपला मुद्दा लक्षात आला. आता आपले जे काही आक्षेप असेल, टॉयलेट मधील पाईपाच किंवा लाईटच विषय असेल, तर त्याच पाटील स्वच्छ भारत अभियानांतर्गत त्याची पाहणी करुन इस्टीमेट काय असेल बनवुन घ्या. आपल्याला कोणाच्या समाधानाची गरज नाही, आपल्याला नागरीकांच्या समाधानाची गरज आहे. टीम येईल पाहीन सर्टीफिकेशन होत राहील. परंतु नागरीकांकडुन मिळणार जे प्रामाणिक मत आहे ते आपल्यासाठी आज महत्वाच आहे. आपल्याला येणाऱ्या एजन्सीकडुन सर्टीफाईड होण्यापेक्षा त्या भागातील लोकप्रतिनिधी आणि नागरीकांच जर प्रमाणपत्र मिळाल तर ते आपल्यासाठी गरजेच आहे. तर त्याप्रमाणे आपल्याला दुरुस्तीचा प्रॉब्लम आहे. ती दुरुस्ती तातडीने करुन घ्या. आता आपण नविन हेड खाली शौचालय व्यवस्था व दुरुस्तीचा ठेका १० वर्षापुर्वी दिला होता याच्या बाबतीत. आताची निविदा प्रक्रिया जी होईल. त्याच्यामध्ये नविन गोष्ट आम्ही ॲड केली की, प्रत्येक पर्सन टॉयलेटच्या शेजारी एक अटेंडन्टची रुम असते. आणि अटेंडन्टची रुम याच्यासाठी की, तो त्याची साफसफाई करेल देखरेख करेल, चोरी वगैरे होत असेल तर त्याच्यावरती थोडसा आळा बसेल. म्हणजे जेणे करुन त्या पब्लीक प्रॉपर्टीच रक्षण होईल, नागरीकांना सुध्दा त्यांच थोड गांभिर्य जाणुन घेता येईल.ही एक कल्पना आपण त्याच्यात ॲड करत आहे. एक अटेंडन्ट जर प्रत्येक ठिकाणी ठेवायची व्यवस्था केली तर आपण त्याला खोलीही त्याच्या बाजुला देऊ. तो दोन्हीही करेल, साफसफाई आणि त्याची देखरेख. आता तातडीने त्याच मेनटेनन्स करुन घ्या आणि स्वच्छतेच्या बाबतीमध्ये जो पर्यंत नविन एजन्सी येत नाही जुन्या एजन्सीच आपल काम चालु राहणार आहे. आता बरडे भाऊंनी जसे सांगितले, लोक उघडयावर शौच करायला जातात. आता आपण ODF+ म्हणुन शहराला रिमार्क मिळविलेला असतांना कोणी उघडयावर जाणार नाही आणि असे प्रकार दिसणार नाही. त्याच मेनटेनन्स त्याची स्वच्छता हे दोन्हीही आपली जबाबदारी आहे. जर शौचालय चांगल्या अवस्थेमध्ये असेल तर त्याचे नागरीक निश्चित वापर करतील. तर कोणालाही उघडयावर जाण्याची आवश्यकता राहणार नाही. जर तेथे सोई व्यवस्थीत नसेल तर नागरीकांना नाईलाजाने उघडयावर जाव लागेल. अशी परिस्थिती उद्‌भव नये असे मी सर्वांना सांगेल, बांधकाम आणि विद्युत विभाग तातडीने याच नियोजन करा आणि कायम स्वरुपी हे पाळा. याच्यावर एका वर्षी लक्ष दिल आणि दुसऱ्या वर्षी दुर्लक्ष केल अस होऊ नये. याबद्दल कोणत्याही सन्मा.सदस्याला विषय उपस्थित करण्याची वेळ येऊ नये. तुमच्या प्रत्येक वार्डात इंजिनिअर आहे, सॅनिटरी इन्स्पेक्टर आहे, मुकादम आहे यांच्याकडुन तुम्ही आढावा घेतला पाहिजे. आणि दुरुस्ती केली पाहिजे. दुरुस्तीच्या कामामध्ये निधीची अडचण येत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब, तुटलेले दरवाजे नागरीकांनी सांभाळुन ठेवलेले आहे, पतऱ्यांवर जपुन ठेवलेले आहे. चोरीला गेलेले नाही, लोकांनी सांभाळुन ठेवलेले आहे की, हे आपल्याला परत लावुन द्या.

**मा.आयुक्त :-** या सर्व कामांची काळजी करु यापुढे.

**श्री.नितीन लढढा :-** शौचालय पर्यंत जाण्यासाठी मार्ग नाही. आणि त्याच्या संदर्भातले प्रस्ताव आपल्याकडे प्रलंबीत आहे.

**मा.आयुक्त :-** हा प्रकरण याच्यासाठी प्रलंबित आहे की, १४ व्या वित्त आयोगाच्या निकषामध्ये बसतो की नाही, याच्यासाठी प्रलंबीत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** यापुर्वी तश्या पध्दतीची कामे झालेली आहेत ना.

**मा.आयुक्त :-** म्हणुनच.

**श्री.प्रशांत नाईक :-** हे पाहा, मी फाईलला लावलेल आहे साहेब,

**श्री.नितीन लढढा :-** त्याच्यातील जेन्युननेस बघा,ऐवढा मोठ अंतर आहे दरीच, जो पर्यंत त्याला ॲपरोच होणार नाही ते शौचालय वरती केलेला खर्च सुध्दा उपयोगी पडत नाही ना.

**मा.आयुक्त :-** म्हणुनच, ते थांबलेल आहे की, जर १४ व्या वित्त आयोगामध्ये बसत असेल तर...

**श्री.प्रशांत नाईक :-** १० ठिकाणी आपण आता पर्यंत १४ व्या वित्त आयोगातुन केलेल आहे.

**श्री.नितीन लढढा :-** हो पण आपण याच्या पुर्वी सुध्दा असे मान्यता दिलेल्या आहेत. तश्या पध्दतीचे कामे झालेली आहेत. मग ते झाल असेल तर ते बेकायदेशीर झाल असेल का ?

**मा.आयुक्त :-** नितीन भाऊ, मी अजुन त्याला मंजुर ना मंजुर काही म्हटलेल नाही.

**श्री.नितीन लढढा :-** सर,सर, मंजुर किंवा नामंजुर ह्या दोन्ही गोष्टी जर तातडीने घडल्या ना. तर कमीतकमी सदस्यांना वेगळा पर्यायी शोधाव लागत. ते मंजुर ही नाही आणि नामंजुर ही नाही. ही अवस्था जी आहे खुप वाईट अवस्था आहे.एकदा नामंजुर झाल सक्षम कारण देऊन की, या या कारणानुसार ते बसत नाही किंवा मंजुर करता येत असेल तर या या कारणान्वये त्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. विषय तिथेच संपतो.

**मा.आयुक्त :-** आपल्या सुचना योग्य आहेत. पण बैठक झाल्यानंतर मी ती फाईल आपल्याला दाखवतो. मग आपणच सांगा, याच्यामध्ये वेळ का झाला.

**श्री.नितीन लढढा :-** सर, सर आपण प्रशासन आणि आयुक्त साहेब आहात,ती फाईलबद्दल माझ्यापेक्षा तुम्ही त्याच्यातुन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला तर निश्चितपणे त्याच्यातुन मार्ग निघतो. व्यवहारीक तत्व त्याच्यातल बघा की, जर कधी शौचालय वरती झालेला लाखो रुपयांचा खर्च आणि तो विनावापर पडुन असतील, मग त्या खर्चाचा ही उपयोग होत नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब तुमच्याकडे एक प्रस्ताव पाठविलेला आहे.

**मा.आयुक्त :-** माझ्याकडे असा कुठलाही प्रस्ताव आलेला नाही.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** शिवाजी नगर हुडको मधील टॉयलेट शिफ्ट करण्याबाबतीत.

**मा.आयुक्त :-** कुठे आहे पण तो ?

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** आपल्याकडे सहीला.

**मा.आयुक्त :-** कधी.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** मागच्या आठवडयात.

**मा.आयुक्त :-** नाही.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** आपण जागेवर पाहणी केली होती तोच प्रस्ताव.

**मा.आयुक्त :-** प्रस्ताव पाठवा, मी जागेवर पाहणी केलेली आहे, परंतु असा कुठलाही प्रस्ताव माझ्याकडे आलेला नाही. जागेची पाहणी केलेली आहे आणि पाहणी करुन त्याला मी ग्रीन सिग्नल दिलेला आहे. जुन जे आहे, त्याच्यावर डी.पी.रोड असल्याने ती साईड आपल्याला बदलावी लागली. परंतु प्रपोझड डी.पी. रोडच्या दोन्ही बाजुला, १० सिट्स स्त्रींचे १० सिट्स पुरुषांचे असे आपण २० सिट्सला अप्रुवल दिलेल आहे. तुम्ही प्रस्ताव पाठवा मान्यता लगेच मिळेल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** निधी परत चालला जाईन त्या बद्दलचा.

**मा.आयुक्त :-** निधी कुठलाही परत जाणार नाही.

**सौ.ज्योती चव्हाण :-** विषय धरुनच सांगत आहे. आदर्शनगरचा पुर्ण परिसर,म्हणजे आता हगणदारी मुक्त करण्याची गरज आहे तेथे आणखी. म्हणजे विकास पाटील होते त्या वेळेस तर त्यांनी खुप प्रयत्न करुन तिथला भाग हगणदारी मुक्त केला होता. परत तेथील परिस्थिती इतकी वाईट आहे की, तेथे चालण ही मुश्कील झालेल आहे. आणि दुसर आपण तलावाकडे इतके सर्व जळगांव शहराचे नागरीक तलावाकडे फिरायला जातात. तेथे सुध्दा हगणदारी आता परत तयार होत आहे. त्या तिथली पण आपल्याला सोय करावी लागेल. नाही तर तिथला ही भाग परत फिरण्या

लायक राहणार नाही. तेथे जे सार्वजनिक शौचालय आहे तिथली काय परिस्थिती आहे ती बघा, म्हणजे त्यांना सोय आहे नाही आहे. ते तर बघितल पाहिजे. ते सर्व आदर्श नगरच्या भागातच परिसर अस्वच्छ करायला लागले. तेथे चालण मुश्किल आहे. लोक घरातुन बाहेर निघत नाही इतकी वाईट परिस्थिती आहे आदर्श नगर मध्ये.

**मा.सभापती :-** काही ठिकाणी पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे

**सौ.ज्योती चव्हाण :-** ते हगणदारी मुक्तच करायच आहे ना साहेब आदर्शनगर आपल्याला. ती पुर्ण हगणदारी मुक्तच झाली पाहिजे. काही तरी तुम्ही ठोस कार्यक्रम लावा तेथे.

**श्री.नितीन लढढा :-** त्यांना तर सर्टीफिकेट मिळुन जातात हगणदारी मुक्त शहराचे.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** काही ठिकाणांची बोरींग खराब झालेली आहे. त्याच प्रस्ताव आम्ही पाठविलेला आहे वेगळी पाण्याची व्यवस्था करणे संबंधीत आणि आता आपण जी तक्रार करत आहे त्याची पण माहिती घेऊन करतो.

**सौ.ज्योती चव्हाण :-** ही तक्रार मी ७ वर्षापासुन करत आहे. हे ७ व वर्ष आहे या तक्रारीच.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** माझ पहिलच वर्ष आहे. बघतो काय करता येईल.

**सौ.ज्योती चव्हाण :-**मला ते पुर्ण हगणदारी मुक्त तेथुन करुनच दिली गेली पाहिजे अस काही ठोस उपाययोजना करा. तेथे तुम्ही जर काही आमची मदत लागली तर मी ती मदत करायला ही तयार आहे.

**मा.आयुक्त :-** नाही. त्याकडील लोकांना काय अडचण आहे ते बघा, तेथील सार्वजनिक शौचालयांत पाण्याची व्यवस्था आहे की नाही. उद्यापासुन सुरु करा ते जे काही असेल करु न द्या. बघुन घ्या तो कोणता एरिया म्हणत आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आदर्शनगर, डि-मार्टच्या मागचा एरिया, गणपती नगर मध्ये राहणे मुश्किल झाल आहे आम्हाला.

**मा.आयुक्त :-** मग त्या ठिकाणी वयक्तीक शौचालय नाही का ?.

**सौ.ज्योती चव्हाण :-** गणपती नगर, आदर्श नगर चा वापरच नाही आह. हे सगळे तांबापुराच्या लोकांचा वापर इकडे येतो.

**मा.सभापती :-** तांबापुरा हगणदारी मुक्त करण्यासाठी काय व्यवस्था आहे. सिटांची संख्या किती आहे तेथे.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** बघायला लावतो.

**मा.आयुक्त :-** मग आपले सॅनिटरी इन्स्पेक्टर काय करतात?

**सौ.ज्योती चव्हाण :-** ७ वर्षापासुन मी हा विषय करत आहे.

**मा.आयुक्त :-** ७ वर्षापासुन सॅनिटरी इन्स्पेक्टरच्या ही बाब लक्षात आली नाही.

**सौ.ज्योती चव्हाण :-** वास्तविक काय होत. रात्री सगळी घाण होते आणि सकाळीच आपलेच कर्मचारी, वास्तविक त्यांनी ते काम करु नये. इतक घाण लेवलच काम तो कर्मचारी बिचारा तेथे करतो आहे. मला तरी वाटत ते काम त्याच्याकडुन थांबुन टाकाव. जेवढी घाण होईल तितकी होऊ देऊ, मग पाहु ते लोक कसे तेथे बसतात. कोणता तरी मार्ग तर काढला पाहिजे.

**मा.आयुक्त :-** तुमची आरोग्य यंत्रणा काय करत आहे, सि.एस.आय., एस.आय., मुकादम,

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** माझ्याकडे तर हा विषय पहिल्यांदा आला.

**सौ.ज्योती चव्हाण :-** पहिल्यांदा आला, याच्या पुर्वीचे रिकॉर्ड बघा.काय करता येईल.

**मा.आयुक्त :-** सॅनिटरी इन्स्पेक्टरला बोलवुन त्याच्यावर तातडीने कार्यवाही झाली पाहिजे.

**मा.सभापती :-** याला रोकण्यासाठी आपले एस.आय.आहे. परिसरामध्ये गंदगी झालेली दिसते रोड वरती ती कश्यामुळे होते. का होते मग त्या परिसरात असलेले शौचालय, शौचालयांची संख्या किती आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आणि हीच परिस्थिती मेहरुण तलावाकडे निर्माण होणार आहे. ही जशी मिटत नाही तशी ती पण मिटणार नाही.हाच जो प्रकार आहे तेथे पण सुरु आहे. तेथे नागरीक रोज फिरायला जातात. ते पण लवकर बंद झाल पाहिजे. आज आपल्या जळगांवच वैभव आहे ते मेहरुण तलाव, तेथे सुध्दा हीच परिस्थिती आहे. आज वेळेत जर आपण लक्ष नाही दिल तर तेथे ही आदर्श नगर सारखा प्रकार होणार आहे तेथे. तर तुम्ही आदर्श नगरच हे काम पहिले करा. मला परत बोलायला नको लागायला पाहिजे.

**मा.सभापती :-** एरिया लक्षात आला ना साहेब आपल्या.

**श्री.नितीन लढढा :-** आयुक्त साहेब, तो वार्ड सभापती महोदयांचा वार्ड आहे. सभापतींच्या वार्डात जर प्रशासन अस दुर्लक्ष करत असेल.

**मा.आयुक्त :-** दुर्लक्ष नाही करत आहे,

**श्री.नितीन लढढा :-** ऐका ना, माझ म्हणण ते नाही.

**मा.सभापती :-** ऐका ना, ऐका ना, प्रभाग माझा नाही. उदय पाटील साहेब होते, त्यांना मी स्वत: बोलवल, तेथील जे सिट्स आहेत. त्याची दुरुस्ती करायला सांगितली, त्या सिट्स जास्त उपलब्ध करुन द्यायच्या सुचना केल्या.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय, जर अस बघितल तर संपुर्ण जळगांव शहर तुमच आहे.

**मा.सभापती :-** भाऊ तुम्ही प्रभाग सांगितला, ते सांगत आहे मी तुम्हाला,

**श्री.नितीन लढढा :-** तुमच्या प्रभागाला लागुन असेल, बाँडरी आहे.

**मा.सभापती :-** मी तेथे प्रयत्नही करत आहे, मी साहेबांना बोलविले तेथे. बंद पडलेले बोअर मी चालु करायला लावले.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आणि त्या बाँडरीचा त्रास मला होत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** कारण तुमच्या प्रभागातील नागरीक ज्योतीताईंच्या प्रभागात येऊन घाण करतात.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हे सगळयात मोठ कारण आहे.

**मा.सभापती :-** मी सिट्स वाढुन द्यायला सुध्दा सांगितलेल आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** म्हणुन त्यांची सोय तिकडेच करा तुम्ही आता.

**श्री.नितीन लढढा :-** ज्योतीताईंना न्याय द्या.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय, सिमा प्रश्न कधीच सुटलेला नाही.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** जे सर्व मुद्दे तुम्ही येथे उपस्थित केलेले आहे आम्ही अत्यंत गंभिरतेने याची दखल घेत आहोत. आणि फक्त आपल्या प्रभागातील नाही शहरातील इतर ज्या ज्या ठिकाणी या तक्रारी आहे त्याची आम्ही एकदम गांभिर्याने दखल घेत आहोत.येणाऱ्या काळामध्ये आमचे आरोग्यधिकारी, आमची सर्व आरोग्याची टिम, गरज असली तर तेथे आम्ही प्रत्यक्ष व्हिजीट करु.त्याच्यासाठी आपल्याला उपाययोजना करायची आहे. याच्यासाठी आम्हाला सगळयांच सहकार्य आम्हाला लागणार आहे. आणि गरज पडल्यास आपल्या सहकार्याने नागरीकांना ही प्रबोधन आपण करण्याच प्रयत्न करु. त्याबाबतीत नियोजन करण्याची आमची प्रोसेस सुरु आहे. निश्चितच मी आपल्याला सांगतो की, याच्यावर उपाययोजना करण्यात येईल.

**मा.आयुक्त :-** आरोग्य खात्याच्या बाबतीत जे काही नागरीकांच्या तक्रारी असतील याच्यासाठी आपण एक टोलफ्री नंबर सुरु केलेला आहे. तुम्ही सर्व सदस्यांना कळविल का

**सहा.आयुक्त,श्री.पवन पाटील :-** हो सर.

**मा.आयुक्त :-** त्याचे आपल्याला जास्तीत जास्त प्रसिध्दी द्यावी. इतर माध्यमाच्या वतीने ते सुरु आहे. पण आपण ही आपल्यामार्फत हा जर नंबर पोहचविला. तर याची तक्रार आपण सकाळी ७.०० वाजेपासुन साध्याकाळ पर्यंत सोल्व्ह करण्याची सोय केलेली आहे. त्याची नोंद घेतली जाईल आणि ती तक्रार संबंधीत सॅनिटरी इन्स्पेक्टर कडुन सोडवुन पुन्हा नोंद पाठविली जाईल की, तक्रारीच निवारण झाल आहे आणि तक्रारीच निवारण झाल नसेल तर त्याची जबाबदारी आपण ते सॅनिटरी इन्स्पेक्टरवर निश्चित करत आहे. म्हणजे नागरीकांना आपल्या तक्रारी मांडण्यासाठी सदस्यांपर्यंत किंवा कोणापर्यंत जाण्याची गरज भासु नये. आपल्या स्वत:च्या घरातुनच ते तक्रारी आपल्यापर्यंत येतील. याची गांर्भिय लक्षात घेऊन याचा उद्देश हाच आहे की, लोकांना तक्रारी करण्यासाठी माध्यम राहव. आणि आपल्याला ही फिडबॅक मिळावा जेणे करुन आपल्याला आपल काम चांगल्या पध्दतीने करता येईल.माझी विनंती आहे की, सर्वांनी या टोलफ्री नंबरचा जास्तीत जास्त वापर करावा.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय, २५ कोटी निधीतुन किती निधी असा शिल्लक आहे की, ज्याच नियोजन अजुन पर्यंत झालेला नाही.

**मा.आयुक्त :-** आपली कार्यवाही सुरु आहे. ते २५ कोटी आणि कोविड मध्ये मिळालेले ५-५ कोटी, हे पुर्ण अनुदान आपल्याला इक्वल कॅन्ट्रब्युशन आहे. या निधीच नियोजन आपण केलेल होत. याच्यातुन दोन काम आपल्याला करायला हवी होती. एक म्हणजे ट्रॅफिक गार्डनच्या टोकाला जागा घेतली आणि दुसरी गोष्ट म्हणजे स्मशानभुमी मध्ये जे आपण गॅस दहनी बसविणार होतो. हे दोघी मिळुन आपल्याकडे १ कोटी ८० लाख रुपये आपल्याकडे शिल्लक आहे. मधल्या पिरियड मध्ये त्याच नियोजन आपल्याकडुन झालेल नव्हत. ही वस्तुस्थिती आहे.आता त्याच्या पुढे जाऊन जे काही प्रत्यक्ष काम आपण हाती घेतली. त्याच्यामध्ये इस्टीमेट केलेली संपुर्ण रक्कम खर्च होते अस नाही. काही ठिकाणी त्याच्यामध्ये रक्कम सेव ही होते. तर हे दोन कामांसाठी १ कोटी ८० लाख आणि साधारणता आणि राहीलेली सेवींग असे दोन्हींची माहिती मी सिटी इंजिनिअर कडुन घेतली. साधारण आपल्याकडे २.२५ कोटी त्या २५ कोटी मधुन शिल्लक राहत आहे. मी ज्या वेळेला नगरविकास खात्यात गेलेलो होतो. त्यावेळेला मी त्यांना

विनंती केलेली आहे. याची मुदत ३१ मार्चला संपत आहे. आमच्याकडे २.२५ कोटीचा निधी शिल्लक आहे तर याच नियोजन महासभेमार्फत करुन त्याला जिल्हाधिकाऱ्यामार्फत तुमच्याकडे हा प्रस्ताव पाठवुन देऊ. म्हणजे हे २.२५ कोटी रुपये याला तुम्ही प्रशासकीय मान्यता द्या.आणि त्याची टेंडर प्रक्रिया आम्हाला ३१ मार्चच्या आत करता येईल आणि त्याला आवश्यक असलेला कालावधी आम्हाला वाढवुन द्या. शासनाने प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना दिलेल्या आहे. तर त्याच आम्ही नियोजन करत आहे येणाऱ्या महासभेत आपण याच्यात कोणती कामे घ्यायची त्याचा प्रस्ताव ठेवतो आहे. ते मान्यते करीता आपण शासनाला पाठवु आणि शासनाकडुन या गोष्टीला मुदतवाढवुन घेण्याचा आपण प्रयत्न करु या जेणे करुन हे जे २-२.२५ कोटी रुपये आपल्याला लागणार आहे त्याच्या मध्ये नविन कामे हाती घेता येईल. अश्या अर्थाने आपला पुर्ण निधी आपल्या शहरामध्ये वापरला जाईल.याच्यासाठी आपण पुर्ण प्रयत्न करु या. आणि मला खात्री आहे की शासनाकडुन आपल्याला मान्यता निश्चित मिळेल.

**श्री.नितीन लढढा :-** जवळपास ५०० पोल असे आहे की, ज्यांच्या वरती स्ट्रीट लाईट फेज जोडला गेलेला नाही. म्हणजे मोठा परिसर आणि दाट वस्तीचा भाग आहे. ते श्रमिक कामगारांच्या वस्तीचा भाग आहे.ईलेक्ट्रीक पोल लागलेले आहे परंतु स्ट्रीट लाईट फेज नसल्या कारणाने तेथे दिवाबत्ती होत नाही. त्याला साधारणता ५० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. किती आहे.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री.**एस.एस.पाटील :- २५ लाख अपेक्षित आहे.

**श्री.नितीन लढढा :-** २५ लाख अपेक्षित आहे. तर ते काम त्याच्यामध्ये प्राथमिकतेने घेण्यात याव जेणे करुन काय होईल कमीत कमी त्या परिसरातील दिवाबत्ती तरी योग्य पध्दतीने सुरु होईल.

**मा.आयुक्त :-** जर प्राधान्य मध्ये असेल तर आपण त्याचा ही विषय निश्चित घेऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** उरलेले पैसे जी स्मशानभुमी आहे जळगांव शहराची त्याच्यावर खर्च करा. काही तुटफुट झालेली आहे, काही वटे तुटले आहे.

**मा.आयुक्त :-** चारही स्मशानभुमींची आपल्याला सुधारणा करायच्या आहे. त्याच मला वाटत इस्टीमेटच काम बऱ्यापैकी पुर्ण झाल आहे. नितीन भाऊ आपण ही सुचविलेले कामे त्यात घेण्याचा प्रयत्न करु.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आयुक्त साहेब, १४ व्या वित्त आयोग मध्ये आपण मला ६९ कोटी रुपये आणि काही तरी समथींग लाख रुपयेच्या वरती शिल्लक आहे हे सांगितल होत. तर या तिन महिन्या मध्ये ३० कोटी रुपयांचे काय देयके झाले साहेब, सर्व सदस्यांना सांगा, म्हणजे आम्हाला ज्ञान अवगत होईल. जे ११४ कोटी रुपये आपल्याला ५ वर्षासाठी वापरायचे होते. ते आपण वापरले, सर्वात जास्त या तिन महिन्यामध्ये ३० कोटी रुपये वापरले, या ३० कोटीचे देयकं काय दिले गेले.

**मा.मुख्यलेखा अधिकारी,श्री.कपील पवार :-** याच्यामध्ये व्याज, आमची कॅलक्युलेशन केली गेलेली आहे मुद्दल सांगितली गेली, दुसरा आपला काही जो हिस्सा होता, इतर निधी वर्ग करायचा तो शासनामार्फत वर्ग करण्यात आला आहे. ते डेट टु डेट हिशोब केल की, देतो मी.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही साहेब, माझ म्हणण अस आहे की, पुर्ण रक्कम आपण जी ३० कोटी, साहेब तुम्ही आताच सांगितल की, आपल्याकडे ४० कोटी रुपये शिल्लक आहे. तीन महिन्यामध्ये ३० कोटीचे असे कोणते बिले अदायगी झाले साहेब, तीन महिन्यामध्ये हे फार मोठा, आणि ऐवढे कामे तर काही झाले नाही. ठिक आहे, कोविडवर पण आपण इतके पैसे खर्च नाही केले. शहरामध्ये घनकचऱ्यावर इतके पैसे खर्च नाही केले, सुखसुविधांवरती इतके पैसे खर्च नाही केले. जे आपल्याला प्रायमरी १४ व्या वित्त आयोगामधील जे गाईडलाईन्स होत्या. त्याच्यामध्ये तर हेच आहे. दुसर काय नाही आणि शहरामध्ये कामे तर काही दिसत नाही साहेब.

**मा.मुख्यलेखा अधिकारी,श्री.कपील पवार :-** याच्यात आपल्याला जे सांगितल असेल, ६९ कोटी ते व्याजासह असेल, याच्यात ९-१० कोटी हे व्याज असत. हे व्याज जे आहे. सन २०१५ पासुन सन २०२० पर्यंत आहे. आता मागे याच्यात शासनाच काही हिस्सा वर्ग केला, नंतर काही स्वच्छतेचे बिल निघाले. आणि जो काही खर्च असेल या दोन तीन महिन्याचा किंवा कोणताही ते मी आपल्याला दाखवतो. काही अडचण नाही.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आता १५ व्या वित्त आयोगातुन आपल्याला कुठले कामे करायचे आहे या बद्दल आता चर्चा म्हणजे कश्या पध्दतीने करायचे आहे आपल्याला नियोजन काय करायच पुढील कामांच, याचा पहिला हप्ता आलेला आहे मला वाटत आहे, दोन हप्ते आलेले आहे १५ व्या वित्त आयोगाचे दोन हप्ते आले आहे.

**मा.मुख्यलेखा अधिकारी,श्री.कपील पवार :-** १५ व्या वित्त आयोगाचे दोन हप्ते आलेले आहे. ते आपल्याला सांगितले.

**सौ.ज्याती चव्हाण :-** हो. किती किती आहे.

**मा.मुख्यलेखा अधिकारी,श्री.कपील पवार :-** मुलभुत अनुदानाचा ६.८० कोटी आणि बंधनकारक अनुदानाचा ६.८८ कोटी.

**सौ.ज्याती चव्हाण :-** १३.५ कोटी जवळ पास निधी दोन हप्त्यात आपल्याकडे आलेला आहे.

**मा.मुख्यलेखा अधिकारी,श्री.कपील पवार :-** याच्यामध्ये दोन बाबी आपण करु शकतो पहिली बाब अशी की, ओवर ऑल १५ व्या वित्त आयोगाच्या साच्याला आपण महासभेची मान्यता घेऊ शकतो आणि दुसर याच्यात म्हटल आहे की, कामाची शिफारस ती महासभा करु शकते. म्हणजे कामांची शिफारस महासभेने केल्यानंतर त्याला प्रशासकीय मान्यता मा.आयुक्त साहेब देतात.

**सै.**ज्योती चव्हाण :- म्हणजे त्याच्या मध्ये कामे काय नियोजन करायचे ते मांडता येईल.

**मा.मुख्यलेखा अधिकारी,श्री.कपील पवार :-** हो ते महासभा ठरावु शकते.

**श्री.**नवनाथ दारकुंडे :- त्याच्यात दिल असेल ना साहेब कोणते कामे करायचे.

**मा.मुख्यलेखा अधिकारी,श्री.कपील पवार :-** हो.

**मा.आयुक्त :-** सर्वसाधारण स्वरुपाचे आहे. याच्या मध्ये आता आपल्या अकाऊंट हेड यांनी सांगितल्या प्रमाणे १४ व्या वित्त आयोगामधील आणि १५ व्या वित्त आयोगामध्ये एक मुलभुत फरक असा आहे की, १४ व्या वित्त आयोगामध्ये आपल्याला एकच प्रकारच अनुदान भेटत होत त्याच्यामध्ये ते ५० टक्के अनुदान आपल्याला घनकचरा व्यवस्थापनावर खर्च कराव लागत होत. आणि घनकचरा व्यवस्थापनाची सर्व कामे पुर्ण झाली तरच उर्वरित ५० टक्के अनुदान आपल्याला इतर बाबींवर खर्च करण्याची परवानगी होती. आता १५ व्या वित्त आयोगाच्या बाबतीमध्ये केंद्र शासनाने याचे दोन भाग केलेले आहे. एक टाईड ग्रँडस आणि एक अनटाईड ग्रँडस आहे. टाईड म्हणजे आपल्याला बांधीलकी आहे. हा खर्च याच कारणासाठी केला जाईल अनटाईडच जो ग्रँड आहे ज्याला महानगरपालिका आपल्या स्वत:च्या नियाजनाने खर्च करु शकते. त्याला काही अटीशर्ती आहे. त्याच्यासाठी आपल्या शहरामधील सगळी पाणी पुरवठा, स्वच्छता, घनकचरा त्याची सर्व माहिती आपण त्यांना कळवितो आहे. ती माहिती परवाच्या दिवशी भरुन झाली. ती माहिती राज्य शासनाकडे पाठविली जाईल. आणि केंद्र शासन आपल्या महानगरपालिकेची आताची परिस्थितीत सर्व्हीस लेव्हलची पाहणी करते. जे शहर आहे त्याच स्तर काय आहे. त्याच विचार करुन आपल्याला या अनटाईड ग्रँडस मधुन मान्यता देणार आहे. ही मान्यता दिल्यानंतर आपल्याला या दोन्ही प्रकारच्या अनुदानातुन काय काम करता येईल याचे धोरण, जस आपण १४ व्या वित्त आयोगाच्या वेळेला २०१६ मध्ये महासभेमार्फत ठरविल होत. त्याच पध्दतीने धोरण आपल्याला या फंडाच्या संदर्भात महासभा ठरवुन देईल. महासभेने ठरवुन दिलेल्या धोरणांतर्गत १४ व्या वित्त आयोगाप्रमाणे जी प्रत्यक्ष कामे घ्यायायची आहे आपल्याला त्या कामाला प्रशासकीय मंजुरी देण्याचा अधिकार हा आयुक्ताला देण्यात आलेला आहे. ओवर ऑल धोरण जे आपण महासभेत निश्चित करु. त्या धोरणाला अधिन राहुन त्या त्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली जाणार आहे. एका वेळेला या अनटाईड ग्रँडसला केंद्र शासनाच्या वतीने हो मिळाल या दोन्ही प्रकारच्या अनुदानातुन सर्व नियोजन आपण महासभेत करणार आहोत. येणाऱ्या मार्च पर्यंत हे नियोजन आपण पुर्ण करुन आपल्याला या अंतर्गत एक एक कामाच इस्टीमेट आणि प्रशासकीय मान्यता आयुक्तांकडुन घेता येईल. १४ व्या वित्त आयोगामध्ये त्याच नियोजन केलेल होत तसच नियोजन आणि ५ वर्षाचा आपला कालावधी आहे. पहिल्या वर्षाच नियोजन आपण व्यवस्थीत केल की, उरलेले ४-४.५ वर्षाच नियोजन आपल्याला तसच करता येईल.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.एफएफसी-२०२०/प्र.क्रं.४०/ नवि-४ मंत्रालय, मुंबई दिनांक २६ मे २०२० अन्वये केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार Non-Million Plus Cities अंतर्गत सन २०२०-२१ या आर्थीक वर्षातील अंतरीम मुलभूत अनुदानाचा पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे.

तसेच नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.एफएफसी-२०२०/प्र.क्रं.५६/नवि-४ मंत्रालय, मुंबई दिनांक २८ ऑक्टोंबर, २०२० अन्वये केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार Non-Million Plus Cities गटातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत नगरविकास विभागामार्फत शासन निर्णय पारीत झालेला आहे.

वर नमुद १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या प्राप्त झालेले अनुदान व त्यानुसार अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चितीबाबतचे नियोजन करणेबाबतच्या शासन निर्णयाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव :- विषय क्र. ३ :-** प्रभाग समिती क्रं.२ अंतर्गत अर्जदार श्री.दिलीप सेवाराम मंधाण राहणार दिपप्लाझा, न्यु.बि.जे. मार्केट समोर, पोलन पेठ, जळगांव यांची पाणीपट्टीची रक्कम रु.११,६८०/- मात्र निर्लेखित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**सौ.ज्योती चव्हाण :-** ३,४,५ मान्य, फक्त सुचक आणि अनुमोदन लिहुन घ्या.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय मान्य आहे.
**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रभाग समिती क्र.२ चे कार्यक्षेत्रामधील पाणी पुरवठा विभागाचे क.अभियंता यांचे मार्फत मोजणी पुस्तकाची पडताळणी अंती सदर ठिकाणी नळ संयोजन दिल्या बाबतची नोंद आढळ होत नाही. सदर मिळकतींमध्ये नळ संयोजन नसलेमुळे मिळकतधारक श्री.दिलीप सेवाराम मंधाण, दिपप्लाझा, न्यु.बि.जे. मार्केट समोर, पोलन पेठ,जळगांव यांचे नावांसमोर दर्शविलेली सन २०१५-१६ ते २०१९-२० अखेर पाणीपट्टीची रक्कम रु.११,६८०/- शास्तीसह अर्जदार यांच्या दि.१३/१०/२०१७ चे अर्जानूसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार निर्लेखित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ४ :-** प्रभाग समिती क्रं.३ अंतर्गत असलेले मिळकतधारक श्री.रोशन बी पटेल व इतर २ रजा कॉलनी, मेहरुण यांचे मालमत्ता वरील गुंठेवारी कर आकारणी रक्कम रु.६०,२३६/- मात्र निर्लेखित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय मान्य आहे.
**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रभाग समिती क्रं.३ कडील यु.क्र.०३/०७ मधील अर्जदार श्री.रोशन बी पटेल व इतर २ रजा कॉलनी, मेहरुण सर्व्हे नंबर २१/१ प्लॉट नं.५६ यापैकी मालमत्ता मिळकत मागणी क्रमांक १८०६ वर या नावाने नोंद असुन सदर मिळकत गुंठेवारी नोंद आहे. त्या नोंदी नुसार मिळकत धारक यांनी घरपट्टीची रक्कम सन २०११-१२ अखेर भरलेली आहे. त्या नंतर नगररचना आदेश क्रमांक १०४ दिनांक ०४/०८/२०११ नुसार गुंठेवारी विकास नियमाकुल आदेश झालेला आहे. त्यानुसार सन २०१९-२०२० या आर्थीक वर्षात मिळकतदार यांनी गुंठेवारी दंड देय्यक रद्द करण्याबाबत अर्ज व त्यासोबत गुंठेवारी नियमाकुल आदेश सादर केलेला आहे. त्यांच्या मिळकतीवर गुंठेवारी दंड देयकाची मागणी रु.६०,२३६/- दिसुन येत आहे. अर्जदार यांनी नियमानुसार खरेदीखत करुन घेतलेले असून नविन मालमत्ताधारक श्री.रोशन बी पटेल, रोहना राजु पटेल, राजु शब्बीर पटेल यांचे अर्जा

सोबत दस्ताऐवज सादर केलेल्या गुंठेवारी नियम आदेशानुसार सदरची गुंठेवारी नियमाकुल दंड देयक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम १५२ नुसार रक्कम रु.६०,२३६/- मात्र निर्लेखित करण्यास व मागणी डिमांड रजिष्टरला नोंद घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ५ :-** प्रभाग समिती क्रं.३ अंतर्गत असलेले मिळकतधारक सौ.विमल कृष्णा भामरे स.नं.२०/१ प्लॉट नं.३०/ब/४ रजा कॉलनी, मेहरुण यांचे मालमत्ता वरील गुंठेवारी कर आकारणी रक्कम रु.२६,०१२/- मात्र निर्लेखित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय मान्य आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रभाग समिती क्रं.३ कडील यु.क्र.०३/०७ मधील अर्जदार सौ.विमल कृष्णा भामरे स.नं.२०/१ प्लॉट नं.३०/ब/४ रजा कॉलनी, मेहरुण मालमत्ता मिळकत मागणी क्रमांक १७२६/१७२७ वर या नावाने नोंद असुन सदर मिळकत गुंठेवारी नोंद आहे. त्या नोंदी नुसार मिळकत धारक यांनी घरपट्टीची रक्कम सन २०१९-२० अखेर भरलेली आहे. मात्र सदर नगर रचना आदेश क्रमांक ००२१ दिनांक १७/०९/२०१० नुसार गुंठेवारी विकास नियमाकुल आदेश झालेला आहे. त्यानुसार मिळकतदार यांनी सन २०१९-२० या आर्थीक वर्षात गुंठेवारी दंड देय्यक रद्द करण्याबाबतचा अर्ज व त्या सोबत गुंठेवारी नियमाकुल आदेश सादर केलेला आहे. मिळकतीवर मागणी असलेली गुंठेवारी दंडदेयक मागणी रु.२६,०१२/- दिसुन येत आहे. अर्जदार यांचे अर्जा सोबत दस्ताऐवज सादर केलेल्या गुंठेवारी नियम आदेशानुसार सदरची गुंठेवारी नियमाकुल दंडदेयक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम १५२ नुसार सदर रक्कम रु.२६,०१२/- मात्र निर्लेखित करण्यास व मागणी डिमांड रजिष्टरला नोंद घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ६ :-** सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडी मधील शिक्षिका व मदतनीस यांना बालवाडया सुरु करण्याची परवानगी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याकरीता मानधनावर नविन आदेश होणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** विषय मान्य आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका सेमी इंग्रजी माध्यमातील शिक्षिका २० व मदतनीस १० तसेच मराठी माध्यमातील बालवाडी शिक्षिका ९ व मदतनिस ११ यांना बालवाडया सुरु करण्याच्या मान्यता प्राप्त दिनांकापासुन दि.३०/११/२०२० पावेतो मानधनावर नियुक्ती आदेश देणेबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्यात आला असता स्थायी समिती ठराव

क्रं.२५७ दि.२५/०८/२०२० अन्वये बालवाडी शिक्षिका व मदतनिस यांच्या मानधनावर येणारा खर्च महिला व बालकल्याण निधीतून करण्यात येणार असल्याने सदरचे प्रकरण महिला व बालकल्याण समितीसमोर ठेवणे अभिप्रेत होते. असे नमूद असल्याने सदरचा प्रस्ताव महिला व बालकल्याण समितीसमोर सादर केले असता महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र.०६ दि.११/११/२०२० अन्वये बालवाडया सुरु करण्याची परवानगी मिळालेपासुन दि.३०/११/२०२० पावेतो मानधन तत्वावरील शिक्षिका व मदतनिस यांना नियुक्ती आदेश देणेस व येणारा खर्च रक्कम रु.२० लक्ष महिला व बालकल्याण निधीतून करणेस मान्यता प्रदान केलेली आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळातील लॉकडाऊनमुळे बालवाडया सुरु करण्याची मान्यता मिळाली नसल्याने बालवाडया सुरु करण्याची परवानगी मिळालेपासुन ६ महिन्याकरीता शिक्षिका व मदतनिस यांना मानधनावर नियुक्ती आदेश देणेस व त्यास येणाऱ्या रक्कम रु.२० लक्ष मात्रचे खर्चास मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतुदीनुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**नगरसचिव :- विषय क्र. ७ :-** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर मनपा मालकीच्या मिळकती ठिकाणी सुरक्षारक्षक पुरविणे कामाच्या रक्कम रु.७०,०५,५०४/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता व निविदा प्रक्रिया होई पावेतो मागील वर्षी मंजुर दर असलेले मक्तेदार शिवा सिक्युरिटी सर्व्हीसेस यांना मुदतवाढ देण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मुदत संपल्यानंतर हा प्रस्ताव आलेला आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मुदतवाढ किती दिवसासाठी द्यायची आहे.

**श्री.नितीन लढढा :-** नविन निविदा प्रक्रिया सुरु झालेली ती अंतिम होई पावेतो, मुदतवाढ देण्यात येत आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ नविन प्रक्रिया ठिक आहे पण याच कालावधी कधीचाच संपलेला आहे ना. याच्या आगोदर मागील सभापतींनी पत्र दिलेल आहे. तेव्हा आपल्या प्रशासनाला जाग का नाही आली. सगळे कामे होऊन गेल्यानंतर प्रशासनाला जाग आली.

**श्री.नितीन लढढा :-** आपली बऱ्याच वेळेला या विषयावर चर्चा होते.

**शहर अभियंता,श्री.**भोसले :- याच्यामध्ये माझे कुटुंब माझी जबाबदारी याच्यातच गेले त्यांचे त्यामुळे प्रस्ताव सादर करायला उशीर झाला.

**श्री.नितीन लढढा :-** नाही नाही, कस आहे भोसले साहेब, प्रत्येक प्रकरणात अस होत. आपल्याला माहित आहे की, एखाद्या कामाची मुदत जी आहे ही १० व्या महिन्यात संपत आहे, तर ही क्रमप्राप्त आहे.प्रत्येक वेळेला या विषयावरच चर्चा होते. परंतु त्याच्या मध्ये सुधारणा होत नाही. आपण मुदतवाढ देतो ठिक आहे. कामाच्या सोईच्या संदर्भात मुदतवाढ देणेस हरकत नाही. परंतु कुठेतरी ही सिस्टीम बदलायला पाहिजे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** प्रत्येक बाबतीत होत हे.

**मा.सभापती :-** या बाबतीत जो विषय आहे. ते जे दोन लोक आहे मेलेले जनावरे उचलणारे त्यांच पण विषय तसाच होता. त्याची मुदत संपुन दोन महिने झाले होते.

**श्री.नितीन लढढा :-** त्यांना दिवाळीत पैसा मिळाला नाही.

**मा.सभापती :-** त्यांची मुदत संपलेली असल्याने त्यामुळे त्यांना दोन महिने मानधन मिळाल नाही.मी स्वत:त्याचा पाठपुरावा केला, मी संबंधीत अधिकाऱ्याला सुचना केल्या. त्यांच मानधन देऊन टाका. तर स्थायीत याच्यामध्ये तो विषय मंजुर करावा लागेल नंतर मानधन देता येईल.मी तातडीने मिटींग काढली त्याच मानधनाचा विषय मंजुर केला. मंजुर केल्यानंतरही मला स्वत:ला इतका पाठपुरावा करावा लागला.त्याच्यानंतर त्यांच मानधन मिळाल आणि असे विषय वारंवार येत असतात. मागच्या वेळेस पण आपण सुचना केली. जो याच्यात दिरंगाई करेल त्या संबंधीत

कर्मचाऱ्यावर आपण कार्यवाही केली पाहिजे. साहेबांशी ही बोलण झाल होत. पण असच जर वारंवार होत असेल तर त्यांच्यावर कार्यवाही का करण्यात येऊ नये.

**मा.आयुक्त :-** याची आपण मागच्या स्थायी समिती सभेमध्ये ही खुप तपशीलवार चर्चा केली होती. असे जर पहिली मुदतवाढ संपल्यापुर्वी आपल्याला काही कारणांमुळे मुदतवाढ दिलेली असेल तर त्याचे प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे मांडले पाहिजे. आणि साधारण ३ महिन्या आगोदर ती नविन निविदा प्रक्रिया सुरु झाली पाहिजे.आता याच्यामध्ये आपण जे सांगत आहे ते काही अंशी बरोबर आहे. जवळ जवळ दिड दोन महिन्याचा काळ माझे कुटुंब माझी जबाबदारी मुळे ६-७ महिने विलंब झालेला आहे.परंतु आपल्या मागच्या बैठकी मध्ये सर्व विभाग प्रमुखांना स्पष्ट सुचना देण्यात आलेल्या आहे. ते जर असेल किंवा कुठल्याही कर्मचाऱ्याच्या दिरंगाईमुळे प्रस्ताव उशीरा आला असेल आणि त्याला मान्यता देण्यामध्ये कोणाला काही अडचण येत असेल. तर त्याची जबाबदारी संबंधीत विभागावर किंवा त्याच्यावर निश्चित केलेले कर्मचारीची राहिल. आणि मला खात्री आहे की, या पुढे अश्या प्रकारचे प्रस्ताव उशीरा येणार नाही.हा सुध्दा प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे पाठवत असतांना मी पाठविणेस मान्यता दिलेली आहे पण त्याच्या सोबतच इन्टरनल ऑडिटरला सुचना दिलेली आहे. याचा जो प्रस्ताव विलंबाने आला आहे त्याची जबाबदारी निश्चित करा. या सुचना लेखी स्वरुपात दिलेल्या आहे. जर याच्यात जाणुनबुजुन कोणी काही करत असेल तर त्या कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कार्यवाही निश्चित होईल. याची निविदा प्रक्रिया झाली आहे का ?

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** हो निविदा प्रक्रिया झाली आहे, टेंडर ओपनींगसाठी ठेवलेला आहे प्रस्ताव.

**मा.आयुक्त :-** पुढच्या स्थायी समितीच्या बैठकीला तो प्रस्ताव मंजुरीसाठी आपल्याकडे येईल तो पर्यंत

**सौ.ज्योती चव्हाण :-** मला वाटत दोनच महिन्यासाठी आहे ना.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब आम्हाला मुदतवाढ द्यायला वाद नाही.पण आम्ही त्या कामात होते म्हणुन या कामाला उशीर झाला, आम्ही या कामात होते म्हणुन त्या कामाला उशीर झाला. साहेब आपल्याकडे प्रत्येक कामाची स्वतंत्र व्यवस्था आहे. साहेब हे तुम्हालाही माहिती आहे आणि आम्हाला ही माहित आहे की, हे फक्त निष्काळजीमुळे झालेल आहे. ही आहे साहेब तुम्ही आम्हाला तेच कारणे सांगणार आहे आम्हाला तेच ऐकुन घ्यायचे आहे पर्याय नाही. पण दर वेळेस हेच सांगाव लागत ना साहेब. या कामात होते म्हणुन त्या कामात उशीर झाला. साहेब अश्या या दिरंगाईमुळे आणि आपल्या कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे तब्बल ८० लाख रुपये जे मी शासनाकडुन जे मी शासनाकडुन प्रयत्न करुन आणले होते. ते पैसे वापस गेले होते साहेब ते मी तुम्हाला दाखविल पण होत. ज्याची प्रशासकीय मान्यता येऊन गेलेली होती. महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी फक्त एन.ओ.सी. नाही दिली. किती साहेब तब्बल तिन महिने उशीराने एन.ओ.सी.दिली त्यामुळे ते ८० लाख रुपये वापस गेलेले आहे साहेब.

**मा.आयुक्त :-** कधीची गोष्ट आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मागच्या ७-८ महिने आगोदर म्हणजे मार्चच्या आगोदर.मी तुम्हाला हा विषय दाखविला पण होता. माझ्या वार्डामध्ये एक पुलाच काम होत आणि कैलास अप्पा आणि चेतन सनकतांच्या वार्डामध्ये दोन शौचालय होते. तर तो ८० लाखाचा निधी आपल्या मनपाला प्राप्त झालेला होता सामाजिक न्याय विभागाकडुन, फक्त अस एक पत्र पाहिजे होत सामाजिक न्याय विभागाला की, संबधीत कामे हे दुसऱ्या कुठल्याच निधी अंतर्गत करण्यात आलेले नसुन किंवा हे आपल्या महानगरपालिकेच्या जागेच्यावरील आहे फक्त एक एन.ओ.सी. पाहिजे होती साहेब. फक्त एक एन.ओ.सी. द्यायला तीन महिने दिरंगाई झाली. शासनाने अस सांगितल की, बहुतेक तुम्हाला या कामांची गरज दिसत नाही. तर त्यांनी तो आलेला निधी वापस घेतला साहेब.

**मा.आयुक्त :-** सन २०१९-२० मध्ये.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सन २०१९-२० मध्ये आलेला निधी वापस गेलेला आहे. ८० लाख निधी वापस गेलेला आहे. आम्ही प्रयत्न करुन निधी आणायचा, पहिलेच आपली महानगरपालिकेची परिस्थिती अशी आहे. आपल्या महापालिका फंडामध्ये कोणीही ठेकेदार काम करायला तयार नाही. जर असच चालत राहिल तर शहराचा विकास होणार कुठुन साहेब. त्यावेळेस मी हा विषय सभेत घेणार होतो पण तुम्ही सांगितल आणि सदस्यांच्या आग्रहामुळे की आपला पुअरशो होईल म्हणुन तो विषय मी घेतला नाही.तुम्ही आम्हाला फक्त काय सांगतात माहिती आहे का साहेब, संबंधीत कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल सांगा साहेब, कामाच्या निष्काळजीमुळे कोणत्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही केली, एक कर्मचारी सांगा साहेब. आणि आमचे म्हणणे ही नाही आहे की, कर्मचाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे. काम वेळेत झाले पाहिजे साहेब.काम वेळेत नाही होणार तर मग फायदा काय ? आणि जर तुम्हाला काम वेळेत करुन घ्यायचेच नाही तर या सर्व गोष्टींची गरजच नाही.

**मा.आयुक्त :-** तीन चार ठिकाणी कार्यवाही झालेली आहे, दोन सॅनिटरी इन्स्पेक्टर आताच या कारणासाठी सस्पेंड झालेले आहे. वाहन विभाग प्रमुखांवर डिपार्टमेंटल ईनक्वायरी सुरु झालेली आहे त्याची बदली झालेली आहे. याही प्रकरणामध्ये जो सेक्युरिटीचा ठेका किंवा टेंडर उशीरा काढण्यासाठी प्रस्ताव दिला, त्याच्यावर ही जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही होईल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब, आमच म्हणण काय आहे माहिती आहे का? कर्मचाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे ते सस्पेन्ड झाले पाहिजे आमच म्हणण हे नाही. कर्मचाऱ्यांवर अंकुश असणे हे आपल पण काम आहे की, त्यांनी वेळेत काम केले की, नाही केले. मुळातच आमच म्हणण हे नाही की, त्यांना सस्पेन्ड केल पाहिजे, त्यांच्यावर कार्यवाही केली पाहिजे किंवा दंडात्मक कार्यवाही झाली पाहिजे. काम हे वेळेतच झाले पाहिजे साहेब तेव्हाच फायदा होईल साहेब. सस्पेन्ड केल्याने काय होणार आहे तेच महिना दोन महिना चार महिना सहा महिने सस्पेन्ड राहतो नंतर कोणतातरी साहेब सांगतो, कोणता तरी सभासद सांगतो, कोणी तरी सदस्य सांगतो कोणी तरी प्रशासन सांगतो आपण त्याला वापस कामावर घेतो.विषय तो नाही साहेब मुळात, जे थांबलेल काम, किंवा रद्द झालेल काम आहे ते वापस होत नाही.आमचा रोषच मुळात हा आहे की, कामं सगळे हे वेळेतच झाले पाहिजे.माझी तुम्हाला विनंती आहे की, तुम्ही स्वत: या गोष्टी मध्ये लक्ष घातल की, बरोबर होईल साहेब.

**मा.आयुक्त :-** ज्या कामाबद्दल सन्मा.सदस्यांनी ऐवढ तिव्र वक्तव्य केल, तर अश्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही निश्चित केलीच पाहिजे कार्यवाही कारण हा आपला हेतु नाही किंवा त्याच्यामध्ये आपल्याला इन्ट्रेस्ट आहे असे ही नाही. जेव्हा कोणाला अश्या पध्दतीने काम करण्याची ऐवढया वर्षात ही सवय लागत नसेल तेव्हा थोडस शिस्तभंगाचा विषय झालाच पाहिजे. मी तुम्हाला सुचना देतो की, स्थायी समितीला किंवा महासभेला जे प्रस्ताव पाठवत आहे ते आपल्याला बघायचे आहे. मान्यता मिळेलच हे गृहीत धरुन ज्या गोष्टी होतात असे होऊ नये. हे एक आत्ताचच उदहारण मी तुम्हाला सांगितल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** समझा, आम्ही अमान्य केला हा विषय, समझा, हा विषय अमान्य केला आम्ही, तर त्या सिक्युरिटीने जे महिनाभर काम केल त्याचे देयके कुठुन देणार तुम्ही.

**मा.आयुक्त :-** म्हणुनच मी म्हटलो की, हे गृहीत धरण्याचा जो प्रकार आहे ते होऊ नये म्हणुन हे आपल्याला वेळ संपण्याच्या पुर्वीच मान्यता दिली पाहिजे. नंतर निविदा बोलविणे. आता जो शिवाजी नगरचा विषय होता. माहिती जशी चुकीची दिली जाते. तो साईड बदलण्याचा विषय आहे. नविन पोल बांधणे. आता मला सभागृहात माहिती झाली की, आठ दिवस झाले प्रस्ताव पाठविलेला आहे. आता मी मुद्दाम कागदपत्रे मागविलेली आहे प्रस्ताव काल आला. पण सांगता काय आहे. आठ दिवसांपुर्वी प्रस्ताव आला. हे थोडे जे बेजबाबदारपणे सांगण्याची किंवा वागण्याची सवय आहे ही सवय कोणत्याही अधिकाऱ्यामध्ये दोन किंवा तीन महिन्यात झालेली नसते हे वर्षानुवर्ष चालत आलेल्या पध्दती आहे. ही पध्दत मोडायची असेल तर आपल्या सर्वांना प्रशासनाला शिस्त लावायची भुमिका घ्यावी लागणार आहे. शिस्त लावायला जशी वेळ लागते तसेच शिस्तीची बेशिस्ती सुध्दा एका दिवसात होत नाही.ही वर्षानुवर्ष चालत आलेली पध्दत आहे. कारण की, जानतेपणे अजानतेपणे आपणच दुर्लक्ष केलेले असते. तर आता यापुढे प्रशासनाच्या कामामध्ये गती आणण्यासाठी आपण हे प्रयत्न केलेच पाहिजे.

**मा.सभापती :-** आता जर भोसले साहेब म्हणत आहे की, फाईल आठ दिवसापुर्वी गेली, तर कुठल्या कार्यालयामध्ये कोण दोषी आहे त्याची चौकशी करावी.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** मी २२ तारखेला सही करुन आयुक्त साहेबांच्या कार्यालयात फाईल पाठवली, त्यांनी काल पुटअप केली ती आयुक्त साहेबांकडे.

**मा.आयुक्त :-** फाईल नुस्ती पाठवली.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** त्या अनुषंगाने बोललो मी.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ, ७ नंबर विषय मंजुर आहे ना.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो मंजुर.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २९९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर मनपा मालकीच्या मिळकतीच्या ठिकाणी सुरक्षारक्षक पुरविणेचे कामाचे शिवा सिक्युरिटी सर्व्हिसेस,जळगांव यांचे रक्कम रु.१३२६८/- मात्र दरमहा प्रति सुरक्षा रक्षक याप्रमाणे दरास स्थायी समिती ठराव क्रं.१७० दि.१४/११/२०१९ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार मक्तेदार यांना पत्र क्र.पवडी सा.बा./१४५ दि.२६/११/२०१९ अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार कामाची

मूदत१२ महिने म्हणजेच दि.३०/११/२०२० पावेतो देण्यात आलेली आहे. सदर सुरक्षा रक्षक पुरविण्याची मुदत दि.३०/११/२०२० रोजी संपत असल्याने उक्त कामाची नव्याने पुढील वर्षाकरीता ई-निविदा प्रसिध्द करणे आवश्यक आहे. सदर निविदेत खालील प्रमाणे मनपा मालकीच्या जागेवर सुरक्षा रक्षक नियुक्त करावयाचे आहेत.

| अ.नं. | कामाचे ठिकाण | सुरक्षा रक्षक संख्या | मंजुर दर | एका महिन्याकरीता एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १. | १७ मजली प्रशासकीय इमारत | ०५ | १३२६८/- | ६६३४०/- |
| २. | आयुक्त बंगला | ०६ | १३२६८/- | ७९६०८/- |
| ३. | हंजिर बायोमॅट्रीक | ०५ | १३२६८/ | ६६३४०/- |
| ४. | टि.बी.एस.हॉस्पीटल वाहन व्यवस्था | १५ | १३२६८/ | १९९०२०/- |
| ५. | जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्रं.०२ लाठी शाळेमध्ये | ०२ | १३२६८/ | २६५३६/- |
| ६. | MIDC भागात डिझेल पंपवर | ०३ | १३२६८/ | ३९८०४/- |
| ७. | गिरणा पंपीग स्टेशनवर | ०६ | १३२६८/ | ७९६०८/- |
| ८. | गेंदालाल मिल फायर ऑफिस जवळ पा.पु.ऑफिस गोडावून | ०२ | १३२६८/ | २६५३६/- |
| | एकुण :- | ४४ | १३२६८/ | ५८३७९२/- |

वर नमुद ठिकाणी एकुण ४४ सुरक्षा रक्षक पुरविण्याकरीता मंजुर दराप्रमाणे रक्कम रु.५,८३,७९२/- मात्रचा एका महिन्याकरीता खर्च अपेक्षीत आहे. असे १२ महिन्याकरीता रक्कम रु.७०,०५,५०४/- मात्र खर्च होणार आहे. सदर होणाऱ्या खर्चास इमारत व्यवस्था दुरुस्ती या लेखाशिर्षातुन करुन घेणेस लेखा संहिता २०११ मधील नियम १२३ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे तसेच नव्याने ई-निविदा प्रसिध्द करण्यास व ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो मागील मंजुर दरात मक्तेदार शिवा सिक्युरिटी सर्व्हिसेस,जळगांव यांचेकडून काम करुन घेणेस व सदर कामी मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ८ :-** जळगांव शहरासाठी वाघुर पाणी पुरवठा योजने अंतर्गत टाकण्यांत आलेल्या मुख्य जलवाहीनी १५०० मीमी ते ६०० मीमी पी.एस.सी. व ११६८ मीमी ते ४५७ मीमी एम.एस.पाईप लाईनची वार्षिक व्यवस्था व दुरुस्ती करणे कामी वार्षिक मंजुर मक्तेदार यांचेकडुन मंजुर दरात काम करुन घेणेस व जादा रक्कम रु.५ लक्ष मात्र खर्चाची तरतूद करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, प्रशासनाकडुन हा वार्षिक टेंडर दुरुस्तीसाठी आलेला आहे. म्हणजे जळगावकरांना अमृतच पाणी वर्षभर मिळणार नाही ह्या विषयातुन दिसत आहे. या बद्दल काय बोलाल आपण.

**श्री. सुशिल साळुंखे :-** विषय एक,अमृतच्या पाईप लाईन दुरुस्तीची, त्याच्यात पैसे शिल्लक नाही. जो आपला २५ लाखाचा निधी होता तो संपलेला आहे. कालावधी जो आहे त्या कालावधीत याला सर्व्हीसींग लागते, या कालावधीमध्ये जर काही काम हाती घ्याव लागल,आताच जर करण्यात आले, त्यासाठी ५ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** ते सर्व मान्य आहे आम्हाला पण त्याच्यामध्ये दरवर्षी आपण ही जी तरतुद करतो. या तरतुदीमध्ये तर एक नविन पाईप लाईन झाली असती अस आमच म्हणण आहे.

**श्री.सुशिल साळुंखे :-** २५ लाखात पाईप लाईन होऊ नाही शकत.

**सौ.ज्योती चव्हाण :-** इतक्या वर्षापासुन आपण ती तरतुद करतो आहे इतक्या वर्षाचा विषय आहे तो.

**मा.सभापती :-** ताईच म्हणण अस आहे की, आता पर्यंत याच्यावर जो खर्च झालेला आहे तेवढया मध्ये ही पाईपलाईन उभारली गेली असती.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो अस माझ म्हणण आहे. आणि पुढचा विषय लांबेल असे काही.

**मा.आयुक्त :-** अमृतचा जो विषय आहे आता साळुंखे यांनी क्लियर केला की, वाघुरची जी मुख्य पाईपलाईन आहे त्याच मेनटेनन्स आपल्याला कराव लागणार आहे. आता त्याच्या वर आपल्याला अमृतच पाणी मिळणार नाही इतका टोकाचा निर्णय काही योग्य नाही. आणि राहिला दुरुस्तीचा विषय, पाईप लाईन म्हटल्यानंतर काही मेकॅनिकल फॉल्ट आहे तेथे. त्याची दुरुस्ती आपल्याला करावी लागणार आहे. अशी कुठलीही पाईपलाईन आपल्याला मिळणार नाही की, ज्याच वर्षानुवर्ष मेनटेनन्स कराव लागणार नाही.मेनटेनन्स करणे आपल काम आहे.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती साहेब, आपण इतका खर्च करत आहोत. मी दिड वर्षापुर्वी आपल्याला बोललो होतो, खडके साहेब होते. गिरणा टाकी ते काव्यरत्नावलीचे टाकी भरण्याची मोटरी हे का घेतल्या जात नाही. आणि दररोज काव्यरत्नावलीच पाण्याच जलकुंभ किती भरला जातो.

**श्री. सुशिल साळुंखे :-** काव्यरत्नावलीतील जलकुंभ हा भाऊच्या उद्यानातुन आहे, आणि १०० कोटीच्या निधीत हा प्रस्तावीत होता,दोन नविन मोटरीचा ते १०० कोटीच्या निधीत, त्याच्यानंतर काही मान्यता आली नाही. त्यामुळे तो प्रस्ताव पेन्डींग आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मी बोललो होतो साहेब की, तो निधी येणार नाही आता त्या जलकुंभात १ मिटर पाणी भरल जात.लोकांना पाणी येत नाही. त्या काव्यरत्नावलीच्या जलकुंभावरुन मोठा परिसर आहे. काही कॉलन्यांमध्ये उंच सक्रल परिसर आहे. काही कॉलन्यांमध्ये पाणी जात नाही. तुम्ही एक तासाच्या वर पाणी देत नाही. काही भागात तुम्ही ८ तास देतात. आमच्या भागात तुमचा इंजिनिअर १ तासाच्यावर पाणी द्यायला तयार नाही.याच काय उत्तर आहे.

**श्री. सुशिल साळुंखे :-** विषय कसा आहे, तो भाग उभारण्यासाठी त्या दोन्ही मोटरी बाहेर काढलेल्या आहे. त्याच्या त्या जुन्या मोटरींच डिस्चार्ज चांगला आहे त्याच्याने ती भरली जाते. पण ते ७० फुटच्या वरती असल्यामुळे एक स्टॅण्ड बाय मोटर चालु ठेवावी लागते. कारण आपण काय केलेल होत. प्रस्तावात नविन बोलेल्या होत्या म्हणुन याच्याकडे दुर्लक्ष झाल. फक्त प्रस्ताव मंजुर न झाल्यामुळे ते काम पडलेल आहे. पण आता आम्ही ते मनपा फंडातुन प्रस्तावीत केलेल आहे.

**श्री.नितीन बरडे :-** वर्षानुवर्ष हेच चालु आहे, ३ वर्ष झाले भांडत आहे, खडके साहेब म्हटले नविन मोटरी येत आहे. नविन मोटरी येत आहे. अजुन पर्यंत घेतल्या जात नाही. मग पाणीपट्टी भरायची का ?

**सौ.ज्योती चव्हाण :-** दर आठ दिवसाने हा त्रास होता आम्हाला.

**मा.आयुक्त :-** अमृत मध्ये काय आहे याची व्यवस्था.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब, पुढच मी सांगतो ना. अमृत मध्ये आपण तेथे सम आहे, काव्यरत्नावली चौकात, त्या समवर आता ओट ठेवण्याच काम चालु आहे. तो सम लिकेज आहे थोडासा, त्याच दुरुस्तीच काम आहे. त्याच्यामुळे ते मोटरीच काम होत नाही.त्या समचही अजुन काम होत नाही. का होत नाही ते यांनी मला सांगाव प्रकल्प अधिकाऱ्यांनी, आणि गिरणा टाकीवर दोन मोटरी आहे. त्या मोटरी का बदलल्या जात नाही. आज ४० वर्षापुर्वीच्या मोटरी आहे त्या. कसे काय काम करतील त्या मोटरी ? समच काम का होत नाही?

**प्रकल्प अभियंता, श्री. योगेश बोरोले :-** समच्या कामात पाहव लागेल की, ते कुठुन येत पाणी आधी.

**श्री.नितीन बरडे :-** काय करता तुम्ही जेव्हा पाईप काटता तेव्हा. फक्त अग्निशामकचा पंप तेथे आणुन ठेवलेला आहे.

**प्रकल्प अभियंता, श्री. योगेश बोरोले :-** आम्ही ते पाणी चेक केल, ते पाणी प्युअरच होत म्हणजे कुठेतरी त्या पाईप लाईनीत दुसऱ्या पाईपलाईनीच पाणी लिक असेल आणि ते पाण्याच्या सममध्ये येऊन जमा होत. म्हणुन आम्ही पहिले या सुचना दिल्या की, पहिले आपल्या जी टाकी भरणाऱ्या लाईन आहे. त्याच जर काही लिकेज असतील तर ते काढुन घ्याव. जेणे करुन त्या लिकेजची पोझीशन कळुन जाईल आपल्याला. तो नॉर्मल लिकेज आहे त्याच्यामध्ये तो १ मिटर भरतो पण त्याच्यात फक्त प्युअर वॉटर येत कुठल्याच प्रकारच गडुळ पाणी त्याच्या मध्ये नाही. त्याच्यात आजुबाजुच्या ही लाईनी आहे त्याच्या बद्दलही चर्चा झाली. त्या ठिकाणी भाऊच उद्यान तयार होऊन गेलेल आहे सगळ. आणि त्या ठिकाणी ते तपासणे त्यांना थोडस जड जाईल.

**श्री.नितीन लढढा :-** नाही पण दुरुस्त करण्याच्या संदर्भातल काय ?

**प्रकल्प अभियंता, श्री. योगेश बोरोले :-** दुरुस्तीच बघु.

**श्री.नितीन लढढा :-** नाही, समझा पाईप लाईन लिकेज आहे किंवा पाईप लाईनच्या लिकेज मधुन पाणी तेथे येत असेल.

**प्रकल्प अभियंता, श्री. योगेश बोरोले :-** टाकी जी आहे ती भरत राहते. त्या पाईपलाईन चालु असतात खालुन सगळया.

**श्री.नितीन बरडे :-** मी सांगतो ना, तुम्हाला माहित नसेल तर मी सांगतो.साहेब ती जी काव्यरत्नावलीची जी टाकी आहे. तिथुन समोर अधिकाऱ्यांचे बंगले आहे जजचे बंगले आहे. त्यांच्या स्पेशल लाईनी आहे. टाकी जो पर्यंत भरलेली राहते तो पर्यंत त्यांच्या बंगल्यात पाणी राहत. कुठेतरी त्या लाईनी लिकेज आहे. ते पाणी तेथे उतरत आहे. म्हणजे अधिकाऱ्यांच्या बंगल्यांना तुम्ही आठ आठ तास पाणी देत आहे. आम्हाला एक तास द्यायला तयार नाही.

**मा.आयुक्त :-** या एक दोन दिवसांमध्ये आपण एम.जी.पी.चे अधिकारी, त्याच मधल लिकेज. आणि समच्या स्वत:चे काही दुरूस्त्या करायचे आहे. त्याच नियोजन काय करतात ते टेक्नीकली हे आपण बघु. कारण आता जो अमृत योजनेमध्ये काव्यरत्नावलीचा सम आहे ते कायम ठेवायच. ते आपण काही डिस्कार्ट करणार नाही. आता त्याचे जे लिकेज आहे ते काढावे लागणार आहे. आणि हे सांगत आहे ते फ्रेश वाटरच लिकेज आहे. ते लिकेज कुठुन येत आहे ते ही आपण बघु या.

**श्री.नितीन बरडे :-** जमिनीतुन पाणी आल की, फ्रेशच येतो ते. गडुळ येतच नाही.

**मा.आयुक्त :-** ते आपण जागेवरती पाहु. आणि एम.जी.पी.च्या सांगण्यावर त्याच्यामध्ये काय दुरूस्ती करावी लागणार आहे ते करु या.

**श्री.नितीन बरडे :-** हा भाग वेगळा साहेब, आता तात्परता जात नाही. हा नविन विषय आहे. हा नविन होणारा विषय आहे. म्हणजे आयुष्यभर आमच्या नागरीकांनी पाण्यासाठी टकटकच करायची.

**श्री.नितीन लढढा :-** त्या दोन मोटरींची किंमत किती. ज्या नविन दोन मोटरी घ्यायच्या आहे.

**श्री.सुशील साळुंखे :-** २५ लाखाच प्रस्ताव आहे फक्त तो आपण १०० कोटीनंतर मनपा फंडातुन प्रस्तावीत केलेला आहे आता.

**श्री.नितीन लढढा :-** आता २ ते २.२५ कोटी निधी २५ कोटी निधीतील शिल्लक आहे ना.

**सौ.ज्याती चव्हाण :-** १४ व्या वित्त आयोगातील.

**श्री.नितीन लढढा :-** नाही नाही. २५ कोटी निधी मधला. स्मशानभुमी आणि ट्रॉफिक गार्डनचा. त्यात प्रस्तावीत करुन मार्गी लावा ना.

**श्री.सुशील साळुंखे :-** भाऊ, तसा विषय नाही. आयुक्तांनी त्याची मंजुरी दिलेली आहे. त्यासाठी कार्यादेश दिले गेलेले आहे. काव्यरत्नावली चौकात त्या पंपांची डिलेव्हरी होऊन गेलेली आहे. पंप साईटवर ऑलरेडी येऊन पडलेले आहे फक्त या समच्या कामामुळे ते लेट होत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** पंपाचा भाग वेगळा, आज तुम्ही ते जलकुंभ रोज चालविता आहे तो.

**श्री.सुशील साळुंखे :-** एक नविन पंप मनपा फंडातुन प्रस्तावीत करुन ते आपण करु.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मोटरच नविन घ्या ना.

**मा.आयुक्त :-** नितीन भाऊ काय म्हणत आहे. गिरणा टाकीचे जे दोन पंप आपण १०० कोटीतुन प्रस्तावीत केले गेले आहे. ते काही कारणास्तव मंजुर होत नाही. त्याच्यासाठी जो लागणारा निधी आहे या २.२५ कोटीच्या निधी मधुन करावा. मुद्दा असा आहे की, आता हे दोन पंप खरेदी करण्याची आवश्यकता आहे का ? अमृतच्या जे तुमचे मेकॅनिकल आणि ईलेक्ट्रीकलचे जे सगळे पंप येणार आहे. त्याच्यापासुन.

**श्री.सुशिल साळुंखे :-** ते पंप येऊन गेलेले आहे.

**मा.आयुक्त :-** नविन पंप खरेदी करण्याची गरज आहे का ?

**श्री.सुशिल साळुंखे :-** फक्त एक पंप आपल्याला नविन घ्यावा लागेल.

**मा.आयुक्त :-** तो पंप जर अमृत मध्ये येत नसेल तर अमृत मध्ये तुम्हाला रिव्हाईज करता येईल त्यामध्ये शिल्लक निधी असेल. तर घेता येईल नसेल तर एका पंपाला जेवढा निधी लागणार आहे तो आताचे २.२५ कोटीच्या निधी मधुन मंजुर करा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आणि हा होणारा त्रास सगळया कॉलन्यांना होतो ते बंद होईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आयुक्त साहेब, आता याच विषयी वाघुरच्या दुरुस्तीचे कामे जे तुम्ही काढत आहे. मान्यता घेत आहे. साहेब आपला रेमण्ड चौफुली ते अजिंठा चौक त्यापर्यंत तीन ठिकाणी पाईप लाईन फुटलेली आहे. कधी कधी वाहत तेथे पाणी, तर त्याचे दुरुस्तीचे ही काम आहे का याच्यात. तर ते पाहुन घ्या.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सदर विषय मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३०० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहरासाठी वाघुर पाणी पुरवठा योजने अंतर्गत टाकण्यांत आलेल्या मुख्य जलवाहीनी १५०० मीमी ते ६०० मीमी पी.एस.सी. व ११६८ मीमी ते ४५७ मीमी एम.एस.पाईप लाईनची वार्षिक व्यवस्था व दुरुस्ती करणे कामी कामाचे कार्यादेश मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे,जळगांव यांना देण्यात आले असुन कामाची मुदत दि.२९/०१/२०२१ पर्यंत आहे. तथापी अर्थ संकल्पात वाघुर पाणी पुरवठा व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षका अंतर्गत रु.२५.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली होती. आजमितीस रक्कम रु.२४,२५,८७९/- खर्च वजा जाता रक्कम रु.७४,१२१/- मात्र इतका निधी शिल्लक आहे. आणि यापुढील दुरुस्ती करिता येणाऱ्या वार्षिक खर्चाची निविदा प्रक्रिया सुरु आहे. मात्र त्यास काही कालावधी लागणार असल्याने सदर कामी तसेच नविन कार्यादेश निर्गमीत होईपर्यंत अकस्मित काम निघाल्यास नियोजनानुसार पाणी वितरणास व्यत्यय येऊ नये म्हणून वाढीव खर्चाची तरतूद करणे आवश्यक आहे. वाघुर पाणी पुरवठा योजने अंतर्गत पाईप लाईन दुरुस्तीकामी रु.५.०० लक्ष मात्र जादा खर्चाची तरतूद पाणी पुरवठा व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षकातून करणेस व सदर लेखाशिर्षकातील शिल्लक रक्कमेतून मंजूर मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे,जळगांव यांचेकडून वाघुर पाईप लाईन दुरुस्तीचे काम करुन घेणेस तसेच रक्कम रु.५ लक्ष मात्रच्या वाढीव खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ९ :-** आर.सी.एच.अंतर्गत कार्यरत असलेल्या ४ वैदयकीय अधिकारी व एक परिचारीका यांना सन २०२१ साठी पुन:नियुक्ती देण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय, एक परिचारीका आहे योगिता बबन बाविस्कर, जे.एन.यु. मध्ये काम केलेल आहे. कोविड सेंटरला काम केलेल आहे त्यांनी. पण त्यांच मानधन रु.९६००/- आहे. जे.एन.यु. मध्ये जे काम करत आहे त्यांचा पगार रु. १८०००/- आहे. त्यांना पण तेच लागु करण्यात यावा. त्यांना नगरपालिका फंडातुन अस आपण देतच आहे. कारण ते वरतुन येता ते पैसे ते तिकडेच कट होतात. तफावत होईल त्या फंडात. ते नगरपालिका फंडातुन लागु करण्यात यावा.

**वैद्यकीय अधिकारी, श्री.रावलाणी :-** सन्मा.सभापती आणि सभागृह योगिता बाविस्कर ही २००८ पासुन परिचारिका आहे. ते सर्व प्रकारचे काम करतात, एन.यु.एच.एम.चे पण काम करतात आणि आर.सी.एच.पण करतात. त्यांच आपण मनपा फंडातुन मानधन देतो. बाकी इतर जे एन.यु.एच.एम.चे परिचारिका आहे त्यांच मानधन शासन देतो. त्यांच जे रिव्हाईस झालेल आहे. मानधन आहे ते सर्व रु.१८००० /- आहे. त्यांनी मागणी केलेली आहे तर पुढच्या सभेमध्ये केले तर किंवा सभागृह जे निर्णय देईल ते.

**सौ.ज्योती चव्हाण :-** नाही नाही, ते तस नाही साहेब, एन.एच.यु.एम. अंतर्गत ज्या परिचारिका लागले. एन.एच.यु.एम. शासनाकडुन आणि ही जी परिचारिका आहे आपल्याकडे योगिता बाविस्कर इला रु.९०००/- मानधन मिळत. आणि या परिचारिक्यापेक्षा सिनियर आहे. आणि या नंतर लागलेल्या ज्या परिचारिका आहे यांना रु. १८०००/- मानधन मिळत आहे. तर या परिचारिकेच म्हणण आहे मला पण तेवढच मानधन मिळायला पिहिजे. हा विषय आहे.

**श्री.नितीन लढढा :-** समान काम, समान वेतन.

**सौ. ज्योती चव्हाण :-** आणि सिनियरीटी आहे उलट तिची.

**श्री.नितीन लढढा :-** तिच्यावर हा अन्याय होत आहे. कारण याचा निधी शासनकडुन मिळतो आपल्याला. आणि इला जे मानधन देतो आहे आपण ते मनपा फंडातुन देतो आहे. तर रु. ९६००/- आणि रु. १८०००/- याच्यात दुप्पटीची तफावत आहे. तीला मनामध्ये अस वाटत की, मी त्यांच्या बरोबरीच काम करते किंवा त्यांच्यापेक्षा जास्त

काम करते. परंतु मला निम्या वेतनावरती काम कराव लागत. तर या अनुषंगाने सर्व सभासदांच म्हणण अस आहे की, तिला सुध्दा जी.एन.यु.च्या अंतर्गत मिळणारे जे मानधन असेल तितकच मानधन आपण मनपा फंडातुन या परिचारिकेला देण्यात याव.

**मा.आयुक्त :-** आता उपायुक्त सांगत आहे त्याप्रमाणे जी.एन.यु.चे ज्या परिचारिका आहे त्यांना मानधन शासन देतो. आता नितीनभाऊ म्हणत आहे त्याप्रमाणे हीच एक अशी कर्मचारी आहे जीच ८-१० वर्षापासुन मानधन महानगरपालिका देत आहे. त्यामुळे तिच मानधान वाढविण्याचा अधिकार हा आपला आहे. मनपा फंडातला असल्यामुळे, त्यांच मानधन किती असावे असे आपण स्थायी समिती मध्ये ठरवु ही शकतो. परंतु मागच्या महासभेमध्ये आपण एका, मला वाटत नेवे डॉ.नेवे त्यांचाही आपण असाच प्रस्ताव ठेवला होता तो आपण प्रलंबित ठेवला होता. त्यांची अशीच मागणी होती की, इतरांना आर.सी.एच. मधल्या इतरांना जितक मानधन आहे तेवढ आम्हाला द्याव. परंतु त्याच्यावर महासभेने काही निर्णय घेतलेला नाही. ते ही अस आहे की, मानधन ठरविण्याचा अधिकार महासभेला आहे मनपा निधीतुन. आता मला वाटत ही पण एक सिमिलरच केस आहे. पण आपण जे म्हणत आहे की, एन.यु.एच.एम. मध्ये त्यांना रु.१८०००/- मिळत. आता मला वाटत ते रु.१८०००/- लागु नाही झााल, प्रस्तावीत आहे. तपासुन घेऊ आपण की, त्या धरतीवर यांना देता येईल का ? निर्णय आपल्याला घ्यावा लागणार आहे. शासनाच मानधन आहे, हे एन.यु.एच.एम. ला आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** ते आर.सी.एच. पण एन.यु.एच.एम. मध्ये मरज झाल आहे अशी ही माहिती मिळालेली आहे. ते काही बरोबर आहे का मग.

**मा.आयुक्त :-** एन.यु.एच.एम.मध्ये जरी असल तर स्टॉफच्या बाबती मध्ये एन.यु.एच.एम.ला आपल्याला अनुदान मिळत नाही. स्टॉफ आपलाच नेमायच आहे म्हणुन महासभेने ठराव करुन दिलेला आहे आपल्याला. याच्यात नेमण्याची जबाबदारी, मानधनाची जबाबदारी आम्ही घेऊ. आता याच्यावर शासन आपल्याला देत नाही. आता त्याच्यामध्ये त्यांचा मानधनाचा निर्णय आपल्यालाच घ्यावा लागणार आहे. तरी आमची ही सुचना आहे सभागृहामध्ये की हे मान्य करण्यात यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना साहेब की या सभागृहाची मागणी आहे की, या एन.यु.एच.एम. मधुन जे रु.१८०००/- इतर कर्मचाऱ्यांना मिळातात. त्यांच्याच बरोबरीने किंवा त्या जे सेवा देतात त्याच प्रकारच्या सेवा या कर्मचारी सुध्दा देत आहे. तर रु. ९०००/- मानधन जे आहे हे त्यांना तोकडं वाटत. या दृष्टीकोणाने सभागृहाने याच्यावर विचार करुन याच्यावरती निर्णय घ्यायला पाहिजे की, अश्या पध्दतीत त्या बरोबरीच अनुदान आपण आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमातुन त्यांना द्यायला पाहिजे. आपण निर्णय घेतला तर प्रशासन देखील अंमलबजावणी करेल. द्यायच असेल तर तसा प्रस्ताव आपण द्यावा आणि सर्वानुमते मंजुर करावा. जेणे करुन त्या कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही. तिच्या मनात ही भावना राहणार नाही.जेव्हा काम बरोबरीने करत आहे. आणि मानधन निम्मे मिळत असेल. तर कोणाच्याही मनामध्ये त्या भावना निर्माण होतील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नितीनभाऊंच्या म्हणण्याप्रमाणे तसा प्रस्ताव पाठवुन मंजुर करण्यात याव.

**श्री.नितीन लढढा :-** नाही तर एक काम करा. सभापती महोदय, आपण तो प्रस्ताव प्रशासनाला द्या.प्रशासन त्याची सगळी कायदेशीर आणि वैधानिक बाबी तपासुन तसा प्रस्ताव पुढच्या स्थायी समिती सभेमध्ये पाठवावा.

**मा.आयुक्त :-** मला अस वाटत पहिले आपण याला मान्यता देऊ.

**श्री.नितीन लढढा :-** ते तर देतच आहे.

**मा.आयुक्त :-** राहिला फक्त मानधनाचा विषय तर त्याची तपासणी करुन जर आपल्याला योग्य वाटल, पुढच्या सभेमध्ये आपल्याला मानधन देता येईल. तर आता ते मानधन कुठल्या तारखेपासुन वाढुन द्यायच हा निर्णय.

**श्री.नितीन लढढा :-** ती आता करंट तारखेपासुन आहे. याच्या पुढे ते पगार लागु होईल त्यांना.

**मा.सभापती :-** पुढच्या सभेमध्ये घेऊन घेवु.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, आता जळगांव शहराचा विस्तार पाहिल्यानुसार हे जे चार अधिकारी आहे ते कमी पडत आहे. यांच्यावर जास्त बोझा आहे. तर याच्यात आपल्याला आणखी संख्या वाढविता येईल का ? हे सर्व्हे करायला लावा. आणि आपल स्लम ऐरिया समता नगर झाल, निमखेडी झाल, एम.आय.डी.सी.सुप्रीम कॉलनी या भागात आपल्याला दवाखान्यांची गरज आहे. अधिक अधिकाऱ्यांची. तर तेथे आपल्या महापालिकेमार्फत करता येईल का ? आपले अधिकारी तेथे ठेवुन. त्याचा एक सर्व्हे करायला सांगाव. तेथे चार डॉक्टर आपण नेमले आहे त्यांची संख्या वाढवावी.

**मा.सभापती :-** आता जळगांव शहराच्या लोकसंख्याचा विचार केला तर चार डॉक्टर जळगांव शहरामध्ये पुर्ण सर्व्हे करुन कुठल्या कुठल्या भागांमध्ये दवाखान्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने अजुन विचार करुन सर्व्हे करुन डॉक्टर वाढविण्याचा विचार करा.
**श्री.नितीन लढढा :-** फक्त चार डॉक्टर सेवे मध्ये आहे अस नाही ना सर इतर ही डॉक्टर सेवेमध्ये आहे ना सर. यांना तर मानधनावर ठेवलेल होत.
**मा.सभापती :-** मानधनाच्या बेसवर.
**मा.आयुक्त :-** आपण जे आकृतीबंध पाठविलेला आहे त्याप्रमाणे करा.
**मा.सभापती :-** योगिता बाविस्करचा हा जो विषय आहे प्रशासनाने पुढच्या सभेत घेण्यात यावा.
**श्री.नवनाथ दारकुंडे:-** सदर विषय मान्य आहे.
**श्री.किशोर बाविस्कर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव अंतर्गत मनपा एकात्मिक आरोग्य कुटुंब कल्याण सोसायटी (RCH Phase-२) अंतर्गत चार वैदयकीय अधिकारी हे २०१० पासून तसेच १ परिचारीका २००८ पासून कार्यरत आहे. महासभा ठराव क्र.५६ दि.२८/११/२००७ अन्वये सदर RCH Phase-२ योजना राबविण्या करीता सदर वैदयकीय अधिकारी व परिचारीका यांची पदे भरण्यास व सदर पदावरील वेतना पोटी सन २००८-०९ मध्ये ५०% सन २००९-१० मध्ये ७५% व एप्रिल २०१० नंतर वेतनावर होणारा संपुर्ण खर्च महानगरपालिका निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तसेच RCH Phase-२ अंतर्गत वैदयकीय अधिकारी यांना पत्र क्र./राकुका/अर्बन/RCH/कक्ष१७/१६७३५-३७/०६ दि.१४/०३/२००६ अन्वये मंजुर पदांनुसार दै.लोकमत दि.२३/१०/२०१० चे जाहिर प्रसिध्दीनुसार सदरची पदे भरण्यात आलेली आहे. तसेच स्थायी समिती ठराव क्र.२११ दि.०३/०१/२०२० अन्वये दि.०२/०१/२०२० ते दि.३१/१२/२०२० या कालावधी करीता नियुक्ती करण्यात आलेली होती. परंतु त्यांचा सदर करार दि.३१/१२/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने खालील वैदयकीय अधिकारी व परिचारीका यांनी त्यांची पूढील पुन:नियुक्ती मिळणेबाबत अर्ज केलेले आहेत.

| अ.क्रं. | वैदयकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नांव | कार्यरत असलेल्या हेल्थपोस्ट व दवाखान्याचे नांव |
|---|---|---|
| १. | डॉ.पल्लवी प्रभाकर नारखेडे, वैदयकीय अधिकारी | शाहिर अमर शेख दवाखाना, सुभाष चौक हेल्थपोस्ट |
| २. | डॉ.पल्लवी किसनराव पाटील, वैदयकीय अधिकारी | म.मो.मुलतानी दवाखाना, मेहरुण गावठाण हेल्थपोस्ट |
| ३. | डॉ.सोनल गिरीष जोशी, वैदयकीय अधिकारी | नानीबाई अग्रवाल दवाखाना, इंडिया गॅरेज हेल्थपोस्ट |
| ४. | डॉ.सायली चंद्रकांत पवार, वैदयकीय अधिकारी | शिवाजी नगर हेल्थपोस्ट |
| ५. | योगिता बबन बाविस्कर, परिचारीका | पिंप्राळा हुडको दवाखाना, पिंप्राळा हेल्थपोस्ट |

वर नमुद १ ते ५ कर्मचारी हे त्यांचे नांवा समोर दर्शविलेल्या ठिकाणी कार्यरत असून, त्या ठिकाणी OPD, गरोदर माता (ANC), यांची दैनंदिन तपासणी तसेच वेळोवेळी राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यात येत असतात. सदा.नियमित लसिकरण, वार्षिक लसिकरण मोहिम, जननी सुरक्षा योजना, प्रधान मंत्री मातृत्व वंदना योजना, मिशन इंद्र धनुष्य यासारख्या कार्यक्रमांसाठी सदर वैदयकीय अधिकारी व कर्मचारी हे आपली नित्य सेवा देत असतात. तसेच जागतिक महामारी कोव्हिड-१९ हया साथ रोगाचा जळगांव शहरात जास्त प्रमाणात प्रादुर्भाव झालेला असता त्या काळातही त्यांनी अहोरात्र आपली सेवा देवून कर्तव्य बजावलेले आहे. तसेच यापूर्वी ही वैदयकीय अधिकारी यांचे मनुष्यबळ कमी असल्याने वरील चार वैदयकीय अधिकारी व एक परिचारीका यांना खालील प्रमाणे त्यांच्या एकूण मानधनावर ५% वेतनवाढ देवून त्यांना दि.०१/०१/२०२१ या एक दिवसाचा खंड देवून दि.०२/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधी करीता पुन:नियुक्ती देणेस

मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मानधनावरील खर्च हा RCH कर्मचारी वेतन मनपा हिस्सा या लेखाशिर्षामधून करणेत यावा.

तसेच प्रशासनाने योगिता बबन बाविस्कर, परिचारीका यांना NUHM अंतर्गत दिल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यां प्रमाणे मानधन देणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव पूढील सभेत सादर करावा.

| अ. क्रं. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | मुळ मानधन | प्रस्तावीत ५% नुसार वाढीव मानधन | पुर्ननियुक्तीचा कालावधी व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ.पल्लवी प्रभाकर नारखेडे | वैदयकीय अधिकारी | ३१४९४ | ३३०६९ | दि. ०२/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ |
| २. | डॉ.पल्लवी किसनराव पाटील | वैदयकीय अधिकारी | ३१४९४ | ३३०६९ | |
| ३. | डॉ.सोनल गिरीष जोशी | वैदयकीय अधिकारी | ३१४९४ | ३३०६९ | |
| ४. | डॉ.सायली चंद्रकांत पवार | वैदयकीय अधिकारी | ३१४९४ | ३३०६९ | |
| ५. | योगिता बबन बाविस्कर | परिचारीका | ९६२३ | १०१०४ | |

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. १० :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२१ करीता स्थायी समिती ठराव क्रं.२७७ दि.१५/०९/२०२० अन्वये श्री.पवन पंढरीनाथ चौधरी यांची कंत्राटी तत्वावर सिटी कॉर्डीनेटर म्हणून जळगांव शहर महानगरपालिकेत अटी शर्तीस बंधनकारक राहुन कंत्राटी तत्वावर ६ महिने करीता तात्पुरती नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आलेली आहे तथापी उपरोक्त ठरावामध्ये प्रस्तावास झालेला विलंब व झालेल्या अनियमितेबाबत आक्षेप नोदविण्यात आलेला असल्याने सदर आक्षेप ठरावातून वगळणेबाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव स्थायी समिती ठराव क्रं.२८६ दि.२४/११/२०२० अन्वये तहकूब करण्यात आलेला होता सदर तहकूब प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, हा मागच्या स्थायी समिती मध्ये हा प्रस्ताव आला होता. त्याचही तेच कारण आहे की, उशिरा आला. तेच आपली चर्चा गेल्या एक दिड तासापासुन चालु आहे. अनियमितता आपल्याला दिसली त्याच्यामध्ये.

**मा.सभापती :-** अनियमितता शब्द आहे त्याच्यामध्ये तर अनियमित्ता हा शब्द वगळुन हा ठराव मंजुर करायचा.

**श्री.नितीन लढढा :-** तो शब्द वगळुन ठराव मंजुर करायचा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** स्वच्छ भारत ही आपली पंतप्रधानांची जी योजना आहे, ते शहरात काय काम करतात त्याच थोडक्यात त्यांनी सांगाव आम्हाला.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** सिटी कॉर्डिनेटर शासनाकडुन नेमण्यात येतात. स्वच्छ भारत संबंधीत जे काही अडचण आहे, एम.आय.एस. वगैरे एल.जी.सी.चे जे आदेश आहे. केंद्र शासनाची जी आपण योजना राबवली याची ती माहिती संकेतस्थळावर अपलोड करण्याचे ते काम करतात.

**श्री.नितीन लढढा :-** सिटी कॉर्डिनेटर म्हणुन आहे. राज्य शासन, केंद्र शासन आणि महानगरपालिकेच्या संदर्भातल.

**मा.आयुक्त :-** त्यांची जागा शासनाने निश्चित केलेली आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सदर विषय मान्य आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, श्री.पवन पंढरीनाथ चौधरी यांची कंत्राटी तत्वावर दि.०१/०४/२०२० ते दि.३०/०९/२०२० या ६ महिन्या करीता कंत्राटी तत्वावर तात्पुरती नियुक्ती करणेबाबतच्या स्थायी समिती ठराव क्रं.२७७ दि.१५/०९/२०२० मध्ये प्रशासनाने प्रस्ताव विलंबाने सादर करणे तसेच प्रस्ताव

सादर करण्यामध्ये झालेली अनियमितता इत्यादीबाबत भविष्यात शासकीय लेखा परिक्षणात काही आक्षेप आल्यास अथवा काही कायदेशिर बाबी उपस्थित झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असा आक्षेप नोंदविलेला असून सदर आक्षेप ठरावातून वगळणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तरी श्री.पवन पंढरीनाथ चौधरी यांना त्वरीत उपरोक्त दि.०१/०४/२०२० ते दि.३०/०९/२०२० याकालावधीतील देय्य रक्कम अदा करणेची कार्यवाही करावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव :- विषय क्र. ११ :-** जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव मधील सन २०२०-२१ साठी विविध विभागांना लागणारी ऑफसेट छपाई वार्षीक दर कराराने करणेकामी छपाईदारांचे आलेले दर निश्चित झालेल्या दरात छपाई करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.३८,४१,७२८/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आपले नगरसेवकांच्या डायऱ्यांबाबत मागील मिटींग मध्ये बोलेले होते. तर डायऱ्यात त्यांनी ते प्रस्ताव पाठवा. डायऱ्या आपल्या नगरसेवकांना येतच नाही.काय काम होत तुमच काय नाही.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे पुर्वी कस आहे आरोग्य विभाग, पाणी पुरवठा विभाग, आणि त्याच्यामुळे संबंधीत भागातील जे काही तक्रारी असतील. त्या तक्रारींच निवारण झाल असेल किंवा झाल नसेल या अनुषंगाने प्रत्येक नगरसेवकाकडे या विभागाचा ए.एस.आय. असेल किंवा विद्युत निरिक्षक असेल किंवा पाणी पुरवठयाचा कनिष्ठ अभियंता असेल. त्या डायऱ्या गेल्यानंतर काही तक्रारी असतील त्या तक्रारी नगरसेवक त्याच्यामध्ये नोंदुन द्यायच्या आणि पुढच्या वेळेस तक्रारींच निवारण झाल की नाही याची खात्री करायचा. अश्या पध्दतीने त्या डायऱ्यांचा कार्यक्रम राबविला जात होता. परंतु काही काळापुर्वी तो बंद करण्यात आलेला आहे. तर त्यांच म्हणण आहे की, वार्षिक छपाईच्या टेंडरमध्ये तश्या प्रकारच्या डायऱ्यांची छपाई करुन तश्या प्रकारच्या नगरसेवक डायऱ्या ज्या आहे ते पुनश्च: सुरु करण्यात याव अश्या संदर्भातली सुचना आहे.

**भांडारपाल, श्री. दिनानाथ भामरे :-** डायऱ्या छापलेल्या आहेत. शिल्लक आहे आपल्याकडे आता.

**मा.आयुक्त :-** तर तुम्ही या सर्वांशी परिचित आहे.

**भांडारपाल, श्री. दिनानाथ भामरे :-** हो आहे.

**मा.आयुक्त :-** आता आपण श्रीगणेशाची वाटत बघत बसु आणि चांगली वेळ पाहुन सुरु करु.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मग शिल्लक आहे तर देत का नाही.

**मा.आयुक्त :-** तातडीने वाटप करायला लावु १ जानेवारी पासुन डायऱ्या लावु सुरु करायला.

**श्री.नितीन बरडे :-** सर आम्हाला सर्वांचे नविन नंबर द्या कोणाचेच फोन लागत नाही. एकही अधिकाऱ्याचा फोन लागत नाही. बिल नाही भरल्यामुळे फोन बंद झाले.

**मा.आयुक्त :-** विषय बिल भरण्याचा नाही आहे. जी ग्रुप सर्व्हीस आपण घेतलेली होती ती बंद केलेली आहे. आता सर्वांना नविन नंबर घेऊन देऊ.

**श्री.प्रशांत नाईक :-** ज्याचा फोन बंद राहील त्याच्यावर कार्यवाही करायच नियोजन ठेवा साहेब.

**मा.आयुक्त :-** खाजगी फोन आहे म्हणुन कार्यवाही नाही करता येणार.

**नगरसचिव :-** प्रस्ताव मान्य आहे का ? नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** हो.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव मधील सन २०२०-२१ साठी विविध विभागांना लागणारी ऑफसेट छपाई वार्षीक दर कराराने करणेकामी ई-निविदा सुचना

क्रं.२०/२०२०-२१ (Tender ID २०२०- JCMC-६०४३१२-१) http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने मुदतीत पाच निविदा प्राप्त झालेल्या आहेत. आयुक्त यांच्या दि.१९/११/२०२० च्या मान्यतेने ०५ निविदाधारकांपैकी पात्र झालेले ०४ निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता मधील सदर निविदेतील १६१ बाबीं पैकी ०७ बाबींचे छपाईदारांचे दर सारखे आलेले असल्याने दि.०३/१२/२०२० च्या पत्रान्वये सदर छपाईधारकांनी बंद लिफाफ्यात पुनश्च सदर बाबींचे दर सादर केले आहेत. त्या अनुषंगाने चारही छपाईदारांनी सादर केलेले दरपत्रकान्वये सारखे दर असलेल्या ०७ बाबींच्या दरास तसेच उर्वरीत १५४ बाबींचे दरासह बाब क्रं.१ ते १६१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्वात कमीचे बाबनिहाय १)गिताई रुलर्स ॲन्ड प्रिंटर्स, २)ललवाणी प्रिंटीग प्रेस, ३) लोकशाही महिला गृह.सह.सो.लि व ४)भारत प्रिंटर्स यांचे प्राप्त झालेले दर स्विकृत करणेस व त्यासाठी येणारा अंदाजित खर्च रक्कम रु.३८,४१,७२८/- मात्र ला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ७ मधील संविदा कलम ७३(क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. १२ :-** नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१५ मधील साईबाबा मंदिरामागील नाल्यास मिल्लत हायस्कुल पर्यंत (पुर्वेस) संरक्षण भिंत बांधणे कामी मक्तेदार रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १.५०% कमीचे दरास मान्यता मिळणेबाबत व सदर कामी येणाऱ्या रक्कम रु.४१,३७,०३५/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**नगरसचिव :-** नितीनभाऊ

**श्री.नितीन लढढा :-** मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सदर विषय मान्य आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१५ मधील साईबाबा मंदिरामागील नाल्यास मिल्लत हायस्कुल पर्यंत (पुर्वेस) संरक्षण भिंत बांधणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नपा/नियोजन/आर.आर./२९४/२०२० दि.२७/०३/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई-निविदा सूचना दै.लोकमत या वर्तमान पत्रात दि.०५/०९/२०२० रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणका व्दारे निविदा भरणेकरीता दि.०३/०९/२०२० ते दि.१६/०९/२०२० पर्यंत दिलेल्या मुदतीत ०४ ई-निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर ०१ उघडले असता ०४ मक्तेदारांचे उक्त कामाचे प्राप्त झालेले ई-निविदा कागदपत्रांची छाननी केली असता त्यातील मक्तेदार रोहित विजय पाटील यांनी पी.एफ.रजिष्ट्रेशन सादर केलेली नाही त्यामुळे त्यांची ई-निविदा अपात्र ठरविण्यात आलेली असल्याने त्यांचे फोल्डर क्रं.०२ उघडण्यात आलेले नाही तसेच खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचे ई-निविदा फोल्डर नं.२ दि.०१/१२/२०२० रोजी ओपन करुन उक्त मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्त्याची संगणकावर प्रिन्ट प्रत काढुन

घेण्यात आली असुन उक्त तुलनात्मक तक्त्यांची प्रत मुळ प्रकरणास जोडलेली असुन त्या नुसार ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.३७३२८२३/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १. | हेमंत अरुण नाईक | निविदा रक्कमेवर १% जास्तीचे दराने | ३७७०१४९/- |
| २. | रामेश्वर बंन्सीलाल धामणे | निविदा रक्कमेपेक्षा १.५०% कमीचे दराने | ३६७६८३१/- |
| ३. | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेपेक्षा ०.०१% कमीचे दराने | ३७३२४५०/- |

तुलनात्मक तक्त्यातील पाहता मक्तेदार रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा १.५०% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु. ३६७६८३१/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ३६७६८३१/- |
| ०२ | जि.एस.टी.१२% | ४४१२२०/- |
| ०३ | कामगार विमा ०.५% | १८३८४/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ६००/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ४१३७०३५/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. ४१३७०३५/- मात्र आहे. परंतु मक्तेदार श्री.रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १.५०%कमीचे दर सर्वात कमी आलेले असुन निविदा अटी शर्ती नुसार १ ते १० टक्के कमीचे दरा पर्यंत १ टक्का व त्यावरील ११ ते १५ टक्का पर्यंतच्या कमीचे दरास प्रति टक्याला १ टक्का याप्रमाणे परफार्मन्स सिक्युरिटी डि.डी. सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मक्तेदार रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांनी निविदा रक्कमेपेक्षा १.५०% कमीचे दर सादर केलेले असल्याने त्यांच्या कडुन १% परफार्मन्स सिक्युरिटी म्हणुन अनामत रक्कम रु.४१३७०/- मात्रचा डि.डी.मनपा खजीन्यात सादर करण्या करीता मक्तेदार यांना पत्र क्रं.साबा/६४३ दि.०३/१२/२०२० अन्वये कळविले असता मक्तेदार यांनी मुदतीत मनपा पावती क्रं.४३१०८ दि.०७/१२/२०२० अन्वये रक्कम रु.४१३७०/- मात्रचा डि.डी.क्रं.१५६९० सादर केलेला आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.४१३७०३५/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु.४१३७०३५/- मात्र नागरी दलितेत्ती वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन करावा लागणार आहे. त्यानुसार मक्तेदार रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १.५०% कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.४१३७०३५/- मात्र ची संविदा करणेस मनपा अधिनियमातील प्रकरण ७ संविदा ७३(क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव :- विषय क्र. १३ :-** प्रभाग क्रं.०९ मधील रस्त्यावरील खड्डे डांबरी मिश्रीत खडीने बुजविणे कामी मक्तेदार राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे वाटाघाटी अंती अंदाजीत रक्कमेपेक्षा २.९०% जास्तीचे दरास मान्यता मिळणेबाबत व सदर कामी येणाऱ्या रक्कम रु.४९,९९,८७३/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन बरडे :-** असे इस्टीमेट याच्या मागील पण आपण केले होते. मी तुम्हाला चौकशीच पत्रही दिलेल आहे. अजुन पर्यंत काम होत नाही. दोन्ही अधिकाऱ्यांच्या बदल्या होऊन गेल्या आहे. एक अमृतकर आणि जगताप, दोन्ही अधिकाऱ्यांच्या बदल्या होऊन गेल्या. दोन्हींनी शब्द दिला होता.होणार आहे काम अजुन होत नाही मागच्या वर्कऑर्डर मधल.

**मा.आयुक्त :-** आपण मागची जी वर्कऑर्डर दिली होती त्याच्या संदर्भात ऑडीटर आणि त्यावेळेचे सिव्हील इंजिनिअर त्यांची चौकशी लावण्यात आलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्याचा रिपोर्ट ही फायनल होऊन ऑडिटरकडे गेला आहे.ते पुढच्या स्थायी समितीला सादर होईल. राहिलेले त्याच्यामध्ये जे सुटलेल्या फॉल्टस होत्या आता आपण हे नविन वर्कऑर्डर दिल्यामुळे आपल्याला जुन्या वर्कऑर्डर काम करायची गरज नाही. त्याच्या मधुन जे काम तेव्हा आपण करणार होते तेच काम आता या ५० लाखाच्या निधितुन करु या.

**श्री.नितीन बरडे :-** त्याचे काम झालेले आहे, त्यांचे बिल निघुन गेलेल आहे.

**मा.आयुक्त :-** हो ना नितीन भाऊ, बरोबर आहे. झालेले कामे योग्य आहे किंवा नाही याच्या बद्दलचा आढावा पुढच्या स्थायी समितीला ठेवु.

**श्री.नितीन बरडे :-** आणि मी मागच्या सभेतही बोललो होतो. डांबर आहे सर्व आहे. म्हणजे आकाशवाणी पासुन ते महाबळच गाडगेबाबा चौक मातीने खड्डे बुजले आहे मी मागच्या सभेत ही बोललो. आपल्याकडे डांबर आहे, लोकं आहे, रोलर आहे. म्हणजे आम्ही धुळ खायची आणि ते दगड इकडे तिकडे उडायचे.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** लेव्हलच टेंडर जेव्हा दिल तेव्हा मी नव्हतो.

**श्री.नितीन बरडे :-** कमीत कमी आम्हाला माहिती तर द्या. चौकश्या लावल्या की, बदली करुन घेता. म्हणजे त्यांना वाचवता आहे.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** रद्दच झाल्या त्या बदलीच्या ऑर्डर रद्दच झाल्या.

**श्री.नितीन बरडे :-** आकाशवाणी चौक ते महाबळ पर्यंत मातीने खड्डे बुजले साहेब आपल्याकडे डांबर शिल्लक आहे. गाडी आहे रस्ते बुजण्याची, रोलर आहे.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** दोन तीन दिवसात चालु होईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आमच्याकडचे इंजिनिअरांचे दर दिवसाला बदल्या होता त्यांचे. संजय पाटील ते आजारीच असता.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** संजय पाटील हे मेडीकल रजेवर आहे तर अमृतकरांना दिलेल आहे त्यांच्या जागी.

**नगरसचिव :-** नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सदर विषय मान्य आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०९ मधील रस्त्यावरील खड्डे डांबरी मिश्रीत खडीने बुजविणे कामास आयुक्त यांनी दि.१४/०९/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त यांचे दि.३०/०९/२०२० च्या मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.५० सन २०२०-२१ https://mahatenders.in दि.१८/११/२०२० दै.दिव्यमराठी या दैनिकात प्रसिध्द करण्यात आली असता ई-निविदा भरणेकरीता दि.१७/११/२०२० ते दि.२३/११/२०२० पर्यंत मुदत देण्यात आली होती. दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं.१ उघडले असता उक्त कामांचे ०२ मक्तेदाराचे प्राप्त झालेले ई-निविदा कागदपत्रांची छाननी करुन उक्त कामाचे ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं.०२ दि.२८/११/२०२० रोजी ओपन करुन त्यात मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे दर इतर मक्तेदारांपेक्षा कामाचे निविदा रकमेवर २.९१ दर सर्वात कमी आले. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटी साठी सा.बा./जा.क्रं./६३८ दि.२८/११/२०२० अन्वये दरा बाबत दि.०१/१२/२०२०

दुपारी ०४.०० वाजता बोलविले असता त्यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीअंती तसेच सा.बा./आ.क्र./२२४० दि.०२/१२/२०२० अन्वये पत्रात नमुद प्रमाणे सदयस्थितीत कोरोना संसर्गजन्य आजाराचा प्रार्दुभाव असल्याने सदर कामासाठी लागणारे मजुर हे काम करण्यास तयार नाही. व जे मजुर काम करायला येत ओ त्यांना जास्त दराने मजुरी दयावी लागत आहे. तसेच वाहतुकीचे दर सुध्दा वाढलेले ओ. त्यामुळे सदरच्या करोना संक्रमाच्या काळात काम करणे अत्यंत जिकरीचे असुन मी भरलेले निविदावर २.९१ ऐवजी २.९० जास्त दराने काम करण्यास मक्तेदार यांनी लेखी संमती दिलेली आहे.

सदरचे दरानुसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.४२,१६,०७०/- | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १. | हेमंत अरुण नाईक | निविदा रक्कमेवर ६.२७% | ४४,८०,४१८/- |
| २. | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेवर २.९०% कमीचे दराने | ४३,३८,३३६/- |

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ४३,३८,३३६/- |
| ०२ | जि.एस.टी.१२% | ५,२०,६००/- |
| ०३ | कामगार विमा १% | ४३,३८३/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १०,१००/- |
| ५ | रॉयलटी (६१८.७५ X १४१.३४) | ८७,४५४/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ४९,९९,८७३/- |

वर नमुद प्रमाणे वाटाघाटी अंती आलेले दरा नुसार व सर्व शासकीय कर समाविष्ट करुन एकुण अपेक्षीत खर्च ४९,९९,८७३/- मात्र आहे. त्या नुसार मक्तेदार राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेवर २.९०% दर वाटाघाटी अंती आलेले दर आले. तसेच मक्तेदारास वाटाघाटीचे पत्र दिले असता त्यांनी निविदा रक्कमेवर २.९०% जास्त फक्त ०.०१% दर कमी केलेले असुन त्यानुसार निविदा रक्कमेवर २.९०% जास्तीचे दरातच काम करणेची लेखी तयारी दर्शविलेली आहे. निविदेतील दर DSR २०१९-२० होते दि.०१/०१/२०२० पासुन नविन DSR २०२०-२१ चे दर लागु झालेले आहेत. याची तुलना केली असता मक्तेदार यांनी दिलेले दर १.०८% जास्तीचे येत असून सदरचे दर स्विकृत करुन रक्कम रु.४९,९९,८७३/- मात्रची संविदा करणेस मनपा अधिनियमातील प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव :- विषय क्र. १४ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय, अ.क्र.३, ४, ६,७ आणि ८ वगळुन बाकीच्या संविदा मंजुर कराव्यात. या विषयावर आम्ही मागच्या सभापतींना लेटरही दिलेल आहे.आमच ऑब्जेक्शन होत. सभापतींनी त्याच्यावर अजुन काय पाठपुरावा घेतला. आयुक्तांनी कळविल नाही. वापस तोच विषय आला. तो विषय वगळुन संविदा मंजुर करण्यात यावी.

**श्री.नितीन लढढा :-** याच्यातल मला एक कळत नाही. जवळपास या विषयावरती तिसऱ्यांदा चर्चा होत आहे. याच्यात नेमक अस घडल काय ? ज्याच्यामुळे वारंवार सभागृहाला अश्या पध्दतीच्या भुमिकेवरती याव लागत. वास्तविक बघितल, जे निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे तुम्ही घेऊ शकतात त्या बद्दल वाद नाही. परंतु या कामाची पार्श्वभुमी ज्या वेळेला वॉटरग्रेसने काम बंद केलेल होत आणि तात्पुरती व्यवस्था म्हणुन प्रशासनाने या मक्तेदाराला शहराच्या स्वच्छतेच्या अनुषंगाने कर्मचारी पुरविणेचे आदेश दिलेले होते. प्रशासनाच्या आदेशामुळे कर्मचारी पुरविण्याच काम मक्तेदाराने केलेल आहे. काम होऊन पुर्ण झालेल आहे. कामाच्या बिलांची अदायगी झालेली आहे. बिलांची अदायगी झाल्यानंतर मक्तेदाराचे डिपॉझीटस बाकी आहे. आणि अश्या पध्दतीने वारंवार वारंवार या सभेमध्ये आपण म्हणतो की, ते तहकुब करण्यात याव. याच्या संदर्भातली माहिती आम्हाला मिळालेली नाही. मला वाटत कदाचित हे योग्य धोरण नाही. कुठेतरी कुठलाही विषय जो आहे त्याचा सोक्षमोक्ष लागला पाहिजे. विषयामध्ये जर काही गंभिर त्रुटी असेल नियमबाह्य काम झालेल असेल की, मक्तेदाराने कामच केलेल नसेल, आणि काही तरी त्याच्यावरती आक्षेप निघालेले असतील म्हणुन त्याच्या सुरक्षा अनामत रोखुन धरल्या गेल्या पाहिजे. अश्या संदर्भातली जर काही भुमिका असेल. त्या संदर्भातले जर काही पुरावे असतील तर जसे पुरावे तशी चर्चा व्हायला पाहिजे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नितीनभाऊ आम्ही पुरावेच मागितलेले होते.

**श्री.नितीन लढढा :-** पुरावे कोणी द्यायला पाहिजे जो कोणी तक्रार करतो. पुरावे आपण नाही मागु शकत. आपण द्यायला पाहिजे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ज्या संविदांवर ऑब्जेक्शन आहे आमच आयुक्त साहेब आणि सभापतींना आम्ही तेच सांगितल.

**श्री.नितीन लढढा :-** बघा जवळपास तो विषय चौथ्यांदा सभेसमोर येत आहे. एक परिस्थिती जी होती की, त्या परिस्थितीमध्ये प्रशासनासमोर हा निर्णय घेतल्याशिवाय पर्याय नव्हता. कारण शेवटी शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न होता. जो पर्यंत पुढच काही टेंडर होऊन प्रक्रिया राबविली जात नाही. पुढील प्रक्रियेच जो काही अंतिम निर्णय होत नाही. तो पर्यंत या मक्तेदाराला काम करु देण्याच्या शिवाय दुसरा कुठलाच पर्याय प्रशासनासमोर नव्हता. जर कधी आपण त्या वेळेला सत्ताधारी होतात. हेच प्रशासन त्या वेळेला कार्यरत होत. त्यावेळेला प्रशासनाने ही भुमिका घेतली होती. नवकामगारांचा पुरवठा करणारे मक्तेदाराशिवाय दुसरा पर्याय प्रशासनासमोर नसतांना त्यावेळेला तुमच्याकडे जर काही वेगळा पर्याय राहिला असता तो वेगळा पर्याय तुम्ही प्रशासनासमोर ठेवला असता प्रशासनाला त्या दोघी पयार्यामध्ये व्यवहारीक तुलना करण्याची संधी उपलब्ध झाली असती. जर त्याच्यावरती चुकीचा निर्णय प्रशासनाने घेतला असता तर निश्चितपणे या संविदा रोखुन धरण्याचा अधिकार या सभागृहाला होता आणि त्यांनी रोखुन घ्यायला पाहिजे होत्या. कोणाच्या तरी डोक्यात या कल्पना यायला पाहिजे की, याच्यात काहीतरी वेगळ झालेल आहे. मान्य आहे परंतु वेगळ काय झाल आहे वेगळ काय घडल आहे. त्या संदर्भातले पुरावे द्यायला पाहिजे की, ही कृती प्रशासनाची नियमबाह्य कृती आहे. बेकायदेशीर कृती आहे. आणि हे तुम्ही केलेल बेकायदेशीर कृत्य याला आम्ही मान्यता देणार नाही. परंतु काही तरी विषय आला आणि कोणाच्यातरी डोक्यात एक कल्पना निघते. आणि त्या कल्पनेच्या जोरावरती हा तहकुब करण्यात यावा. कुलभुषणभाऊ आता साधारणता मी या विषयाला सभागृहात मी चौथ्यांदा ऐकत आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब, देयके अदा झाले त्याबद्दल वाद नाही. आणि त्या टाईमाला कोविडच्या प्रादुर्भावाची परिस्थिती उदभवली होती. आणि तुम्ही जे निर्णय घेतले ते पण योग्य आहे. त्यावेळेस आपल्याला जे पर्याय उभा केला तो पण एकदम योग्य आहे. पण भाऊ तुम्ही जे म्हणतात की, याच्यामध्ये काही अनियमितता झालेली आहे का ? आम्हाला शंका आहे आम्हाला खात्री नाही पण आम्हाला शंका आहे शंका काय आहे साहेब, आपण माहितीस्तव दिलेल आहे त्याच्यामुळे सर्वात पहिले तुम्ही ते मंजुर करुन घेतलेल आहे आम्हाला माहितीस्तव अजेंडयावरती देण्याची गरज नव्हती. तुम्हाला मागच्या सभापतीने जे पत्र दिले होते, तुम्ही दोन कारण सांगितलेले होते. एक ७३(ड) आणि दुसर १४ वा वित्त आयोग, साहेब माहिती आम्हाला ही पाहिजे की, तुम्ही या जे संविदा मंजुर करुन घेतल्या ते ७३(ड) नुसार करुन घेतलेल्या आहे की, १४ व्या वित्त आयोगामधुन करुन घेतलेल्या आहे. जे आपल्याला अधिकार आहेत. तर साहेब आम्हाला मुळात तुम्ही आगोदर हे सांगा. या संविदा मंजुर कोणत्या मसुद्या खाली झालेल्या आहे, कोणत्या याच्या खाली झालेल्या आहे. म्हणजे आमची जी शंका आहे त्या शंकेच निरसन होईल साहेब.

**श्री.नितीन लढढा :-** होईल ना. शंकेच निरसन व्हायलाच पाहिजे ना. परंतु त्याला फक्त तहकुब करुन करुन.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही भाऊ विषय तहकुबचा आलाच नाही आता. विषय काय आला माहिती घेणे संदर्भातला. आपल्याकडे मंजुरीला आलेल नाही, भाऊ हे आपल्याकडे माहितीस्तव आलेल आहे. त्यांनी मंजुर करुन

टाकलेल आहे त्यांनी बिल देऊन टाकलेले आहे. आणि साहेब तुम्हाला हे पण सांगतो, बाय रेकॉर्ड घेण्यात याव. याच्यामध्ये भविष्यामध्ये जो भी काही प्रॉब्लेम उदभवेल, लेखापरिक्षणामध्ये जे पण काही अडचणी निर्माण होतील. याला आमचे सर्व सदस्य आणि बॉडी जबाबदार राहणार नाही. निघाले तर. आणि तुम्ही सांगा की, ७३(ड) नुसार की, १४ व्या वित्त आयोगानुसार आपल्याला जे अधिकार दिलेले आहे आपण ज्या अधिकाराने केल उत्तर द्या साहेब. शंकेच निरसन करा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** रेकॉर्डवर घ्या हे सर्व.

**मा.सभापती:-** तत्कालीन सभापती सौ.शुचितातार्इ हाडा यांनी प्रशासनाला प्रत्र दिले आहे. त्या पत्रामध्ये त्यांनी खुलासा मागीतलेला आहे. त्या संदर्भात त्यांना लेखी पत्रव्यवहाराने खुलासा द्यावा अशी त्यांची मागणी होती आणि त्या संदर्भात काही नगरसेवकही मला वाटतं आयुक्त साहेबांना भेटायला गेले होते. तर त्यांची मागणी होती की आम्हाला प्रशासनाकडुन लेखी खुलासा हवा. या संबंधी त्यांनी पत्र दिले होते. त्या पत्राची कॉपी तत्कालीन सभापती यांनी दोन दिवसांपुर्वी दिलेली आहे. तसेच सन्मा. सदस्य किशोर भाऊ बाविस्कर यांनी सुध्दा पत्र दिलेले आहे आणि तदनंतर आज सकाळी सुध्दा ॲड . शुचिता हाडा यांनी मला पत्र दिलेले आहे. या संविदा वादातीत आहे असा त्यांचा आक्षेप आहे आणि खरतर हा विषय त्यांनी मला पत्र दिल्यांनतर पत्रामध्येही उल्लेख केलेला आहे की हा विषय अजेंड्यावर यायला नको होता खेद आहे अडचणी आहेत . असे त्यांनी त्या पत्रामध्ये दिलेले आहे. आणि प्रशासनाकडुन आलेला विषय हा अजेंड्यावर घेणे बंधनकारक आहे आणि त्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा होणं सुध्दा गरजेचे आहे आणि सभागृहाला तो अधिकार आहे त्यांनी तो निर्णय घ्यायचा आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती साहेब याच्यावर निर्णय घेवुन काहीच उपयोगच नाहीये. याच्यावर निर्णय घेवुन काहीच उपयोगच नाहीये.

**मा.सभापती:-** आणि या संविदा

**श्री.कुलभुषण पाटील :-** कारण की या संविदा करून टाकलेल्या आहेत त्यांनी

**मा.सभापती:-** या संविदा माहितीसाठी आहेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** या संविदा करून टाकलेल्या आहेत.

**मा.सभापती:-** या संविदा सभेमध्ये संविदा या फक्त माहितीसाठी आलेल्या आहेत काही मंजुरीसाठी आलेल्या नाहीयेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** फक्त आमच्या शंकाचे निरसण करून द्या.

**सौ.ज्योति चव्हाण :-** आमच्या ज्या शंका आहेत त्यांच आयुक्त साहेबांनी निरसण करावं.

**मा.सभापती:-** प्रशासन म्हणुन आयुक्त साहेबांनी या ज्या झालेल्या संविदा आहेत .

**श्री.कुलभुषण पाटील :-** त्यांनी केलेल्या आहेत ना त्या संविदा

**मा.सभापती:-** त्यांनी सभागृहाला याचा खुलासा करावा अशी मी विनंती करतो.

**श्री.कुलभुषण पाटील :-** त्यांनी १४ वा वित्त आयोगातुन केलेले आहे की प्राप्त निधी नुसार केलेले आहे हे त्यांनी सांगावे कारण मला ती शंका आहे म्हणुन

**आयुक्त :-** हा विषय जो आहे आपण तिन चार वेळा याच्यावर चर्चा केलेली आहे.मार्च एप्रिल नंतर म्हणजे लॉकडाऊन झाल्यानंतर पहिल्या सभेमध्ये हा विषय आला होता . त्या विषयावर सविस्तर चर्चा झाली. त्या पार्श्वभुमिवर आपण हे काम दिलेलं होत. त्यावेळी ती जी काही चर्चा झाली की स्थायी समिती समोर हे विषय अवलोकनार्थ ठेवण्यात येतील तर ते अवलोकन करण्यात आले आहे. फक्त पुढच्या दोन विषयांमध्ये असे आक्षेप घेण्यात आले याच्यानंतर आपली जी ऑनलाईन महासभा होती.त्या महासभेमध्येही याच्यावर सविस्तर चर्चा झाली त्यावेळेला खुलासा प्रशासनाने याच्यावर केला आहे.आता दोन महत्वाच्या गोष्टी त्याच्यामध्ये आहेत.आपल्या शंका असतील तर त्या शंकांच निरसण करून घेण काहीच वावग नाहीये आपण हि जी स्थायी समितीची बैठक बोलवतो ती चर्चा करून निर्णय घेण्यासाठी आहे. निष्फळ चर्चा करावी असे माझे म्हणणे नाहीये. चर्चा करून आपण चर्चेमध्ये सन्मा.सदस्यांना काही शंका असेल तर प्रशासनाने त्यांचे समाधान करणे हे आमचे कर्तव्य आहे. आता याच्यावर आपण मुद्दा मांडला मागच्या स्थायी समितीमध्ये जे सदस्य होते ते आता नाहीत आता काही नविन सदस्य या स्थायी समिती मध्ये आलेले आहेत.म्हणुन त्यांना हा विषय समजुन घ्यायला काही वेळ लागेल. म्हणुन आपण थोडीशी याची पार्श्वभुमि समजुन घेणे गरजेचे आहे. एखाद्या गोष्टीमध्ये खरोखर अनियमीतता झाली का नियमबाह्यता झाली का आणि ज्या पार्श्वभुमिवर जो निर्णय घेतला जातो . आणि त्या पार्श्वभुमिवर चर्चा न करता आपल्याला निर्णय घेण हे प्रशासकीय दृष्टया योग्य नाही.आपण वॉटरग्रेसचा ठेका चालु केलेला होता तेव्हा आपण त्यावेळेस ५ वर्षाच्या कालावधीकरीता आवश्यक त्या अटी शर्तीनुसार सुरू केला होता. ५ वर्षाकरीता आपण त्यांना दोन प्रकारची काम आपण दिलेली होती. एक आपल्या वाहनांच्या आधारावर म्हणजे आपली वाहनं वापरून शहरातुन कचरा गोळा करायचा आणि तो कचरा डेपो वर न्यायचा. त्याचा जो डिओ होणार होता तो

आपल्या पध्दतीने होणार होता. दुसरे आपण रस्ते सफाई आणि गटार सफाईसाठी जे ४०० लेबर लागणार होते ते ४०० लेबर आपण त्याच्याकडुन घेणार आहेत हे सगळे आपण त्यावेळी निविदेद्वारे निश्चित केले होते.आता हे सगळ काम सुरू करत असतांना पहिल्या तिन महिन्यामध्ये महानगरपालिकेमध्ये आणि त्याच्यामध्ये दंड आकारणे , फी , पुरावे न दाखवणे म्हणजे सगळे जे काही असेल या संदर्भामध्ये कुठलेही वादविवाद निर्माण झाले आणि अशा पार्श्वभुमिवर अशावेळी महानगरपालिकेला त्याच्यावर काही रक्कम त्याची रोखुन धरली होती. म्हणजे काही कारणांनी रोखुन धरली होता आणि याच्या पार्श्वभुमिवर जानेवारी , फेब्रुवारी मध्ये या कामामध्ये खुप मोठयाप्रमाणात विस्कळीतपणा आला होता. महानगरपालिकेने त्याला नोटीसही दिली होती की आम्ही तुमचा हा ठेका का रद्द करू नये. त्याच्या संदर्भात अनेकवेळा महासभेमध्ये व स्थायी समिती मध्ये चर्चा झालेल्या आहेत. आता हे सगळ झाल्यानंतर साधारणत: आपण त्याला अंतिम नोटीस दिली तर अंतिम नोटीस दिल्यानंतर त्याने उत्तर दिले आणि त्या वेळेला म्हणजे फेब्रुवारी महिन्यामध्ये हे काम पुर्णपणे विस्कळीत झाल . त्याच्यानंतर आपण ६ मार्चला हे काम महानगरपालिकेने काढुन घेतले आणि आपण आपल्यामार्फत हे काम करून घेण्याचा निर्णय घेतला . त्या वेळेला आपले जिल्हाधिकारी यांचेकडुन मी आयुक्त पदाचा चार्ज घेतला. त्यानंतर त्यावेळेचे जे उपायुक्त होते त्याच्याशी चर्चा करून हा निर्णय घेतला होता. आता त्यावेळेला वॉटरग्रेस च्या संदर्भामध्ये आपण त्यावेळेला आपण हा ठेका टेकओव्हर केला अजुन कागदपत्र आपण काही दिलेले नाहीत. या मधल्या पिरीएड मध्ये शहरामधील कचरा उचलण्याची , रस्ते झाडण्याची आणि गटारी स्वच्छ करण्याची जबाबदारी व ते करणे गरजेचे होते. ज्यावेळेला आपण त्याला अंतिम नोटीस दिली होती १ जानेवारी २०२० ला त्यावेळेला जर समजा हा ठेका भविष्यामध्ये आपल्याला रद्द करावा लागला किंवा काही काळाकरीता स्थगित करावा लागला तर अशा परिस्थिती मध्ये या कामासाठी पर्यायी व्यवस्था करावी लागणार म्हणुन आपण त्याच्या संदर्भामध्ये निविदा मागविल्या म्हणजे कर्मचारी पुरविण्याच्या आता निविदा मागवितांना त्यावेळेचे पदाधिकारी किंवा आयुक्त यांचे जे काही धोरण होत या चार प्रभागापैकी एक प्रभाग सोडुन फक्त तिन प्रभागकरीता निविदेसाठी आपण निविदा मागविल्या होत्या तर आपण या तिनही समित्यांसाठी आपण एकच दिवशी निविदा मागविल्या होत्या. म्हणजे पुर्वीच्या प्रमाणे म्हणजे प्रत्येक प्रभागामध्ये जसे होते तसे आपण फक्त एकच निविदा मागविल्या होत्या. त्यावेळेला हि निविदा प्रक्रीया सुरू होती. टेंडरची प्रक्रीया अंतिम होईपर्यंत म्हणजे ६ मार्चला हा ठेका टेकओव्हर केला त्यावेळेला आपल्याकडे दुसरा कुठलाही पर्याय नव्हता. आणि त्यावेळेचे लेखाधिकारी आणि आयुक्तांनी जे आपल्याला कामगार कायद्याच्या मार्फत जे आपल्याला लेबर आणि ट्रॅक्टर पुरविणारी जी एजन्सी आहे.म्हणजे आता हे जे आहेत एस.के.कॉन्ट्रॅक्टर याच्याकडे हे काम तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्याच्या त्यावेळेच्या आयुक्त जिल्हाधिकारी यांनी घेतला आणि ते काम आपण ६ मार्च पासुन सुरू केले. आता हे एस.के.कॉन्ट्रॅक्टर हे काम आपण त्यांना दिलेल आहे.याच्यामध्ये काही आक्षेप काही सदस्यांकडुन आहेत की हे काम विना निविदा आहे का हे काम आपण एस.के.कॉन्ट्रॅक्टरला यासाठी त्यावेळेच्या आयुक्तांनी सुचविले होते की हा एस.के.कॉन्ट्रॅक्टर हा काही विना परवाना नाही तो बांधकाम साठी निविदा प्रक्रीयेतुन मंजुर झालेला स्थायी समितीने मान्यता दिलेला तो कॉन्ट्रॅक्टर आहे. आता हि जी निविदा होती त्यावेळेला दोन कॉन्ट्रॅक्ट मंजुर केलेले आहेत. एक लेबर पुरविण्याचा व एक म्हणजे लेबरसह ट्रॅक्टर पुरविण्याचा आपल्याला ज्यावेळेला हे कचरा वाहतुकीच कॉन्ट्रॅक्ट आपल्याला वाहतुकीच्या स्वरूपात द्यायचे होते त्यावेळी आपल्याला त्याच्याकडुन फक्त हिच दोन काम करून घ्यायायची होती. एक वाहन काही आपल्याला लागत होती ट्रॅक्टर लागत होते लेबर सह आणि दुसरी गोष्ट अशी की स्वच्छतेचे काम करून घेणेसाठी ४०० लेबर आणि लेबर आणि ट्रॅक्टर पुरविण्यासाठी स्थायी समितीने १ वर्षाकरीता म्हणजे सप्टेंबर २०१९ ते ऑगष्ट २०२० या कालावधीसाठी मंजुर केलेला दर आणि हे काम कॉन्ट्रॅक्टर करत होता त्यामुळे मग आपण नविन निविदा प्रक्रीया होईपावेतो जो पर्यंत स्थायी समितीने मंजुर केलेला कॉन्ट्रॅक्टर आहे, मंजुर केलेले दर आहेत. त्या दराप्रमाणे आपण त्याला काम द्यायचा निर्णय त्यावेळेला आपण घेतलेला आहे आणि हे काम आपण सुरू केले. आता जे काम २०१६ मध्ये मा.महासभेने जे धोरण ठरविलेले होते १४ व्या वित्त आयोगाचा ५० कोटी निधी हा आपल्याला घनकचरा व्यवस्थापना म्हणजे आपल्याला कचरा संकलनासाठी लागतो आणि त्याची प्रक्रीया आहे हे खर्च करण्यासाठी आपले हे धोरण होते. त्या धोरणाला अनुसरून ते काम त्यावेळेला जे आयुक्त होते त्यांनी ह्या खाजगी कॉन्ट्रॅक्टर कडुन करून घेतले होते. वॉटरग्रेस च्या थांबल्यामुळे त्यानंतर आपले हे काम सुरू झाले. दरम्यानच्या काळामध्ये ज्यावेळेला या निविदा आल्या त्यावेळेला आपण त्या निविदा ओपन केल्या म्हणजे तिन प्रभाग समितीच्या निहाय आपण ज्या निविदा काढल्या होत्या. एल-१ लोकांच्या आणि दुसऱ्याही निविदा म्हणजे तांत्रिक लिफाफा आपण उघडल्या होत्या म्हणजे दुसऱ्या ज्या लोकांच्या व त्या तांत्रिक लिफाफा उघडल्या नंतर त्यामध्ये दोन गोष्टी घडल्या एक त्यावेळेच्या काही सन्मा.सदस्यांनी त्याच्यामध्ये सन्मा.महापौरांचाही समावेश आहे. त्यांनी प्रशासनाला अशी पत्र दिली की हि जी निविदा प्रक्रीया आहे तर या निविदा प्रक्रीयेच्या संदर्भामध्ये आमचे काही आक्षेप आहेत. त्याच्यामध्ये दोन प्रकारचे

आक्षेप आमच्याकडे दिले होते. एक कि हि निविदा प्रक्रीया राबविलेली आहे हि तुम्ही तिनच प्रभाग समितीमध्ये राबविलेली आहे तसे न करता चारही प्रभाग समितींकरीता राबवाव्यात. नंबर दोन हि निविदा प्रक्रीया तुम्ही दोन वर्षाकरीता राबविलेली आहे. दोन वर्षाकरीता एकदमच कॉन्ट्रॅक्ट दिले तर आता आपल्याला आलेला जो अनुभव आहे एकच कॉन्ट्रॅक्टर जर संपुर्ण शहरासाठी जर असेल तर एक कॉन्ट्रॅक्टर ने काम बंद केले तर पर्यायी व्यवस्था आपली अडचणीत येते. तर तसे न करता प्रत्येक प्रभाग समितीवाईज तुम्ही वेगवेगळया करा आणि मग तुम्ही चार निविदा प्रक्रीया राबवा. तिसरी गोष्ट हे जर टेंडर तुम्ही दोन वर्षाकरीता दिले त्याच्यामध्ये पर्फामिंग नुसार जर कराल म्हणजे पहिले तिन महिने सहा महिने आपण त्याच काम बघुया त्याचं जर काम समाधानकारक वाटल तर आपण त्याच्याशी पुढचं कॉन्ट्रॅक्ट करूया . या सगळया अटी शर्तींचा समावेश करून तुम्ही नविन निविदा प्रक्रीया राबवा आणि हि निविदा प्रक्रीया रद्द करा.त्याप्रमाणे आपण हि निविदा प्रक्रीया रद्द केली. नविन अटी शर्तीसह नविन निविदा प्रक्रीयेच काम त्यावेळेच्या उपायुक्तांनी सुरू केले. ज्यावेळी आपण हि अंतिम नोटीस बजावली होती. तेव्हा फेब्रुवारी महिन्यामध्ये ज्यावेळी त्याच्यामध्ये व आपल्यामध्ये वाद निर्माण झालेले आहेत. ते वाद निर्माण झाल्यानंतर आपल्या कराराप्रमाणे ऑब्रीकेटर ॲक्ट त्याला लागू केलेला आहे. तर या लवाद कायद्याप्रमाणे महानगरपालिकेचे आयुक्त स्टेजचे जे लवाद  असतील असे कायद्याप्रमाणे आपल्या करारामध्ये आपण नमुद केलेले आहे. या तरतुदीला वॉटरग्रेसने आक्षेप घेतलेला आहे. त्याच म्हणण याच्यामध्ये असे आहे की लवाद कायद्यानुसार जे दोन पार्टीमध्ये वाद आहेत. त्यापैकी कुठलीही ईन्टरेस्टेड पार्टी लवाद म्हणुन काम करू शकत नाही. हा लवाद म्हणजे हा थर्ड पार्टी असला पाहीजे.आता महानगरपालिकेने वॉटरग्रेसच्या वादामध्ये महानगरपालिकेचे आयुक्त जर लवाद म्हणुन काम करत असतील तर त्यांच्याकडुन आम्हाला याच्यात न्याय मिळण्याची काही अपेक्षा नाही. कारण आयुक्त हे महानगरपालिकेचीच बाजु उचलुन धरतील त्यामुळे याच्यामध्ये आम्हाला लवाद म्हणुन हे मान्य नाही. त्यामुळे आपल्याला हायकोर्टामध्ये जाव लागलेल आहे. आता हायकोर्टामध्ये त्याच्या स्टॅम्पवर नंबरही लागला आणि त्याने त्यावेळेची ती कॉपी आम्हाला दिली. आता हायकोर्टामध्ये दावा दाखल झालेला आहे.आपण त्याचा तात्पुरता लेखा काढुन घेतलेला आहे. आणि त्यानंतर आता कॅन्सलेशनची नोटीस दिली आहे. हा सगळा विषय कायदेशीर ज्यावेळी विधी सल्लागाराकडे दाखवला त्याच्यामध्ये आपल्या विधी सल्लागाराने आपल्याला असा सल्ला दिला कि हायकोर्टामध्ये दाखल असलेला दावा आणि आता त्यांना आपण दिलेली अंतिम नोटीस आणि याच्यावर आपली पर्यायी व्यवस्था जी काही करतोय या सगळयांचा एकत्रित विचार करता जो पर्यंत वॉटरग्रेसचे पाच वर्षांचे कॉन्ट्रॅक्ट म्हणजे कायद्याप्रमाणे आपल्याला कॉन्ट्रॅक्टरने सांगीतलेले आहे. तो जो पर्यंत अधिकृतपणे रद्द होत नाही. कॉस ऑफ लॉ कायदेशीर रित्या जो पर्यंत हि निविदा प्रक्रीया रद्द होत नाही. तोपर्यंत तुम्हाला त्याच कामासाठी दुसऱ्या कुठल्याही नविन एजन्सी बरोबर नव्याने टेंडर किंवा करार करता येणार नाही. त्यामुळे काहीही निविदा प्रक्रीया तुम्हाला राबवणं हे कॉन्ट्रॅक्टर साठी चांगले होईल. त्यामुळे हे काम करणे उचित होणार नाही. याचा फायदा हा म्हणजे पुढची स्टेप म्हणजे आपल्याला यामध्ये होवु शकेल.आता हि निविदा प्रक्रीया कुठल्याही कायद्याप्रमाणे आपल्याला करता येणार नाही अश्याप्रकारचा अभिप्राय आपल्याकडे प्राप्त झाला. त्यामुळे टेंडर प्रक्रीया आपल्याला करता आली नाही. आता दोन पर्याय आपल्याकडे होते. त्यापैकी एक वॉटरग्रेसला काम अंतिम रित्या देण किंवा कायमस्वरूपी रद्द करणं आणि मधल्या पिरीएड मध्ये तात्पुरती व्यवस्था करणे. आता तो जर कालावधी आपण विचारात घेतला . मी सांगतो साधारण एप्रिल मे मध्ये आता एप्रिल मे महिन्यामध्ये आपल्याकडील कोरोनाची जर परिस्थिती बघितली तर माध्यमातुन येणाऱ्या बातम्यांमध्ये आपल्याकडे येणाऱ्या तक्रारी होत्या तर त्यावेळेची कचऱ्याची परिस्थिती हि खुप गंभीर होती आणि तातडीने महानगरपालिकेला त्याच्यावर उपाययोजना करणे गरजेचं होत. म्हणजे या वातावरणा मध्ये नागरीकांच्या आरोग्याच्या बाबतीमध्ये कुठल्याही परिस्थिती मध्ये दुर्लक्ष करण योग्य नव्हतं. अशा पार्श्वभुमिमध्ये मी आता सांगीतल्या प्रमाणे निविदा प्रक्रीये बरोबर आलेला आपला एस.के.कॉन्ट्रॅक्टर हि जी एजन्सी आहे. त्याचे दर आपण स्थायी समितीमध्ये मंजुर केलेले आहेत.त्या दराप्रमाणे आपण हे काम दिले होते. आता याच्यामध्ये विना निविदा आल्या का ? तो निविदेमधुनच निश्चित झालेला कॉन्ट्रॅक्टर आहे.या कामासाठी आपण निविदा काढली का ?  आपण ज्या कामासाठी निविदा काढली होती परंतु वॉटरग्रेसशी आपला कॉन्ट्रॅक्ट अस्तित्वात असल्यामुळे आपल्याला या कामाची निविदा अंतिम करता येत नाही असे अभिप्राय होते.अशा पार्श्वभुमिवर आपण महानगरपालिकेच्या अडचणीची आणि शहराच सार्वजनिक आरोग्य अबाधित ठेवण या दोन्ही चा एकत्रित आणण्याचा आपण ताळमेळ केला आणि महानगरपालिकेच आर्थिक हित मी याच्यासाठी म्हणतो की वॉटरग्रेस कडुन आपण जे लेबर घेतो त्याचा दर प्रति माणुस प्रति दिन ५४२/- रूपये व हा जो एस.के.कॉन्ट्रॅक्टरचा दर आपण जो काही स्थायी समितीमध्ये मंजुर केलेला आहे तो ५२०/- रूपये प्रति दिन प्रति माणुस म्हणजे याच्यामध्ये माझ्या माहितीप्रमाणे खर्चही वाढणार नव्हता. निविदा प्रक्रीयेतुन जे काही आलेले दर आहेत. नविन निविदा प्रक्रीया करता येत नाही. अशा वेळेला जसे सन्मा.सदस्यांनी आता म्हंटल त्यावेळेच्या परिस्थिती मध्ये

आपल्याकडे जो पर्याय उपलब्ध होता की जो आपल्याला आर्थिक रित्या सुध्दा नुकसानीचा नव्हता आणि कायदेशीर होता तो पर्याय आपण निवडला. आता या सगळया पार्श्वभुमिवर आपल्याला वॉटरग्रेसचा ठेका अंतिमरित्या रद्द करायचा किंवा काय याच्याबाबती मध्ये जेव्हा सुनावणी नोटीस दिली त्यावेळेला आपल्याकडे लॉकडाऊन चालु होता त्यावेळेला लॉकडाऊन असल्याने कुठनही ईकडुन तिकडे जाण्यायेण्याला परवानगी नव्हती . त्यामुळे दोन महिने हि सुनावणी आपल्याला त्याला देता आली नाही. दोन महिन्यानंतर पास घेवुन येण्याची परवानगी मिळाली.त्यावेळी नाशिकच्या एजन्सीला आपण या ठिकाणी बोलवले त्याने हिअरींग दिले आणि हिअरींग मध्ये काही ज्या आपल्या काही गोष्टी पुरवायच्या होत्या उदा. आपल्याला चार ठिकणी रॅम्प द्यायचे होते, दोन ठिकाणी आपल्याला वजनकाटा उपलब्ध करायचा होता . या गोष्टींची पुर्तता त्यावेळेला झालेली नव्हती . म्हणजे गेल्या फेब्रुवारी मध्ये पण मधल्या पिरिएडमध्ये या सगळया गोष्टींची पुर्तता झाली. त्यामुळे या सगळया सोयी त्याठिकाणी आल्या. त्यांच्या ज्या लेबरचे पमेंटच्या ज्या काही अडचणी होत्या. जिल्हाधिकारी यांच्याकडे त्यावेहेला चार्ज होता. त्यावेळेला त्याला पहिल्या तिन महिन्यांसाठी करारामध्ये तरतुद नसतांना सुध्दा आकारणी केली असा त्यांचा आक्षेप होता. तो त्यावेळेच्या जिल्हाधिकारी यांनी एकत्रित सुनावणी घेवुन कोरोनाची स्थिती लक्षात घेवुन तो मान्य केला आणि दंडाची जी काही रक्कम जी ७० ते ७५ लाखांची जी आपण घेतलेली होती ती सुध्दा आपण त्याला परत केली . आता या सगळया पार्श्वभुमिवर वॉटरग्रेस ने आपल्याला त्याच्यामध्ये महानगरपालिकेने त्याला जे रॅम्प पुरवायचे होते ते पुरविलेले आहेत आणि बाकीचे जे दुसरे जे काही आहे. तिन महिन्याचे नंतरचे दंड किंवा बाकीचे जे काही कन्साईन आपल्याकडे आहेत तर याच्यामध्ये त्यासाठी महानगरपालिकेने केलेल्या करारामध्ये ज्या ॲरीकेशन ॲक्ट आहेत त्याप्रमाणे त्याच्यामध्ये लवाद किंवा प्रोसीडर म्हणजे समन्वयक अशा प्रकारचे आहे. तर अश्या प्रकारे आयुक्त हे लवाद म्हणुन आम्हाला हे मान्य नाही. आणि ते ॲप्रीकेशन ॲक्ट प्रमाणे ते योग्य नाही. त्यामुळे याच्यामध्ये तुम्ही डिस्ट्रीक्ट जज किंवा रिटायर्ड शासनाचे सचिव पदाचे अधिकारी हे तुम्ही लवाद म्हणुन नेमा आणि हे जे काही आपले मनपाचे महत्वाचे मुद्दे आहेत हे त्या लवादा समोर जातील आणि लवाद चा जो काही निर्णय होईल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.तरी या प्रमाणे आम्हाला काम करण्याची पुन्हा संधी द्या हि संधी आपण द्यावी किंवा कसे याच्याबद्दल आपण सगळं व त्यांनी कोर्टात दाखल केलेला दावा अजुनही आपल्याला कोर्टाची नोटीस आलेली नाहीये. पण कोर्टामध्ये त्याने दावा दाखल केलेला आहे. कदाचित लॉकडाऊन असल्यामुळे आलेली नाही. तर आपण या पार्श्वभुमिवर आपल्याला कोणता निर्णय घेता येईल.याच्या बाबतीमध्ये आपण विधी सल्लागार यांच्याकडे पाठवले व या सगळया पार्श्वभमिवर विधीसल्लागारांनी अभिप्राय दिलेला आहे की आता जी काही वॉटरग्रेसची मुदत होती कराराप्रमाणे जे काही मुद्दे तुमच्याकडुन होणार होते. ते कराराच्या तरतुदीप्रमाणे ते महागनरपालिकेने सोपविणार असुन ते किमान एक संधी जर मागताहेत आणि महानगरपालिकेची काही गोष्टींची पुर्तता राहीली होती ती आता झालेली आहे. अशा पार्श्वभुमिवर तुम्ही पाच वर्षाचे कॉन्ट्रॅक्ट टर्मिनेट न करता त्याला एक संधी द्यायला काही हरकत नाही. कारण आपण त्याला कुठलेही कोणते पार्ट पेमेंट त्याला देणार नाही. त्याचे आपल्याकडे जवळपास १ कोटी ७८ लाखचे डिपॉझिट आहे.पहिल्या तिन महिन्याची आपल्याकडे जवळपास १ कोटी १४ लाख रूपयांची बिल आहेत. म्हणजे तिन कोटी रूपये त्याची आजही महानगरपालिकेकडे जमा आहेत हे केव्हा जुन जुलै मध्ये अशा पार्श्वभुमिवर तेव्हा हि संधी ते मागत असतील तर संधी द्यायला काही हरकत नाही. ऑदरवाईज कॉन्ट्रक्ट पध्दतीने करूनही घेण्यासाठी हे वाढवण्यापेक्षा एक संधी देण्यास काहीच हरकत नाही. आज कधीही आणि उद्या जरी कामामध्ये बिड केली तर तेव्हा महानगरपालिका त्याच्यावर ॲक्शन घेवु शकते. हे आपल्याला अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर आपण याच्यावर धोरण ठरविण्यासाठी महासभेसमोर आणायचा निर्णय घेतला. की आता आपल्याला याच्यामध्ये दोन पर्याय आहेत की कायमस्वरूपी हा ठेका रद्द करणे किंवा त्याला एक संधी देणे. महासभेच्या पुढे विषय ठेवण्याच्या संदर्भात त्यावेळेला आपल्याकडे सर्क्युलर प्राप्त असतांना की तुम्ही यापुढे महासभा ज्या घ्यायच्या आहेत. पहिले तर महासभा घेवु नका. नंतर महासभा घ्यायच्या आहेत तर त्या ऑनलाईन घ्या.आता त्यावेळी ऑनलाईन सभा घेणे शक्य नव्हत. सन्मा.महापौरांशीही चर्चा करण्यात आली आणि मग संभाजी नाट्यगृहात घेता येईल का ? किंवा मग सागर पार्कवर आपल्याला घेता येईल का ? अशा काही पर्यायांची चाचपणी करण्यात आली. तसेच महापौरांच्या दालनात पदाधिकाऱ्यांशीही चर्चा केली. परंतू व्यवहार्य म्हंटल्यानंतर महासभेमुळे जी काही येणारी अडचण आहे. ती विचारात घेवुन आपण सर्व पदाधिकाऱ्यांशी म्हणजे सर्व गटनेते, महापौर , उपमहापौर, स्टँडींग कमिटीचे चेअरमन व ईतर आपले सर्व पदाधिकारी यांची एक बैठक आपण आयुक्त कार्यालयात घेतली आणि त्या बैठकीत या सगळया विषयांवर चर्चा झाली. त्याच्यामध्ये आपले विधी सल्लागारही होते आणि त्या सगळयांच्या चर्चेवरून शेवटी त्याच्यामध्ये अंतिम निर्णय असा झाला की याच्यामध्ये सगळया प्रकारच्या कोणत्याही कोर्टकचेऱ्या टाळण्यासाठी एक संधी जर ती एजन्सी मागत असेल. आपण द्यायला हरकत नाही हि संधी देत असतांना महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने हा जो काही निर्णय घ्यायचा आहे त्यासाठी आयुक्तांना

प्राधिकृत करण्यात आलं आणि हा सर्व समावेशीत चर्चा झाल्यानंतर आपण हि संधी वॉटरग्रेसला दिली. आता मधल्या पिरीएड मध्ये हा जो कोर्टामध्ये दाखल असलेला दावा त्याची जी हिअरींग होती त्याच्यावर आपण त्याला अंतिम निर्णय देणार. वेळोवेळी आपण त्याच्यावर लिगल ओपिनियन घेण या सगळयामध्ये साधारणत: मे , जुन आणि जुलै या तिन महिन्यांचा कालावधी गेला. या तिन महिन्यांच्या कालावधी मध्ये आपण हे पर्यायी जी व्यवस्था केली होती. मार्च मध्ये ती व्यवस्था आपण पुढे चालु ठेवली आणि हि व्यवस्था साधारण चार ते साढेचार महिने चालु होती. आता याच्यामध्ये हे सगळं झाल्यानंतर आपण हा ठेका वॉटरग्रेस कडे हस्तांतरीत केला आणि हे जे काम आपण एस.के.कॉन्ट्रॅक्टर ला दिलेले तात्पुरते काम होते ते त्यानंतर पुन्हा वॉटरग्रेसला दिल्यानंतर बंद झ ााल. आता याच्यामध्ये दोन मुद्दे येतात. या सगळया प्रक्रीयेमध्ये अनियमीत प्रक्रीया आहे का. या दोन्ही गोष्टींचा आपण विचार केला पाहीजे की आपण वॉटरग्रेसचा कॉन्ट्रॅक्ट आपण त्यावेळी टर्मिनेट करत होतो. त्यावेळेला आपल्याकडे या कामासाठी पर्यायी व्यवस्था नव्हती. पर्यायी व्यवस्था करण्यासाठी आपण निविदा प्रक्रीया राबवत होतो. निविदा प्रक्रीयेच्या संदर्भामध्ये आपल्या सन्मा.सदस्यांकडुन आलेले आक्षेप आणि त्यावर निविदे प्रक्रीये बाबत प्राप्त अभिप्राय त्यामुळे आपण निविदा प्रक्रीया राबविणे शक्य नव्हतं. त्यामुळे जी पर्यायी व्यवस्था करायची आहे.तर ती कुणा मार्फत करायची आहे. तर जो महानगरपालिकेच्या बांधकाम खात्याकडे काम करतो आहे . मंजुर झालेला जो कॉन्ट्रॅक्टर आहे त्याचे दर ट्रॅक्टरसह लेबर पुरविण्याचे आणि मजुर पुरविण्याचे याच स्थायी समितीने मंजुर केलेले आहेत आणि कि जे ऑगष्ट २०२० पर्यंत लागू होते.त्यामुळे आपण त्या ठेकेदाराकडुन काम करून घेण्याचा निर्णय घेतला. कारण त्यावेळेला आपल्याकडे दुसरा कुठलाही पर्याय नव्हता . महानगरपालिकेचे आर्थिक नुकसानही झाले असते या सगळया निविदेप्रक्रीयेमध्ये जर असे नुकसान होत असेल तर आपल्या आणि वॉटरग्रेस च्या कराराप्रमाणे एखाद काम वॉटरग्रेस कडुन केल गेल नाही आणि ते काम महानगरपालिकेला अन्य कोणाकडुन करून घ्यावं लागलं याच्यामध्ये जर महानगरपालिकेला वॉटरग्रेसला येणाऱ्या खर्चापेक्षा जर जादा खर्च येत असेल तो जो खर्च त्यांच्याकडुन वसुल करण्याचा जो आपल्या करारामध्ये तरतूद आहे. या परिस्थितीमध्ये या ५४३ रूपयामध्ये आपण वॉटरग्रेस कडुन लेबर घेणार होते तर आपण याच्याकडुन ५२० रूपयांमध्ये घेतले. याच्यामध्ये एका दिवसामध्ये एका माणसामागे जवळपास २३ रूपये खर्च आपला कमी झाला. याच्यामध्ये महानगरपालिकेचे काही आर्थिक नुकसानही झालेलं नाहीये. पर्यायी व्यवस्था करणेही गरजेचे होते . आपल्याला योग्य पर्यायी प्राप्त स्थिती मध्ये जो उपलब्ध होता आणि जो कायदेशीर होता तो पर्याय आपण निवडला होता. आता जो मुद्दा उपस्थित केला होता. संविदेंच्या संदर्भातील की हे जे काम आहे वॉटरग्रेसचं जे काम आहे आपण ५ वर्षाचा जो करार केला आहे हे आपण महासभेमार्फत वित्त आयोगाच्या निधीमधुन केले आहे. वित्त आयोगाचा निधी हा घनकचरा व्यवस्थापन साठी हा निधी खर्च करायचा आहे.तसा आपण २०१६ मध्ये तो धोरणात्मक निर्णय आपण घेतलेला आहे. आता हे जे काम आपण एस.के.कॉन्ट्रॅक्टर कडुन करून घेतले हे जे काम वॉटरग्रेस कडुन करत होते तेच काम होत आणि वॉटरग्रेसचे जे काम आहे. ते आपण वित्त आयोगाच्या निधीमधुन केलेले आहे. घनकचरा व्यवस्थापनाच ते काम असल्यामुळे वित्त आयोगाच्या निधीमधुन हा खर्च आपण येथे केलेला आहे.आता वित्त आयोगाच्या निधीमध्ये महासभेने ठरविलेल्या सर्वसाधारण वर्गाला अधिन राहुन प्रत्येक प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार हे आयुक्तांना दिलेले आहेत. सभागृहाच्या हे ही निदर्शनास आणतो की वित्त आयोगाच्या निधीमधुन त्याच्यासाठी मान्यता देण्यासाठी कुठल्याही प्रकारच्या आर्थिक मर्यादा हि आयुक्तांना लागू केलेली नाही. म्हणजे एखाद्या कामासाठी १ कोटीचा जरी येणारा खर्च असेल तरी सुध्दा आपण प्रशासकीय मान्यता वित्त आयोगाच्या निधीमधुन देवु शकतात. मनपाच्या निधीमध्ये मात्र आपल्याला २५ लाखची मर्यादा आहे. २५ लाखाच्या पेक्षा जास्त काम कुठलेही काम मंजुर करायचे असेल तर आपल्याला मा.स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागेल. त्यामुळे याच्यामध्ये २५ लाखापेक्षा जरी जास्त खर्च असेल तर तो वित्त आयोगाच्या अंतर्गत करू आपण आणि तो ही महासभेने जो ठराव केला आहे त्याला अधिन राहुन म्हणजे घनकचरा गोळा करणे , वाहतुक करणे आणि प्रक्रीया करणे या असे करण्यास याला आयुक्तांची मान्यता देण्यात येते. आता या सगळया प्रक्रीयेमध्ये आरोग्य खात्याचे उपायुक्तांकडुन हा प्रस्ताव त्याच्यानंतर आपले जे ऑडीटर आहेत ते ही शासनाचेच आहेत त्यांच्याकडुन या सगळया प्रस्तावाची छाननी करून आयुक्तांकडे गेला आयुक्तांची त्याला मान्यता घेण हे मान्यता झाल्यानंतर झालेल्या कामाप्रमाणे त्याच रिडींग उतरवण आणि त्याच्यानंतर ते अदायगीसाठी आपल्या मुख्यलेखाधिकारी यांच्याकडे जातील त्यावेळेला मुख्यलेखाधिकारी पुन्हा या सगळया संदर्भाची तपासणी करून त्याचे अंतिम देयक अदा केले जातात. या सगळया प्रक्रीयेमध्ये जी मागे आपण अनेकवेळेला चर्चा केली आहे की याच्यामध्ये कुठलेही नियमबाह्य काम केलेले दिसुन येत नाहीये. महानगरपालिकेचे कुठलेही आर्थिक नुकसान होत नाहीये. शहराचे आरोग्य अबाधित ठेवणं हे महानगरपालिकेच काम आहे. त्याच्यासाठी जे प्राप्त परिस्थिती मध्ये आपण व्यवहार्य आणि महानगरपालिकेला त्याच आर्थिक हित जपणं आवश्यक आहे. हा निर्णय घेण्याच्या सर्वोपरी त्याप्रमाणे आपण तो निर्णय घेतलेला आहे. जसे आपल्या सन्मा.सदस्यांनी म्हंटल की याला पर्याय काही

होता का आपल्यापुढे मी आता सांगीतल्याप्रमाणे मला तरी वाटतं की आपल्याकडे याच्यापेक्षा दुसरा कुठलाही पर्याय नव्हता. आपल्याकडे महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये कलम ६७ मध्ये अशी एक तरतूद आहे. जर कुठलिही आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली तर नागरीकांची सेवा, नागरीकांचे संरक्षण आणि महानगरपालिकेच्या मालमत्तेंच संरक्षण करण्यासाठी जे इतर वेळेला जे कायद्याप्रमाणे दुसऱ्या एखाद्या प्राधिकाऱ्याची मान्यता घेवुन किंवा प्रत्यक्ष जेव्हा त्याला मान्यता आवश्यक आहे. अशा प्रकारचे निर्णय सुध्दा आयुक्तांनी घ्यावे कारण त्याच्यामध्ये सार्वजनिक हित जोपासणे , सार्वजनिक आरोग्य जोपासणे हे गरजेचं आहे. म्हणजे एखादेवेळेस स्थायी समितीची मान्यता असेल, महासभेची मान्यता लागत असेल, राज्य शासनाची मान्यता लागत असेल अश्या वेळेला नॉर्मल परिस्थिती मध्ये मान्यता लागत असतील. तर अश्या वेळेला जर परिस्थिती उदभवली तर त्या परिस्थिती मध्ये हे निर्णय घेणं हे आयुक्तांना गरजेच आहे. कारण शहरामधल्या नागरीकांचं आरोग्य आणि सुरक्षितता हे अबाधित ठेवणं गरजेचं आहे.त्यावेळेची जर परिस्थिती बघितली , कचऱ्याची परिस्थिती कोविडचा वाढता प्रादुर्भाव मे, जुन मध्ये सुरू झालेला पावसाळा अश्या परिस्थितीमध्ये आपल्याला कुठल्याही परिस्थितीमध्ये शहरातील आरोग्य धोक्यात घेवुन चालणार नव्हत. ती आपली प्राथमिक जबाबदारी आहे.त्यामुळे आपल्याला कुठलीही पर्यायी व्यवस्था करणे गरजेच होत त्यामुळे आपण हि पर्यायी व्यवस्था केलेली आहे.आता याच्यामध्ये दोन गोष्टी आहेत. हि जी काही पर्यायी व्यवस्था आपण करतो. ती पर्यायी व्यवस्था आपल्याला स्थायी समितीच्या निदर्शनास आणण ं गरजेचं आहे कारण ते शेवटी आपण जो निधी खर्च करतो त्याप्रमाणे हा प्रस्ताव माहितीसाठी ठेवलेला आहे.याच्यामध्ये किती खर्च आलेला आहे.कुठल्या कामासाठी आला. कोणत्या एजन्सीवर हा खर्च केला . या सगळया गोष्टी या स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी पाठविणे गरजेचं आहे. तशी तरतूद आपण केलेली आहे ॲक्ट मध्येही आहे. तशी तरतूद हि कलम ६७ मध्येही आहे आणि या सगळया पार्श्वभुमिवर आपण या संविदा या माहितीसाठी , अवलोकनासाठी आपण स्थायी समितीसमोर ठेवलेल्या आहेत. याच्यामध्ये कुठेही अनियमितता होण्याचे काही कारण नाहीये. कारण लेखापरिक्षकांकडुन ज्यावेळेला प्रस्ताव प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी ठेवण्यात येतो. त्यावेळेला आपले मुख्यलेखापरिक्षक यांच्याकडुन तपासला जातो. ज्यावेळेला बिल अदायगीला येते.त्यावेळेला सुध्दा त्या बिलाची तपासणी केली जाते. त्यामुळे हे प्रस्ताव दोन दोन वेळेला मुख्यलेखाधिकारी आणि मुख्यलेखापरिक्षक यांच्या कडुन तपासणी केली जाते. त्यामुळे याच्यामध्ये लेखापरिक्षणा मध्ये काही अनियमितता असेल असे काही कारण नाहीये. आणि जर याच्यामध्ये काही नाही तर हा पार्ट काही वाटत असेल तर त्याचं समर्थन करणे हे आपलं काम आहे आणि त्यामुळे मला असं वाटत की याच्यामध्ये काही सदस्यांच्या मनामध्ये शंका असणं साहजिक आहे. परंतू हि सगळी परिस्थिती विचारात घेतल्यानंतर आपण त्या शंका घेण्याची काही आवश्यकता नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** काही प्रश्न विचारायचे आहेत सर, आपण सांगीतल्या प्रमाणे की कोरोना चा विषय व १४ वा वित्त आयोग जे सर आपण सांगीतल की सुरूवाती पासुन सांगीतल तत्कालीन आयुक्तांनी एस.के. कॉन्ट्रॅक्टरला त्यावेळेस पर्यायी व्यवस्था नव्हती म्हणुन , वॉटरग्रेसने काम बंद केले होते म्हणुन तात्पुरत्या स्वरूपात काम चालु करण्याचे आदेश दिलेले होते.साहेब ते तात्पुरत्या स्वरूपाचं आजपर्यंत समजले नाहीये काय आहे ते तर , तात्पुरत्या स्वरूपाची व्याख्या काय असते हि आजपर्यंत समजलेली नाहीये. परंतू ठिक आहे त्या वेळेला तो जो निर्णय घेतलेला आहे. त्यावेळेचे जे तत्कालीन त्रयस्थ व्यक्ती आणि आपल्याकडे जे होते त्यांच म्हणणं होते आदेश दिले. परंतू त्याच्या खर्चाची जी तरतूद होती. अशा त्या प्रकारच तत्कालीन आयुक्तांनी पत्र दिलेलं नाहीये माझ्या माहितीनुसार , साहेब दुसरा विषय तुम्ही सांगीतला की त्यावेळेला आपल्याकडे एस.के.कॉन्ट्रॅक्टरचं काम चालु होत. परंतू साहेब हे जे काम एस.के. कॉन्ट्रॅक्टरचं बांधकाम विभागाकडे चालु होत आणि साहेब त्याच वेळेस की ज्यावेळेस काम करण्याची आपल्याकडे पर्यायी व्यवस्था नव्हती. आपल्याकडे कोविडची जी स्थिती आहे म्हणुन आपल्याला कामगार भेटत नव्हते. आपण या निविदा काढु शकत नव्हतो, ती परिस्थिती नव्हती, परंतू साहेब एस.के.कॉन्ट्रॅक्टरला आज जवळ जवळ बांधकाम विभागाचे काम करत होता. साहेब याच्या सोबत आपल्याकडे अजुन एक कॉन्ट्रॅक्टर काम करत होता शिवा सिक्युरीटी ज्याचे एस.के.कॉन्ट्रॅक्टरचं काम एकच होत की महानगरपालिकेला कर्मचारी पुरविणे. सर आपल्याला एस.के.कॉन्ट्रॅक्टर हा फक्त आपल्याला नऊ माणसं पुरवत होता. आपण त्याला ४०० माणसांच काम दिलं शिवा सिक्युरीटी हा आपल्याला ४० माणसं पुरवत होता. जेव्हा एस.के.कॉन्ट्रॅक्टर वाला आपल्याला ४२० रूपयांत माणसं देत होता आणि हा आपल्याला ५४३ रूपयांत माणस देत होता. सर तसे कंपेरिझन बघितले तर ४० माणसांच काम करणारा समजा १० रूपयांत काम करत होता आणि आपल्याला १२ माणसांच काम करणारा हा २० रूपयांत काम करत होता . तुमचा विषय वेगळा झ ााला आहे साहेब की आपल्या मनपाचं याच्यामध्ये काही आर्थिक नुकसान होतय का, तिसरा विषय हा आहे की ज्यावेळेला हे सगळ झाल्यानंतर आपण जी स्थिती तयार झाली आपण त्याच्यावर टेंडर काढले होते सर्वांचे महासभेमध्ये सर्वांनी मंजुर केली आणि एस.के.कॉन्ट्रॅक्टरला आपण काम दिलं आपण नविन निविदा काढल्या.

त्यावेळेस सर्व सदस्यांनी याच्यावर पत्र दिलीत. एल -१ उघडल्यानंतर पण ते पत्र असे होते साहेब की त्या पत्रांची ते पत्र असे होते की साहेब आमच्या प्रभाग वाईज ठेके देण्यात यावे.ज्यावेळेस आपण एकमुस्त ठेका देत होते त्यावेळेस विषय झाला होता. सन्मा.सदस्य ज्योतीताईंनी हा विषय मांडला होता की प्रत्येक प्रभागानुसार हा एकमुस्त ठेका करू नये . प्रत्येक प्रभाग नुसार हा ठेका दिला गेला पाहीजे या होणाऱ्या परिणांमांची आम्हाला जाण होती. साहेब आपण नविन होतात तेव्हा शहरामध्ये त्यामुळे आपल्याला जाण नव्हती की बाकीचे सगळे नविन होते. तेव्हा ज्योतीताईंनी हा विषय मांडला होता की प्रभाग समितीनुसार हे ठेके झाले पाहीजे किंवा वॉर्डानुसार हे ठेके झाले पाहीजे. पण साहेब त्यावेळेस दुर्लक्ष केले कारण की याबाबत आम्हाला जाण होती. त्या वेळेस सदस्यांनी जे पत्र दिले तो जो विषय होता तो पहिल्यावेळेस झालेला होता तर त्यावेळेस लॉकडाऊनचा विषयच नव्हता. आपण जे कारण सांगीतले आपण ॲज अ वॉटरग्रेसच्या आपल्या वर्कऑर्डर नुसार कम ईज अ ॲब्रीकेडर आपल म्हणणं एकदम बरोबर आहे साहेब परंतू साहेब त्याच्यामध्ये आपण फक्त एकच गोष्ट जी फॉलो केली फक्त गावाची बाकी साहेब मला सांगा त्या वर्कऑर्डर मध्ये आपण वॉटरग्रेसच्या किंवा वॉटरग्रेसने आपण किंवा त्यांनी साहेब मला सांगा त्या पुर्ण मुद्दयांमध्ये आतापर्यंत म्हणजे त्या टर्म्स ॲन्ड कंडीशनमध्ये आतापर्यंत कुठल्या अश्या गोष्टी आहेत साहेब की त्यांनी त्या पुर्ण केल्या आहेत. एकपण अशी गोष्ट नाहीये साहेब की जर तुम्ही हा विषय सोडुन सांगीतला तर, दुसरा मुद्दा त्यांनी आतापर्यंत टर्म्स ॲन्ड कंडीशन फॉलो केलेले नाहीये. त्याच्यानंतर साहेब तुम्ही जे सांगीतले की त्यावेळेस जे आपलं पॅनल होत महापालिकेतील आपण जे आता सांगीतले की वकील होते की त्यांनी असे दिले की ते नियमबाह्य आहे आपण तसे करू शकत नाही व आपण असे केले तर आपण कायद्याच्या कचाट्यात येवु. ठिक आहे साहेब पण त्यांनी हे पण सांगीतले होते ना साहेब की हा रूल्स फॉलोपण करत नाहीये. आपण रद्द करू शकतो असा त्यांनी अभिप्राय दिला होता ना साहेब आपल्याला मग साहेब आपण हा एकच मुद्दा धरून का केलं सर जो आपण पाचवा मुद्दा सांगीतला की आपला जो खर्च आहे की आपल कुठे नुकसान कुठे होतय का, आपले जे नुकसान होते का साहेब याच्यामध्ये नुकसान असे होतेय की साहेब १९-२० मध्ये आपल्या कडे नविन बोर्ड निवडुन आल्यानंतर सॉरी १८-१९ मध्ये निवडुन आल्यानंतर प्रत्येक प्रभागामध्ये ठेके होते साहेब प्रत्येक प्रभागाचा ३ लाख १० हजाराचा ठेका होता साहेब त्यावेळेस एका प्रभागात दोन वॉर्ड होते सॉरी दोन सदस्य मिळुन एक प्रभाग होता. त्यावेळेस आपल्याकडे चांगल्या पध्दतीने ३ लाख १० हजार रुपयांमध्ये कॉन्ट्रॅक्टर चांगल्या पध्दतीने काम करत होता. तेव्हाच्या आरोग्या संदर्भातील किंवा साफसफाई संदर्भातील तक्रारी बघा आणि आता एकमुस्त ठेका दिल्यानंतरच्या तुम्ही त्या तक्रारी बघा साहेब तुम्हाला याच्यातील फरक समजुन येईल की काय आहे साहेब आपल्याकडे आज आपण जर कॅल्कुलेट केल तर आपल्याला किमान ९ ते १० लाख रूपये एका प्रभागासाठी ४ सदस्यांना लागताहेत. जे आपल्याला ६ लाख रूपयांमध्ये आपलं काम होत होतं आणि ते ही चांगल्या पध्दतीने होत होतं. मग साहेब आपण जर तत्कालीन परिस्थिती पाहीली होती आणि आपण जर पर्याय उपलब्ध नव्हता तर साहेब त्या लोकांनी वर्षभर त्या लोकांनी काम केलेले होते ना आपण ते कंन्टीन्यु करू शकत होते ना. आपण यालाच का दिले एस.के ला दिले आपण त्यांनाही देवु शकत होते. आपण याच्यामधुन सुध्दा देवु शकत होते साहेब जर आपण त्या परिस्थितीमध्ये ऑनलाईन काढु शकत नव्हते तर आपण आता सांगीतले की तुम्ही कॉप्रमाईज करा किंवा आपण त्या वेळेस त्यांचे स्वत:चे ट्रॅक्टर वापरतोय , स्वत:चा ड्रायव्हर आहे, डिझेल वापरत होते. आज आपण हि जी सगळी यंत्रणा आहे. हि आपण त्यांना सांगु शकलो असतो की २ लाख ९९ हजारात किंवा २ लाख ९० हजारात हे काम करा आम्ही तुम्हाला यंत्रणाही पुरवतो. आपल्याला ऑनलाईन टेंडर काढायची काही गरज नव्हती साहेब आपण ज्यांना काम दिलेले होते साहेब ते एकदम चांगल्या पध्दतीने काम करत होते.साहेब आपण एक मुद्दा अजुन सांगीतला की त्यावेळेस परिस्थिती अशी होती की आपण ऑनलाईन महासभा घेवु शकत नव्हतो, स्थायी समितीची सभा घेवु शकत नव्हतो. शासनाने ज्या गाईडलाईन सांगीतल्या होत्या. या परिस्थिती मध्ये सर्व गटनेत्यांना बोलावल होत, महापौरांना बोलावलं, आपल्या लिगल पॅनलच्या वकीलांना बोलावल, परंतू साहेब मी सर्व गटनेत्यांशी जी चर्चा केली , तत्कालीन सभापतींशीही चर्चा केली मला सर्वांनी एकच उत्तर दिल की आतापर्यंत या विषयावर अशी कुठलीही मिटींग ही आयुक्तांनी आम्हाला बोलावुन आम्हाला विश्वासात घेवुन संविदांच्या संबंधीत कुठलीच मिटींग आतापर्यंत झालेली नाही. साहेब आणि आता जो आपण शेवटचा मुद्दा सांगीतला तो १४ वा वित्त आयोगाचा साहेब १४ वा वित्त आयोगाचे आपल्याला अधिकार आहे. आयुक्तांना १०० टक्के अधिकार आहे की या संविदा मंजुर करून घ्यायायच्या परंतू साहेब त्याच्या अगोदर प्रस्तावित काम, प्रस्तावित संविदा हि अनुज्ञेय असलेल्या कामांपैकीच असावे. ठिक आहे साहेब ती घनकचरा संबंधी असेल किंवा साफसफाई संदर्भातील असेल. मागील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारण सभेत कामाची शिफारस केली पाहीजे. साहेब कुठल्या ठरावा अंतर्गत अशी शिफारस झालेली होती की ठेका फक्त एस.के. कॉन्ट्रक्टरलाच दिला गेला पाहीजे किंवा एस.के. कॉन्ट्रॅक्टरच हा योग्य आहे किंवा एस.के. कॉन्ट्रॅक्टरच हा टेक्नीकल आहे. एस.के. कॉन्ट्रॅक्टरलाच माणस

पुरविण्याचा अधिकार आहे. त्याला अनुभव नसतांना तुम्ही त्याला साढेसातशे लोकांच काम देवुन टाकलं आहे साहेब हे नियमात बसत नाही. तिसरे असे की साहेब या कामांना सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी सॅग्नसन असले पाहीजे असे आपण आता सांगीतले की अमुक आहे हे आहे प्राधिकरण आहे. तर साहेब हे टेक्नीकलच झालेले आहे का साहेब हे जे आहे ना याच्यामध्ये आम्हाला जो संशय आहे ना साहेब तर हे सर्व प्रश्न आहेत साहेब , मला सांगा ना साहेब तुम्ही सर्वसाधारण सभेत तुम्ही करून घेतलेले नाहीये. १४ वा वित्त आयोग अनुज्ञेय आहे १४ वा उवित्त आयोग अनुज्ञेय आहे पण का आहे तो अनुज्ञेय आणि त्याच्यामध्ये सर्वात मोठा प्रश्न असा आहे की आपण संविदा मंजुर करून घेतल्यानंतर त्याचे देयक पण झालेले आहेत. तत्कालीन लेखापालांनी टिप्पणी दिलेली आहे की या सगळया कामांच्या पर्यायी व्यवस्था होईपर्यंत या कामांचे देयक हे वॉटरग्रेस कंपनीकडुन वसुल करण्यात यावे. तसे न करता साहेब तुम्ही १४ वा वित्त आयोगातुन तुम्ही त्याचे बिल काढुन टाकले तर साहेब हे सर्व संशयास्पद आहे का किंवा याच्यावर आम्हाला आपल्याकडुन काही मार्गदर्शन मिळेल तर आमच्या शंकाच निरसन होईल साहेब.

**मा.आयुक्त :-** हा विषय जो आहे याच्यामध्ये महानगरपालिकेकडुन पुर्वी प्रभाग निहाय ठेके दिले गेले होते

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब त्यावेळेस चा विषय नाहीये तात्पुरत्या स्वरूपाचा मुद्दा आहे हा.

**मा.आयुक्त :-** सांगतो ना पहिला मुद्दा असा एक मुस्त ठेका रद्द करणे माझ्या माहितीप्रमाणे पहिले जे काही आपण ठेके दिले होते त्या ठेक्यांची मुदत संपल्यानंतर आपण वॉटरग्रेसचे आपण एकत्रित पणे हे टेंडर काढले त्यावेळी तो महासभेचा निर्णय होता की संपुर्ण शहराचा ठेका हा पाच वर्षासाठी देण्यात यावा.आज माझ्या माहितीप्रमाणे जुन, जुलै मध्ये हा केला असेल कारण आपण ऑगष्ट २०१९ पासुन हे काम सुरू केलेले आहे.म्हणजे वॉर्डवाईज ठेके न देता एकत्रित ठेका देण्याचा निर्णय हा महासभेमध्येच कायम करण्यात आला होता. आता अर्थात तेव्हाच्या महासभेमध्ये आपण असाल. मुद्दा नंबर दोन त्यावेळेच्या आयुक्तांनी तात्पुरती व्यवस्था बरोबरच आहे कारण जोपर्यंत वॉटरग्रेसचा अंतिम निर्णय होत नाही. तोपर्यत आपली हि तात्पुरती व्यवस्था आहे ना ज्यावेळेला आपण एक कायमस्वरूपी व्यवस्था करू त्यावेळेला आपण तात्पुरती व्यवस्था घेतली होती त्यावेळेला कायमस्वरूपी व्यवस्था म्हणजे आपण वॉटरग्रेस ची ५ वर्षासाठी निर्माण केलेली होती. ती जर आपण बंदही केली तर त्यावेळेला आपल्याला पुन्हा एक वर्षा करीता, दोन वर्षाकरीता करण्यासाठी हा आपण महासभेमध्ये निर्णय घेवु. जोपर्यंत वॉटरग्रेसच्या संदर्भामध्ये आपण अंतिम निर्णय घेत नाही.एक तर त्याचा ठेका रद्द करायचा का पुन्हा त्याला संधी द्यायची. याचा निर्णय जोपर्यंत येत नाही तोपर्यंत केलेली जी व्यवस्था आहे ती तात्पुरती व्यवस्था आहे. आणि म्हणुन त्यावेळेच्या आयुक्तांनी हि तात्पुरती व्यवस्था केली असेल. तिसरा मुद्दा आपण जो उपस्थित केला की त्यावेळेच्या आयुक्तांनी तात्पुरती व्यवस्था करून त्यांना काम करण्यासाठी दिली तर त्याचा निधी मंजुर करून दिला नव्हता. आता मला सांगा एखाद्याला आपण काम करायच्या सुचना दिल्यानंतर आपल्याकडे फुकट कोण कसा काम करेल. तो काम करतोय तर आपण त्याला दरमहिन्याला पैसे तर दिले पाहीजेत ना. यात व्यक्तीगत मत नोंदवु नये ना, कदाचित त्याला मजुर आल्यानंतर त्यालाही मजुरी द्यावी लागेल. दरम्यानच्या काळामध्ये ६ मार्च ला हा ठेका त्याने काढुन घेतला १५ मार्चला माझी नियुक्ती झाली मधल्या पिरीएड मध्ये कदाचित त्याच्याशी चर्चा झाली नसेल १० दिवसांमध्ये असे तर नाही ना की त्यावेळेला एस.के.कॉन्ट्रॅक्टर ला आपण काम करायच त्यावेळेच्या आयुक्तांनी सांगीतलं पण निधी मात्र द्यायचा नाही . पण फुकट तर काम करून घेण अपेक्षित नाही. चौथा मुद्दा जो आपल्याला अपेक्षित होता की आपण एस.के.कॉन्ट्रॅक्टरला आपल्याकडे ज्यावेळेला काही पर्यायी व्यवस्था नव्हती. त्यावेळेला सिक्युरीटी पुरविणारी आपली जी एजन्सी होती. आपण जे काम करून घेतलेले आहे. ते दोन प्रकारचे आहे एक आपल्याला लागणारी वाहने पुरवायची म्हणजेच ट्रॅक्टर आणि दुसरी गोष्ट म्हणजे मजुर पुरवायची हा जो ठेका आहे हा एस.के.कॉन्ट्रॅक्टरचा हा मजुर पुरविण्याचा आणि ट्रॅक्टर पुरविण्याचा आहे हे काम आपल्याला करून घ्यायचे होते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब

**मा.आयुक्त :-** एकच मिनिट माझं संपु द्या मग बोला , सिक्युरीटी सर्विसेसचा जो ठेका आहे तो मजुर पुरविण्याचा किंवा ट्रॅक्टर पुरविण्याचा ठेका नव्हता तो ठेका सिक्युरीटी सर्विसेसचा होता. त्यावेळेला कोविडच्या सेंटर वर लागणारे जे कर्मचारी होते ते आपण त्यांच्याकडुनच घेतले. कारण ते काम सिक्युरिटी सर्विसेसचे होते. कारण आपल्याला ज्या ठिकाणी सुरक्षा रक्षकांची गरज लागली त्या ठिकाणी आपण सिक्युरीटी सर्विसेसची मदत घेतली. ज्या ठिकाणी आपल्याला वाहने आणि लेबरची गरज लागली. तर लेबर आणि वाहने पुरविण्याचा ठेका ज्यांचा मंजुर होता म्हणुन आपण त्यांच्याकडुन वाहने घेतली. आता चौथा जो मुद्दा आहे की वित्त आयोगाच्या संदर्भामध्ये आता वित्त आयोगाच्या संदर्भामध्ये खर्चाला मान्यता किंवा प्रशासकीय मान्यता हि आयुक्त देतात परंतू वित्त आयोगाच्या निधी मधुन कोणत काम घ्यायचे त्याच्या बाबतीत आत्ता आपण चर्चा केली. समजा आपण वित्त आयोगाच्या निधीमधुन कोणती काम घ्यायची याचे नियोजन आपण २०१६ च्या महासभेच्या ठरावामध्ये केलेल

आहे. त्याच्यामध्ये त्याचा उल्लेख आहे तो जर ठराव आपण वाचला त्याच्यामध्ये घनकचरा व्यवस्थापनाची सर्व संबंधित कामं हे आपण १४ व्या वित्त आयोगामधुन करणार होतो. त्यामुळे आपण वॉटरग्रेसच कामही १४ वा वित्त आयोगातुन घेतले होते आणि वॉटरग्रेसच काम तात्पुरत बंद झाल्यानंतर ते काम हि तात्पुरती व्यवस्था आपण केली ते ही काम १४ व्या वित्त आयोगातुनच केले आहे. हे १४ वा वित्त आयोगातुन काम कोणते होते की कचरा गोळा करायचं आणि तो कचरा डेपोत नेऊन टाकायचा. जे काम वॉटरग्रेस करत होते तेच काम आपण एस.के.कॉन्ट्रॅक्टरला दिलेले होते. त्यामुळे पहिले जे काम चालु होते हेच काम आपण दिले होते. त्यामुळे याला वेगळी परवानगीची गरज नाहीये.हा जो महासभेचा ठराव आहे.त्यामध्ये आपण १४ व वित्त आयोगाच्या निधीमधुन घनकचरा व्यवस्थापनाच्या संबंधित काम दिलेली आहेत.आजही आपण घनकचरा व्यवस्थापनाच्या संबंधित कुठल हे आले आता सन्मा.सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला होता. त्याठिकाणी शौचालय बांधले आणि त्याठिकाणी अप्रुवरचे तर आता पुन्हा आपल्याला महासभेसमोर जाणार आहोत का , तर यामध्ये घनकचरा व्यवस्थापनाच्या अंतर्गत जे जे काम असेल ते काम आजही आपण करू शकतो प्रशासकीय मान्यता आहे आणि याला महासभेची मान्यता झालेली आहे.त्यामुळे या कालावधीमध्ये जी कामं आपण करायचं ठरविलेले आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी हि कामं आहेत याच्याशी काही दुमत मांडायच काही कारण नाहीये.त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनाचे काम त्याला मान्यता सभागृहात देण्यात आलेली आहे. आणि आयुक्तांच्या मार्फत संविदेला मान्यता दिली जाते. परंतु याच्यामध्ये कुठल्याही प्रकारचा आणि राहीला विषय की दराचा की ५४३/- चा आपण ५२०/- मध्ये मान्य करतोय आणि हा ५२०/- चा दर हा काही प्रशासनाने निश्चित केलेला नाहीये. याच्यासाठी रितसर निविदा प्रक्रीया झालेली आहे. ई-टेंडरींग झालेले आहे. त्या निविदा प्रक्रीयेमध्ये तो एल-१ आलेला आहे. तो दर याच सन्मा.स्थायी समितीने मंजुर केलेला आहे. आणि तो दर सुध्दा हा ऑगष्ट २०२० पर्यंतच्या कालावधी करीता मंजुर आहे. आपण जो मुद्दा उपस्थित केला की तुम्ही करार केलेल्या जुन्या लोकांना बोलावुन घेतले . ज्यांच्या पिरिएड ऑलरेडी संपेलेला आहे.त्यांना बोलवायचे काही कारण नाही. ज्याचा कॉन्ट्रॅक्ट आता चालु आहे.ऑगष्ट २०१९ पासुन ऑगष्ट २०२० पर्यंत आपण त्यावेळेच्या किमान वेतनाप्रमाणे मंजुर केलेले दर आहेत.त्यावेळेचे जे दर असतील जसे आपण म्हणताहेत की ३ लाखामध्ये दिले होते तर ते त्यावेळेच्या किमान वेतन आयोगाप्रमाणे असतील. त्यामुळे आपण त्या दरामध्ये २०१९-२० मध्ये काम करणे अपेक्षित नाही. २०१९-२० चे काम देत असतांना २०१९-२० किमान वेतनाप्रमाणे ज्याचे दर मंजुर करायचे होते आपण केलेले आहेत . आणि त्या मध्ये या स्थायी समितीमधुन मंजुर केल्यानुसार या पिरिएड मध्ये या पिरीएड मध्ये म्हणजे या ठेकेदाराची मुदत ऑगष्ट २०२० पर्यंत असल्यामुळे आपल्याला ते देणं प्रशासकीय दृष्टया सुध्दा योग्य होत . आणि म्हणुन हा ठेका आपण त्याला दिलेला आहे आणि अश्यानंतर आपण म्हणतोय की आपल्याला त्यावेळेच्या परिस्थिती मध्ये देणं हि पर्यायी व्यवस्था म्हणुन उपलब्ध करून घेणं आवश्यक होते. पुढचा एक मुद्दा आपण जो मांडला विधि सल्लगारांनी जो रिपोर्ट दिला विधी सल्लागार याच्यामध्ये असे सांगीतले होते की महानगरपालिकेच्या कायद्याप्रमाणे ठेका रद्द करण्याचा मनपाला अधिकार जरूर आहे. परंतू हा ठेका रद्द करण्यापुर्वी जर तो संधी मागतोय तुम्हाला तर एक संधी देण्यामध्ये काही हरकत नाही. हा अभिप्राय आपल्या रेकॉर्ड मध्ये आहे पाहुन घ्या.चौथा मुद्दा जो काढला की लवादाच की लवादाच आणि त्याच्या मध्ये गैरव्यक्तीची मागणी करण त्यांनी आपल्याकडे आक्षेप नोदविलेला आहे. त्याच्यावर आपण लवाद कोण असाव हे निर्णय घेण्यात आलेला नाही. हा निर्णय ज्यावेळेला हे मुद्दे लवादकडे गरज भासेल आपल्याला त्यावेळेला महासभेच्या मान्यतेने लवाद कोण असावं याच्यावरती आपल्याला निर्णय घ्यावा लागेल.तो निर्णय प्रशासनाच्या स्तरावर घेतला जाणार नाही.लवाद म्हणुन कोण असावं. लवादकडे सोपवायचे की नाही या वरची कार्यवाही कशी राहील. आणि हे सगळे विषय मा.महासभेच्या मान्यतेने योग्य वेळी करण्यात येईल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब आता याच्यामध्ये आपल्याकडे शिवा कॉन्ट्रॅक्टर जो होता आणि हा जो आहे साहेब आता मला सांगा दोघे टेक्निकल आहेत का? हे दोघं टेक्निकल आहेत का? आता आपण जसे आत्ता जे सांगीतले की ट्रॅक्टर पुरविण्यासाठी किंवा मजुर पुरविण्यासाठी आपण त्यांच्याकडे कॉन्ट्रॅक्ट दिले. आता सिक्युरीटी वाला आणि हा तर मला सांगा साहेब दोघे टेक्निकल आहेत का? टेक्निकल म्हणजे सर आता आपल्याला बांधकाम विभागाच्या कामासंदर्भामध्ये जसे सिव्हिल इंजिनियर चे ट्रेड हवे असते . तर समजा आपण त्या पध्दतीनेच आपण ते काम करतो. तर त्या मध्ये तो टेक्निकल आहे का . तो शिवा सिक्युरिटी जो आहे. त्याच्या ज्या टर्मस कंडीशन असतात. तर तो त्याच टर्मस ॲन्ड कंडीशन मध्ये काम करतोय का आणि हा पण त्याच टर्मस ॲन्ड कंडीशन मध्ये काम करतोय का. कारण आपण त्याला बांधकामांच काम दिले होते. त्याला आपण आरोग्याच काम दिले. जसे आपल्याला माहिती आहेच आहे. म्हणजे एस.के.कॉन्ट्रॅक्टरला हे काम दिले, आरोग्याधिकारी जो आहे तो सिव्हिल इंजिनियर आहे.बांधकामला कोण आहे तर त्याने प्लंबरचा डिप्लोमा केलेला

आहे.अशी परिस्थिती आहे. म्हणुन साहेब तुमच्या कडे तसे असेल म्हणजे आम्हांला माहिती नाही. कदाचित तसे असेल तर साहेब मला सांगा कि हे टेक्निकल आहे का ?

**मा.आयुक्त :-** या मुद्दयांचा मी तुम्हाला खुलासा करतो, की यामध्ये जी काही कामं आपल्याला द्यायची आहेत तर त्या कामाला आपण त्याला सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे. आता याच्यामध्ये दोन विषय आहेत. या मध्ये की जे काम तांत्रिक स्वरूपाचे आहे. तर या मध्ये लिगल करावे लागेल . आता हा पुरवठा हा काही डिएसएल प्रमाणे होत नाही. त्यासाठी काही ईस्टिमेट होत नाही. हे जे काही काम आपण त्याला देणार होतो .ते किमान वेतन आयोगाप्रमाणे किंवा किमान वेतन दराप्रमाणे जे काही आपल्याला लेबर आवश्यक आहेत ते त्याच्याप्रमाणे आपण त्याच्यातुन निश्चित करतो एस.के.कॉन्ट्रॅक्टरची ज्यावेळेला आपण निविदा काढली. त्याही वेळेला आपण नियमाप्रमाणे वेतनाचा दर निश्चित करून घेतलेला होता. वॉटरग्रेस साठी ही आपण वेतन दर निश्चित करून घेतलेला होता.आणि किमान वेतनाच्या प्रमाणे हे जे दर आहेत. हे आपण लक्षात घेवुनच हे काम दिलेले आहे. आता याच्यामध्ये यापुर्वीचे जे कॉन्ट्रॅक्टर होते ते त्यांचे सुध्दा आपण किमान वेतनाचे दर निश्चित करून घेतलेले होते.किंवा कोविड साठी जे लेबर कॉन्ट्रॅक्टरचे आणले होते त्यावेळेलापण आपण किमान वेतनाचे दर निश्चित करून घेतले होते.जे काम आपण करून घ्यायचे आहे ज्याचे ईस्टिमेट आपण करतो.त्याला आपल्याला मान्यता हि घ्यावीच लागते. वित्त आयोगात सुध्दा आपण जी काम करतो त्यावेळी सगळे घनकचऱ्याचे जे काम करतो त्यावेळी चाचपणी करतो व त्यानंतरच आपण काम करतो. घनकचऱ्यांचा जो काही आपला निधी आहे.त्याला आपण तांत्रिक मान्यता देतो. लेबर पुरवठ्याच्या बाबती मध्ये जे दर आहेत. तर आपण हे डिएसआर ऑफीस कडुन आपण हे दर लेबर ॲक्ट प्रमाणे ते करतात त्यामुळे प्रत्येक वेळेला आपण लेबर ऑफीसला पत्र देतो की आता मिनिमम रेटस किती आणि त्याप्रमाणे आपण निविदा काढतो . जी निविदा आपल्याला मिनिमम रेट पेक्षा कमी येते ते दर आपण मंजुर करतो . तिच प्रक्रीया आपण लेबर कॉन्ट्रक्ट च्या बाबतीमध्ये मग ते वॉटरग्रेसचे असेल, एस.के.कॉन्ट्रॅक्टर असेल किंवा परवाच आता एका त्याचे नांव आता काही लक्षात येत नाहीये. म्हणजे कोविड साठी जे आपण कॉन्ट्रॅक्ट दिले होते. त्यावेळी आपण हिच प्रक्रीया राबविली होती .

**श्री.कुलभुषण पाटील :-** ठिक आहे सर आता आपल्या म्हणण्यानुसार आपण काम दिले होते. आपण म्हणल्यानुसार दोघांनाही काम म्हणजे असं लक्षात येत की जे दोघांना जे काम दिले गेले आहे.ते नॉन टर्म्स ॲन्ड कंडीशन मध्ये दिलेल आहे.असंच ना म्हणजेच टर्म्स ॲन्ड कंडीशनच दिलेल्या नाहीत आपण त्यांना काही दोघांना काम करण्याच्या आपल्या म्हणण्यानुसार जसे आपण सांगताहेत की आपल्याला एखाद्या प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी असणे गरजेचे असते. तसे यांच्या बाबतीत नाहीये. यांना फक्त मिनिमम रेटस नुसार आपण हे काम दिलेले आहे.

**मा.आयुक्त :-** लेबर कॉन्ट्रक्ट जे आहे ते लेबर पुरविण्याचे आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब माझे म्हणणे मुळातच ते आहे की आपण हे जे टेंडर काढले तर जश्या पध्दतीने केले त्या पध्दतीने कुठल्याच टर्म्स ॲन्ड कंडीशन मध्ये दिले गेलेले नाहीये.फक्त याच्यात एकच कंडीशन दिली गेलेली आहे की आपण यांना जे काम दिले गेलेले आहे ते म्हणजे किमान वेतन आयोगाच्या रूल्स फॉलो करून आपण ते काम दिलेले आहे. आपण तर काही त्यांना आपण काम करण्याकरीता कोणत्याही टर्म्स ॲन्ड कंडीशन मध्ये दिलेल्या नाहीयेत. असेच ना साहेब

**मा.आयुक्त :-** लेबरच्या बाबतीमध्ये ज्या

**श्री.कुलभुषण पाटील :-** मला सांगा साहेब साफसफाईच्या बाबतीत मी .

**मा.आयुक्त :-** मी सांगतो एक मिनिट दोन गोष्टी मध्ये आपण मनपा हद्दीमध्ये आपण फक्त त्यांच्याकडुन लेबर पुरवुन घेतले. आपण त्यांना म्हणजे कचरा उचलण्याचे काम असेल ते आपण त्यांना दिले नव्हते व आपण त्यांना कचरा उचलण्याचा ठेका दिला नव्हता एस.के.कॉन्ट्रक्टरला आपण फक्त त्याच्याकडुन ४०० लेबर घेतले होते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** लेबर आणि ट्रॅक्टर

**मा.आयुक्त :-** लेबर आणि ट्रॅक्टर आता आपण ट्रॅक्टर ही काही दिवसच घेतले.त्याच्यानंतर आपल्या ज्या ४०७ ज्या पिकअप व्हॅन होत्या. त्यापुर्वी आपण घंटागाडी साठी घेतल्या होत्या त्या बंद पडल्या होत्या. जवळपास दिड वर्ष त्या बंद होत्या. आपल्याला ट्रॅक्टरवर जादा खर्च करावा लागु नये.म्हणुन आपण त्या दिड वर्षापासुन बंद असलेल्या ४०७ पिकअप व्हॅन त्या आपण दुरूस्त करून घेतल्या आणि इतर ज्या पुर्ण मला वाटत की बाकीच्या ज्या गाडया आहेत .त्या आपण वापरात आणल्या आणि मग जी एस के कॉन्ट्रॅक्टरने जी वाहने आपल्याला दिलेली आहेत. ती सुध्दा आपण बंद करून टाकली. हे फक्त आपण मॅच्युरीटी मध्ये केले होत.आता लेबर च्या संदर्भामध्ये जी काही टर्म्स ॲन्ड कंडीशन आहेत ती प्रत्येक कॉन्ट्रक्टर जो आहे तो कायदा आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मला एक सांगा साहेब मीही तेच म्हणतोय. की आपण टर्म्स ॲन्ड कंडीशन मध्ये होते का

**मा.आयुक्त :-** एकच मिनिंट

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपण तसे लिहुन घेतलेले आहे का ? तसे बंधपत्र केलेले आहे का ? ते सांगा ना

**मा.आयुक्त :-** कुलभुषणभाऊ मी तुम्हाला तेच सांगतोय की तोच मुद्दा सांगतोय कायदा हा प्रत्येकाला लागु आहे. तुम्ही कायदा बंधनकारक आहे असे म्हंटलात तरी लागू आहे , नाही म्हंटलात तरी लागू आहे.लेबर कायदा हा सगळयांना लागु आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब माझं म्हणण असे आहे की त्यांना कॉन्ट्रॅक्ट देतांना काही लिहुन घेतले आहे का ? काही त्याच्यात टर्म्स ॲन्ड कंडीशन दिलेल्या आहेत का ? नाही दिलेल्या आहे की नाही आमच म्हणणंच ते आहे साहेब दिलेल्या असेल तर हो नाही तर नाही

**मा.आयुक्त :-** सांगतो मी

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब आपल्याला कायद्याचा हा विषय बोलायचाच नाहीये आपल्याला एस.केच्या कामाबाबत काही हे नाही . त्याने बंधपत्र करून दिलेले आहे का? किंवा नाही करून दिलेले आहे तो विषय वेगळा आहे साहेब तो बांधकाम विभागात कोणत्या पध्दतीने काम करतोय की नाही करतोय जातोय की नाही जातोय तो विषय वेगळा आहे. माझं म्हणणं अस आहे की आपण त्याला ४०० कामगार पुरविण्याचे काम दिलेले आहे. त्या करीता आपण त्याच्याकडुन तुम्ही काही टर्म्स ॲन्ड कंडीशनच्या किंवा काही बंधपत्र तयार करून घेतलेले आहे का?

**मा.आयुक्त :-** आता याच्यामध्ये त्या एजन्सी ने हे काम घेतले होते हा करार बांधकाम खात्याने केला, आरोग्य खात्याने केला आहे असे नाही हा करार महानगरपालिकेने केलेला आहे.त्याला स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.खात बांधकाम असले काय किंवा आरोग्य असले काय कामाच स्वरूप एकच आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब कामाच स्वरूप नाही म्हणत आहे. आता याच्यामध्ये

**मा.आयुक्त :-** एकचं मिनिंट

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही नाही साहेब तसे काही नाही.तुम्ही ज्या संविदा केल्या तुमचं म्हणण बरोबर आहे.आपले इंजिनियर जे आहेत ते आरोग्याधिकारी आहेत. तर हे समजुन घ्या.

**मा.आयुक्त :-** विषय हा

**श्री. नितीन लढ्ढा:-** कुलभुषण भाऊ तुम्ही समजुन घ्या.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही ना भाऊ त्याच्यासाठी पण नियम आहे.

**मा.आयुक्त :-** मी तुम्हाला तेच तर सांगतोय

**श्री.कुलभुषण पाटील :-** हे जे संविदेचे जे नियम आहेत . आणि

**श्री. नितीन लढ्ढा:-** कामगार कायद्याप्रमाणे दिले आहे.

**श्री. नितीन बरडे :-** भाऊ ते साहेब तेच सांगताहेत ना

**श्री.कुलभुषण पाटील :-** मान्य आहे ना पण

**श्री. नितीन लढ्ढा:-** कामगार कायद्याप्रमाणे केलेला करारनामा काय म्हणतोय की

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ

**श्री. नितीन लढ्ढा:-** एक मिनिंट

**मा.आयुक्त :-** लेबर पुरविणे हे बांधकामला पुरविणे किंवा आरोग्याला पुरविणे बाबतचा कायदा एकच आहे त्यामुळे

**श्री.कुलभुषण पाटील :-** स्थायी समितीने जो ठराव केलेला होता साहेब तो बांधकाम विभागासाठी केलेला होता साहेब तो आरोग्य विभागासाठी हा ठराव केलेला नाहीये साहेब एस .के. कॉन्ट्रॅक्टरला फक्त बांधकाम विभागासाठी ठराव केलेला होता साहेब

**मा.आयुक्त :-** मान्य आहे मी सुरूवातीलाच तुम्हाला सांगीतले की बांधकाम खात्याच काम एस.के.कॉन्ट्रॅक्टरला का देण्यात आले.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ते तर लक्षात आले साहेब याच्यात की त्या अनुषंगाने आपण हे काम दिलेले आहे की नाही?

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे

**श्री.कुलभुषण पाटील :-** मग साहेब मला सांगा आरोग्य खात्याच आणि बांधकाम खात्याच दोघं कामांचे वेगळेवेगळे बंधपत्र करून घेतले आहे का ? की त्या एका बंधपत्रावर किवा त्या अटी शर्तींनुसार त्याला हे काम देण्यात आलेले आहे.

**मा.आयुक्त :-** मी याच्यामध्ये एकच तुम्हाला सांगीतले की जे काम आहे हे लेबर पुरवण्याचं हे आणि वाहनं पुरविण्याचं आता हे त्याच काम ऑलरेडी झालेले आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** लेबर पुरविण्याचे जे तांत्रिक कुठलीही मान्यता घेण्याची गरज नसते का? समजा आपण एखाद्याला मजुर पुरविण्याचे आहे.आता ४०० मजुर पुरवणं याच कामासाठी देणार आहे. तर त्यांनी ते कामही करून घ्यायचं आणि ते ४०० मजुर पुरवायचे म्हणजे त्याला काही टर्म्स , कंडीशन असे काही की रूल्स नुसार काही पुरविले गेले पाहीजे. ते कसे असले पाहीजे किंवा काय नको असले पाहीजे म्हणजे त्या टर्म्स, आपण काय म्हणतो त्याला त्यांच्या काय त्या शारीरीक चाचण्या झाल्या पाहीजे. नको झालेल्या असल्या पाहीजे. त्यांचे पी.एफ असले पाहीजे. बँकमध्ये खाते असले पाहीजे असे काही , ते महाराष्ट्रातले रहिवासी असले पाहीजे किंवा परदेशातील रहिवासी असले पाहीजे असे काही म्हणजे साहेब मी आता माहिती घेतोय म्हणजे टर्म्स , कंडीशन व्यतिरीक्त आपण काही घेतले होते का साहेब

**मा.आयुक्त :-** आपण जो मुद्दा मांडला तो अतिशय चांगला आहे

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब मी , साहेब मी

**मा.आयुक्त :-** आपल्या ज्या शंका आहेत .

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब मला काही घेणे देण नाही त्याच्याशी

**मा.आयुक्त :-** आपल्या ज्या शंका आहेत त्यांचं उत्तर देण्याचं काम माझ मी केलेले आहे. आणि हि आपण चर्चा करतोय. वॉटरग्रेसला आपण लेबर पुरवण्याचा ठेका दिला होता. त्याच्या अगोदर आपण प्रत्येक वॉर्डवाईज दिलेले होते. त्याच्यानंतर आता आपण कोविड सेंटर साठी जे आपण कॉन्ट्रॅक्ट दिले आहे.त्याच्यामध्ये जी प्रक्रीया वॉटरग्रेसने व महानगरपालिकेने केलेली आहे. तशाच पध्दतीची प्रक्रीया एस.के. कॉन्ट्रॅक्टरशी बांधकाम खात्याकडून झालेली होती. त्याच्यामध्ये या दोन पध्दती काही वेगळया नाहीयेत

**श्री.कुलभुषण पाटील :-** हो ना साहेब मला सांगा तुम्ही म्हणजे

**मा.आयुक्त :-** काही फरकच नाहीये याच्यामध्ये

**श्री.कुलभुषण पाटील :-** माझ म्हणण एकच आहे साहेब आपण त्या बांधकाम खात्याला म्हणजे एस.के.कॉन्ट्रक्टरला का दिले होते. त्या अनुषंगाने आपण आरोग्य विभागाचे काम दिलेले आहे.

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** बरोबर आहे ना म्हणजे साहेब त्याला

**आयुक्त :-** मग मी तेच निरसण केले ना आपल्याला

**श्री.कुलभुषण पाटील :-** मग बांधकाम खात्याला ज्या टर्मस कंडीशन होत्या त्याच फॉलो करून आपण त्याला हे काम दिलेले आहे.

**मा.आयुक्त :-** मी तुम्हाला सुरूवातीलाच सांगीतले की या कामासाठीची निविदा मंजुर करता येणार नाही म्हंटल्यानंतर आपल्याला बांधकाम खात्यासाठी मजुर पुरविणारा जो कॉन्ट्रॅक्टर आहे. तर आपण त्याला ते काम दिलेले आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** माणसे पुरविण्याचे

**मा.आयुक्त :-** माणसे पुरविण्याचे आणि वाहने पुरविण्याचे

**श्री.कुलभुषण पाटील :-** तो माणसे पुरवत होता ४५० ते ५०० लोक तर मला एकच सांगायचे होते की

**मा.आयुक्त :-** तुम्हाला याची पार्श्वभुमि मी सांगीतली व सगळी चर्चा झाली आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब तुम्हाला एक सांगतो मी त्याला हे काम कुठलेच टर्मस कंडीशन व कुठलेच रूल्स फॉलो करून देण्यात आलेले नाही. माझ्या वॉर्डामध्ये आज विस कर्मचारी अनुपस्थित राहतात आहे साहेब मग साहेब हे जे सगळ चाललेल आहे साहेब हे शहराला वेठीस धरण्याचे नाहीये का साहेब. मला सांगा त्याला काही टर्मस कंडीशन घालुन दिल्या आहे की नाही. त्याच्यावर अंकुश नाहीये . काम बंद आहे त्याची गरज नाहीये. नविन घंटागाडया दिल्या आपण त्याला साहेब त्याने भंगार करून टाकल्या आहेत. पुढच्या वर्षी स्क्रॅप मध्ये कराव्या लागतील त्या साहेब त्या जर कधी आर.टी.ओ ची अनुज्ञप्ती घेतली तर

**मा.आयुक्त :-** दोन मिनिंट विषय आपण एस.के.कॉन्ट्रॅक्टरच्या आपण करतोय वॉटरग्रेस चा नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब

**मा.आयुक्त :-** या विषयावर आपण चर्चा करूया , वॉटरग्रेसच्या कामाच्या संदर्भात चर्चा करायची असेल सभापती सांगतील त्यावेळेस आपण त्याच्यावर चर्चा करू. आपला तो निश्चितच

**मा.सभापती :-** कुलभुषण भाऊ आता एस.के.चा विषय आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब मुळातच म्हणणं काय आहे माहिती आहे का आपण जे काम दिले ना ते काम ठिक आहे घाईत दिले असेल. काही तपासणी करून दिलेले असेल. ज्या काही पध्दतीने दिले असेल. पण तो त्याच्या कामामध्ये नियमित पणा नाही. दुसरा विषय आपण महानगरपालिका म्हणुन त्यांच्यावर कुठलाच अंकुश नाही. आणि असे असतांना देखील साहेब आपण त्याचे करोडो रूपयाचे देयक अदायगी झालेले आहेत.

**मा.आयुक्त :-** आता एस.के.कॉन्ट्रॅक्टर ला जे काम दिले होते जे काही तिन चार महिने काम झाले दोन्ही आरोग्य अधिकारी आपले येथे उपस्थित आहेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब मी प्रत्येक वेळेस तक्रार दिलेली आहे. त्याची प्रत्येक वेळेस तक्रार केलेली आहे.

**मा.आयुक्त :-** एकच मिनिंट आता जे काम आपण त्याला दिलेलं होत. कर्मचारी त्यांनी पुरवायचे. हजेरी आपल्या सॅनिटरी इन्स्पेक्टरने घ्यायची आहे.त्याला काम ऑर्डर आपणच करायचं आहे.त्याच्याकडे काम आपण सोपवुन द्यायचे आहे.जर त्याने काम वेळेवर पुर्ण केलेली नसतील. तर आपण त्यांच्या गैरहजेरी मांडलेली असेल. त्याचा खुलासा आरोग्याधिकाऱ्यांनी करावा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** त्याच्या प्रत्येक वॉर्डातील तक्रारी आहेत.

**मा.आयुक्त :-** आणि तो जो चार महिन्यांचा पिरिएड आहे. त्या चार महिन्याच्या पिरिएड मध्ये या एस.के.कॉन्ट्रॅक्टर कडुन पुरविलेल्या लेबर वर आपले कश्या पध्दतीचे नियंत्रण होते.

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** एस.के.कॉन्ट्रॅक्टर ने आपल्याला वेळोवेळी जे लेबर पुरिवले होते. त्याचीच फक्त आपण हजेरी मांडलेली आहे. एस.के.कॉन्ट्रॅक्टर आपल्याला लेबर पुरवायचा आणि त्यांच्याकडुन काम करून घेणे हे काम महानगरपालिकेचं होत. आपण एस.आय आणि सी.एस.आय मार्फत हे काम करून घेत होतो.त्यांच काम फक्त आपल्याला लेबर पुरवायचे होते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब अक्षरश: झालेले काय आहे.माझ्या वॉर्डात विस माणसं कामाला असतांना चाळीस माणसांची हजेरी भरली गेलेली आहे , तिस माणसांची हजेरी भरली गेलेली आहे आणि प्रत्येक वेळेला निदर्शनास आणले आहे. फक्त मी याच्यामुळे चुप बसलो का आपल्या कुठल्याही एस.आय वर हे नको यायला. ते करप्ट होताय. त्यांच्यामध्ये असे ही आहे भरून घे हजेरी मी तसे त्यांनाही वेळोवेळी निदर्शनास आणुन दिलेले आहे साहेब.

**मा.आयुक्त :-** जेव्हा जेव्हा

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब कामच नाही होत आहे ना अंकुश कुठे राहीलाये साहेब

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** तेव्हा चौकशी करून आपण योग्य ती कार्यवाही केलेली आहे.

**मा.आयुक्त :-** आपण योग्य ती कार्यवाही करू.

**श्री.कुलभुषण पाटील :-** एस.आय वर कार्यवाही केली काय झाले हजर झाला

**मा.आयुक्त :-** नाही आपण ऐका ना आपल्याकडे जी तक्रार आलेली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने त्याची प्राथमिक चौकशी केली . त्याच्या आधारावर आपण सॅनिटर ईन्स्पेक्टर यांचेकडुन कामावर कर्मचारी उपस्थित असतांना कामगार जे होते ते दुसरीकडे वॉर्ड मध्ये त्यादिवशी जी तक्रार प्राप्त झालेली होती त्या दिवशी आपण चौकशी केली होती

**श्री.कुलभुषण पाटील :-** कोणीच नव्हते साहेब

**मा.आयुक्त :-** आपण त्या सॅनिटरी ईन्स्पेक्टरला निलंबितही केलेले आहे. निलंबित केल्यानंतर जो शासनाचा नियम आहे की तिन महिन्याच्या आंत त्याची चौकशी सुरू करावी आणि आता चौकशी सुरू झाल्यानंतर त्याला बसुन ७५ टक्के पगार देण्याऐवजी त्याला आपण कामावर घेतलेले आहे. त्यानुसार आपण त्याला कामावर घेतलेले आहे. त्याची विभागीय चौकशी चालु आहे. विभागीय चौकशी अंति तो दोषी आढळेल तर त्यांच्यावर कारवाई होईल. राहीला विषय जे कर्मचारी हजर नसतांना त्याची हजेरी काढली जात असेल. तर अशा वेळेला सॅनिटरी ईन्स्पेक्टर तो गरीब माणुस आहे असे म्हणुन आपल्याला काही दुर्लक्ष करता येणार नाही.सॅनिटरी ईन्स्पेक्टरची जी प्राथमिकता आहे. हि जी हजेरी काढलेली आहे ती उद्याही राहणार आहे. जेवढे कर्मचारी आपल्याकडे असतील. तेवढयांची हजेरी काढणं आणि त्या कर्मचाऱ्याकडुन पुर्ण काम करून घेण. जर तो गैरहजर असतांना त्याची जर हजेरी मांडली जात असेल.तर त्याला सॅनिटरी ईन्स्पेक्टर सर्वस्वी जबाबदार आहे असं आजही जर निदर्शनास आलं माझी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की आपल्या असे निदर्शनास आले. तर त्या सॅनिटरी ईन्स्पेक्टर च्या बाबतीमध्ये आपल्याला कडक धोरण स्विकारव लागत असेल तर एक तुमच्या बाबतीमध्ये आणि मला वाटत आपल्या वॉर्ड मध्ये दुसरा असे लक्ष्यामध्ये आले होते प्रशांतभाऊ आणि सुनिलभाऊ महाजन यांच्या वॉर्डात तिथेही असच तिथे लक्षात आले आपल्या की जवळपास आठ कर्मचारी हे हजेरी वर दिसताहेत पण कामावर नव्हते. त्यावेळी त्याही सॅनिटरी ईन्स्पेक्टर ला आपण निलंबित केलेले आहे.अजुनही माझ्या माहिती प्रमाणे त्याला कामावर घेण्यात आलेले नाहीये.आपण एखाद्या लेबर कॉन्ट्रॅक्टर कडुन लेबर घेतल्यानंतर त्या लेबरच्या हजेरी आणि त्याच्याकडुन काम करून घेणे हि जबाबदारी आपल्या आरोग्य विभागची आहे.जर लेबर काम करत असेल तर आपण त्याची हजेरी मांडली पाहीजे.कामावर आलाच नसेल गैरहजेरी मांडली पाहीजे. ४०० लेबर आपल्या हजेरीच्या प्रमाणे पुरवण्याच काम कॉन्ट्रॅक्टरच आहे. ते ४०० लोक आहेत की नाही . हे तपासुन घेणे. आणि त्याच्यानंतर त्याच्याकडुन पुर्ण ६ तासांत काम पुर्ण करून घेणे.हि जबाबदारी आरोग्य विभागची आहे.

त्यावेळेला आरोग्य विभाग हि जबाबदारी पार पाडत नसेल. तर त्या संबंधित लोकांवर सुध्दा आपल्याला कार्यवाही करावी लागेल. ती जी काही निलंबित केलेले आहेत.ती मुकादमवर सुध्दा आपण कार्यवाही केलेली आहे.एस.के.कॉन्ट्रॅक्टर वर असेल वॉटरग्रेस वर असेल किंवा तिसरा कुणीही असेल. प्रत्येक बाबती मध्ये लेबर सप्लाय करण्याची जबाबदारी कॉन्ट्रॅक्टरची आहे. लेबरची हजेरी आणि काम करून घेण्याची जबाबदारी आपल्या एस.आय यांची आहे. ते आपल्याला त्याच्याकडुन करून घ्यावे लागेल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता मला सांगाकी मधल्या काळात माझ्या माहितीनुसार एस.के.कॉन्ट्रॅक्टरच काम करत होता.

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हा भाग झाला आपल्या महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे. साहेब ठेकेदारावर काय कारवाई केली.

**मा.आयुक्त :-** ठेकेदार हा आपल्याला कामगार पुरवत होता.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब ठेकेदार म्हणजे २०-२० , ४०-४० मजुरांचे हजेरी भरून घेतली जाताहेत. ४० मजुर कामावर येत नाहीये. २० मजुरांची हजेरी भरली जातेय कारवाई करण्यात येत नाहीये. कुठे घंटागाडी येत नाही. सोहब मग हे सर्व असतांना आपण म्हणजे एस.के.कॉन्ट्रॅक्टर वर काही कारवाई केली का आपण दंडाची काही कारवाई केली आहे का आपण काही किंवा याच्याबाबतीमध्ये कॉन्ट्रॅक्टर ला काही पत्रव्यवहार केले आहे का? की तुमच या प्रमाणे की या नियमाप्रमाणे तुम्ही ठेका घेतलेला होता. हे जे टर्मस ॲन्ड कंडीशन तुम्ही फॉलो करत नाहीयेत म्हणुन तुम्हाला हे पत्र देण्यात येत आहे. त्याबद्दल आपल्यावर कारवाई काय केली आपण

**श्री.प्रशांत नाईक :-** आरोग्याधिकारी कोण आहेत नगरसेवकांच्या तक्रारी आहेत का आपल्याकडे लेखी असे काही घडले आहे का, पत्र व्यवहार आहे का बिल तर होवुन गेलेले आहेत आता तर

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** त्याने ते कामगार पुरवले होते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही नाही साहेब माझ म्हणणं काय आहे.आपण त्याच्यावर काही कार्यवाही केली का व त्याच्यावर कामगार पुर्ण पुरवणे हे बंधनकारक होते किंवा नाही.

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** आपण ज्यावेळी त्याला वर्कऑर्डर दिली. त्वरीत त्याने कामगार पुरवावे .

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब त्याच्या बद्दल असे काही आहे का त्याला आपण ते काम दिलेले आहे आणि त्याने ते पुर्ण केलेले आहे.

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** नाही आपण फक्त त्याला कामगार पुरवण्याचे

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब हेच मला म्हणायचे आहे की त्याला काहीच नियमावली लावुन दिलेली नाही. तुम्ही एस.के.कॉन्ट्रॅक्टरला कुठलीच नियमावली लावलेली नाही. हजर इतकेच पाहीजे नाहीतर तुम्हाला दंड करण्यात येईल. रोज इतके पुरवावे किंवा तुमचे डिपॉझिट मधुन पैसे कापले जातील किंवा जप्त करण्यात येईल. अशा कुठल्याच तरतूदी केलेल्या नाहीत. अश्या पध्दतीने आपण कुठल्याच हे त्याच्यावर लावुन दिलेल्या नाहीयेत.

**मा.आयुक्त :-** त्याने आपल्याला कामगार पुरवण्याचा हा ठेका होता.

**श्री.कुलभुषण पाटील :-** परत तिथेच आले साहेब तुम्ही

**मा.आयुक्त :-** ऐका ना ऐकुन घ्या पहिल्यांदा

**श्री.कुलभुषण पाटील :-** ठिक आहे.

**मा.आयुक्त :-** जेवढे लेबर पुरवले होते. त्यांच्या हजेऱ्या आपणच केल्या आहेत.त्यामुळे त्याने लेबर न पुरवण्याचा हा आक्षेप आपण कॉन्ट्रॅक्टर वर घेणार नाही . आपल्या हजेरी घेणाऱ्यांवर घेता येईल. जर कर्मचारी कमी असतील तर हजर कर्मचारी यांची हजेरी लावायला पाहीजे. जर कमी असतील तर आपण त्याच्यावर कारवाई करू शकत नाही. आता दुसरी गोष्ट कामगार कमी पुरवण बाबतची जी समस्या आहे. तर त्या बांधकाम खात्यामार्फत कामगार पुरवायच्या ज्या काही अटी शर्ती आहेत.त्याच अटी शर्तींवर तो काम करतोय. त्या अटी शर्तींमध्ये तो जर कमी पडत असेल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** गोराणेसाहेब या सगळयाची नोंद घेण्यात यावी.

**मा.आयुक्त :-** घ्या ना हे सगळ पेपरवर येणार आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हो

**मा.आयुक्त :-** बांधकाम खात्याच्या कराराप्रमाणे ज्या काही अटी शर्ती त्याला लागू आहेत.त्या अटी शर्ती लिखीत स्वरूपात आहेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** म्हणजे ज्या अटी शर्ती बांधकाम विभागाच्या आहेत. त्या अटी शर्ती त्याला हे काम

**मा.आयुक्त :-** बांधकाम खात्याच्या

**श्री.कुलभुषण पाटील :-** त्याच धर्तीवर आपण म्हणजे त्या

**मा.आयुक्त :-** त्या धर्तीवर व त्याच कॉन्ट्रॅक्ट च्या आधारे हे काम आपण त्याला दिलेले आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** त्याच धर्तीवर कसे दिले.

**मा.आयुक्त :-** त्यामुळे त्या कराराप्रमाणे जे काही त्याच्यावर बंधन आहेत.ते सुध्दा हे आरोग्य खात्याच काम करतांना त्याच्यावर बंधनकारक आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** केले आहे का आपण तसे काही कामं

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** बांधकाम खात्याने जो करारनामा केला होता त्याप्रमाणे. .

**श्री.कुलभुषण पाटील :-** मी ते नाही म्हणत आहे.तो आपला कर्मचारी घेण्याचे बंधन दिले का ?

**पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** बांधकाम खात्याने जो करारनामा केला होता त्याच्यात कामगार पुरवले नाही म्हणुन दंडाची तरतूद नाहीये त्याच्यात

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब मग असं समजा की ४०० कर्मचारी आलेच नाहीये कामाला

**पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** त्याच्यावर ते बंधनकारक नव्हतं

**श्री.कुलभुषण पाटील :-** म्हणजे लोकांनी पाहायचं

**मा.आयुक्त :-** दोन गोष्टी लक्षात घ्या.याच्यामध्ये कसे आहे बर का

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही नाही साहेब

**मा.आयुक्त :-** ३१ जुलैला संपणार आहे ना.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब ३१ जुलैला जरी संपणार आहे बरोबर आहे आपण तरी आपण त्याला काम देणार नाही का. तर मग आता तुम्ही यांना विचारून घ्या की किती माणसं कामाला येताहेत, महिन्याभरापासुन किती माणसं कामाला येताहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आताचा विषय काय आहे माहिती आहे का आणि हा विषय वेगळा आहे. आताचा विषय बोला ना.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मला म्हणायचं काय माहिती आहे का की त्यांना कामं देतांना कुठलीच नियमावली लावुन दिलेली नाहीये. ठिक आहे त्याने जर बदमाशीने काम केलं. तुम्ही करोडो रूपये देयक अदा केली त्याला देताहेत की नाही.

**सौ.ज्योती चव्हाण:-** आताचा विषय घ्या भाऊ

**आयुक्त :-** किती देयक दिली ती देयक कशाची आहेत.जेवढे कर्मचारी पुरवले त्याची आहेत.त्याला काही हरकत नाही दराप्रमाणे याच्यामध्ये काय आहे माहित आहे का ज्याप्रमाणे आपण म्हणताहेत की करोडो रूपयांची देयकं ४०० कामगार घेतल्यानंतर ते ४०० कामगार पुर्ण येणार असे नाहीये. आणि आपण काही लाखो रूपये त्याला देणार नाहीत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मी काय म्हणत होतो साहेब माझ्या वॉर्डात काल १० कामगार हजर असतील तर तिथे १५ ते २० लोकांच्या हजेऱ्या लावल्या गेल्या आहे.

**आयुक्त :-** आजही तुम्ही निदर्शनास आणुन द्याना मग

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हणतोय त्यावेळेला तुम्ही निदर्शनास आणुन द्यायला पाहीजे होते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ आजची हजेरी आहे याच्यामध्ये १० लोकं असे आहेत की ते अस्तित्वातच नाहीये. हा चार्ट आहे माझ्याकडे

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे मयत आहे.

**आयुक्त :-** आपण सांगा मग त्याची चौकशी करून आपण कारवाई करू.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता फायदा काय त्याचा

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही नाही

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता फायदा काय त्याचा

**आयुक्त :-** आपण महानगरपालिकेचं आर्थिक नुकसान केलेले नाहीये.

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापालिकेचं नुकसान साहेब ईतकं होतय की एस.के.कॉन्ट्रॅक्टरला काम दिल्यापासुन हे सर्व सुरू झालेले आहे. तो विषय जाऊ द्या साहेब

**आयुक्त :-** मला कळल नाही की ते

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही ना मला सांगा आपण कॉन्ट्रॅक्टर वर काही कारवाई करायच काही बंधनकारक नव्हतं का साहेब

**आयुक्त :-** मी पुन्हा बांधकाम खात्याच्या, आरोग्य खात्याच्या

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही त्यावेळेला आरोग्याला बांधकाम विभागाच्या याच्याने काम दिलेले होते.

**आयुक्त :-** मी पुन्हा आपणांस सांगतोय की आपण बांधकाम विभागाच्या अटी शर्तीनुसार त्याला काम दिलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते काम दिले नसते तर ते वेगळे वेगळे विषय राहीले असते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब आपण म्हणताहेत मला एकच उत्तर हव की आपल्या की बांधकामच्या ज्या अटी शर्ती होत्या का त्याच आपण ईकडे फॉलो केल्या आहेत का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर

**श्री.कुलभुषण पाटील :-** अस आहे तश्या काही दुसऱ्या काही निविदा त्याला आपण आरोग्य खात्याकरीता दिलेल्या होत्या.

**आयुक्त :-** बरोबर आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता तुम्ही माहितीस्तव दिलेल्या आहेत. तर त्या ७३ (ड) नुसार आपल्या आपण सांगीतल्या प्रमाणे साहेब आता मला सांगा हे जे आहे संविदा या मंजुर करा नामंजुर करा हे तुम्ही पाहा. पण या संविदाच्या बाबतीत आमची तटस्थ भुमिका आहे सर्व सदस्यांची आम्हाला उद्या उठुन याच्याने लेखापरिक्षणामध्ये काही गरबड झाली. उद्या उठुन होणाऱ्या कार्यवाहीस सर्वस्वी जबाबदार प्रशासन राहील. आमचा सदस्य म्हणुन या विषयाशी काहीही घेणं देणं नाही.

**आयुक्त :-** मी या विषयी आपल्या लक्षात आणुन देवु ईच्छितो की एखादा विषय समोर आल्यानंतर आपण त्याच्यावर आपण काय निर्णय घ्यायचा हा अधिकार सन्मा. सभागृहाचा आहे. त्यामध्ये कुणाचा काही आक्षेप घेण्याचं काही कारण नाहीये. पण विषय एवढाच आहे की या विषयाला आपल्या ज्या शंका आहेत.याच्यावर झालेली चर्चा आणि याच्यावर खुलासा होणं गरजेचं आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.

**आयुक्त :-** आणि खुलाश्याअंती आपल्याला जो निर्णय घ्यायचा आहे तो आपल्याला घ्यायचा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती साहेब , सभापती साहेब

**मा.सभापती :-** संविदांचा विषय काय आहे मान्य आहे का?

**श्री.नवनाथ दारकंडु :-** संविदे मधील विषय १ , २ ,३ ४ मान्य नाहीत बाकी विषय मान्य आहेत.

**नगरसचिव :-** माईक द्या त्यांना

**श्री.नवनाथ दारकंडु :-** ते झालेले आहेत नाही साहेब.

**नगरसचिव :-** काय

**श्री.नवनाथ दारकंडु :-** कुलभुषण भाऊंनी जे आता सांगीतलेले आहे आता की हे सगळे रेकॉर्डवर घ्या.ते विषय सोडुन मंजुर करावे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** मी जे पत्र दिलेले आहे ते पण

**नगरसचिव :-** आपण जे म्हंटले की १ , २ ,३ ४ या संविदा वगळुन इतर संविदांची माहिती घेतली . असे तुम्ही बोलले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता मला संगा साहेब की सन्मा सदस्यांनी या संविदांची माहिती घेतली . या संविदांवर चर्चा करून माहिती घेतली

**नगरसचिव :-** बरोबर आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता यांनी याच्याबाबतीतील निर्णया संदर्भातील ती काही भुमिका घेतली असेल.की आम्ही या संविदाची माहिती नाही घेतली. तर त्याचे कायदेशीर परिणाम काय आहेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही माहिती घेतली असे नाही म्हंटले भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही नाही

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ ऐका ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना म्हणजेच मुळात काय झाले की या संविदाला आपण विरोध नोंदवला आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** विरोध नाहीये भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** तटस्थ भुमिका तुम्ही घेत आहात ना.

**श्री.कुलभुषण पाटील :-** तटस्थ भुमिका कोणत्या बाबतीत घेवु की हे परस्पर मंजुर झाले आणि परस्पर मंजुर झाल्यानंतर १५ दिवसांच्या आंत हे स्थायी समिती समोर येणे गरजेचे असतांना तसे झाले नाही. त्याच गोष्टी सांगीतल्या भाऊ मी आता आमचा याला विरोध आहे किंवा आम्ही मंजुर केल्या संविदा असे किंवा काय झाले

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना माझ म्हणण काय आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** या संविदा मंजुरीला आल्याच नाहीये

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना कुलभुषण भाऊ आपण जी काही चर्चा केली त्या चर्चेच फलीत काय आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** चर्चेच फलीत काय आहे सांगीतले ना मी आता साहेबांना की आम्ही

**श्री.नितीन लढ्ढा :-** चर्चेच फलीत काय निघाले तर

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही नाही मी काय म्हणतोय भाऊ ऐका ना या ज्या संविदा केल्या आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** की आता इतकी मोठी चर्चा झाली आणि निष्पन्न काय झाले?

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही निष्पन्न झाले ना भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे त्यांनाही माहिती पडेल की एतकी मोठी चर्चा झाली आणि निष्पन्न काय झालं

**श्री.कुलभुषण पाटील :-** आम्हाला जाणुन घ्यायचं होत ना हे या मध्ये मला ती नियमावली जाणुन घ्यायची होती, त्याला कोणत्या बेस वर काम दिलं. या संविदा कोणत्या अधिकारात दिल्या गेल्यात.कश्या दिल्या गेल्या.कोणत्या पध्दतीने दिल्या गेल्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना मान्य आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ मी मी नविन होतो स्थायी समितीमध्ये मला ते जाणुन घ्यायचे होते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही वस्तुस्थिती आहे , हे जाणुन घेण हा आपला अधिकार आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ ऐका ना दुसरा विषय असा आहे, की याच्यामध्ये संविदाच्या बाबतीत, भुमिका तटस्थ आहे किंवा ते मी नामंजुर करतोय किंवा मंजुर करतोय मुळात हा विषय आपल्याकडे मंजुरीसाठी आलेला नाहीये. फक्त माहितीसाठी आले आहे तर आम्ही फक्त चर्चा केली आहे.चर्चा करायची होती मला माहीती घ्यायची होती मला बाकी तर साहेब मी तर काही म्हंटले नाही की मंजुर करा किंवा नामंजुर करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** किंवा तुम्ही त्याचे बिलं द्या हा विषय

**आयुक्त :-** आता नितीनभाऊ म्हणाले की आपल्या सर्वांनी केलेल्या चर्चे अंती निष्कर्ष काय असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही साहेब याच्यामध्ये निष्कर्ष हा निघाला भाऊ की आम्हाला माहिती झालं की कोणत्या धर्तीवर त्याला काम दिले गेलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** लक्षात घ्या. जसे आम्हाला वाटलं की त्याला काहीतरी वेगळे निकष लावुन दिलेले असेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर म्हणजे

**श्री.कुलभुषण पाटील :-** म्हणजे आमदार निधीत , खासदार निधीत काम दिले गेले आहे का

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता हे समाधानकारक आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** ओके

**श्री.कुलभुषण पाटील :-** आम्ही फक्त आम्हाला काही शंका होत्या

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही कुलभुषण भाऊ

**आयुक्त :-** आता शंका होती

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा चांगला पायंडा आहे. प्रत्येक गोष्टींवर चर्चा होणे हे आपल्याला अपेक्षित असतं आणि त्याच्यानंतर जर कधी आपल्याला शंका असतील तर प्रशासनाच्या निदर्शनास आणुन देण हा सुध्दा आपल्या कर्तव्याचा भाग आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मा.सभापती

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ आम्ही नविन आहेत म्हणुन आम्हाला बऱ्याच गोष्टी समजुन घेणे

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.शिकायलाच पाहीजे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ तुमच्यामुळेच काही तरी शिकायला मिळेल आम्हाला

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.शिकायलाच पाहीजे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ कुठेतरी गोष्टींची चर्चा झाली पाहीजे. भाऊ समजणारच नाहीतर तर त्याच्यामध्ये आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे . योग्य आहे एकदम योग्य आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आम्हाला हेच जाणुन घ्यायचे होते की कोणत्या पध्दतीने हे काम झालेले आहे.

**आयुक्त :-** नितीनभाऊ आता आपली जी हि चर्चा झाली ही अतिशय चांगली झाली. चर्चेमध्ये आपण आपले मुद्दे मांडले पाहीजेत.समोरच्या माणसाचे मुद्दे समजुन घेतले पाहीजे या दोन्ही भुमिका प्रशासनाची आणि आपली आहे. आणि दोन ज्या वेगळया वेगळया सभा होतात स्थायी समिती असेल किंवा महासभेमध्ये काही मुद्दे असतील किंवा इतर समित्यांच्या हे महानगरपालिकेला याला आपण कमिटी झोन म्हणतो. म्हणजे जे आपल्याला जे वैयक्तीक अधिकार आहेत तेच कमिटीला आहेत.आणि कमिटी जी असते किंवा कुठलाही निर्णय चर्चेअंती आला पाहीजे .अशा चर्चेच्यामध्ये काही गोष्टी आपल्याला माहिती असतील किंवा नाही हा वेगळा विषय आहे परंतू चर्चा जी झ ाली हि चर्चा झालीच पाहीजे अनुषंगाने जसे आपण आता म्हणालात की मी पहिल्यांदा मिटींग मध्ये आलोय आणि मी तर म्हणेल की प्रत्येक विषयाच्या संदर्भामध्ये सन्मा.सदस्यांच्या कुठल्याही शंका असतील त्या त्यांनी आपण याठिकाणी मांडल्या पाहीजे. शंका आहेत त्या वेगळया व निरसण करणे हा वेगळा विषय आहे. तर शंका येथे मांडल्या पाहीजेत त्याला प्रशासन त्याचा खुलासा करेल.पण खुलाश्यानंतर तर आपण त्या परिस्थितीमध्ये खुल्या मनानं खुलाश्याचा आपण विचारही केला पाहीजे. आणि आपण तो स्विकारलाही पाहीजे.

**सौ.ज्योति चव्हाण :-** ही आमची भुमिका आहे.

**मा.आयुक्त :-** आता हा उशीर झाला. आता मी याच्यापुढे

**सौ.ज्योति चव्हाण :-** याच्यामध्ये हे स्पष्ट झाले आहे की ,

**मा.आयुक्त :-** आता मी दोन गोष्टी तुम्हाला प्रशासन म्हणुन सांगेल की प्रशासनाचा नियम असा असतो की त्याच्यामध्ये तुम्ही ही आहात आणि की ज्याला अधिकार आहेत.त्याच्यावर जबाबदारी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** बरोबर आहे.

**मा.आयुक्त :-** मात्र मी माझ्या अधिकाराचा वापर करेल, पण सभापती ज्या वेळेला आहेत अस होवुच शकत नाही.जर अधिकार आहेत तर जबाबदारी माझ्यावर आहे.तुम्हाला जर अधिकार आहेत तर जबाबदारी तुमच्यावर आहे.आता बऱ्याच वेळा आपण प्रकरण पाहतोय की आपण स्थायी समिती मध्ये मान्यता देतो आणि खाली असे वाक्य टाकतो की याच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.जर नियमाप्रमाणे कार्यवाही झालेली नसेल तर आपण मान्यता देणं चुकीचं आहे.नियमाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही हे ही आपण पाहणं गरजेचे आहे. आणि आपल समाधान झालं पाहीजे की कार्यवाही नियमाप्रमाणे झाली आहे. तर आपण स्थायी समितीने याला मान्यता दिली पाहीजे.आणि आपल्या ज्या काही शंका असतील त्या शंकाचं निरसण होईपर्यंत मान्यता न देण हे अभिप्रेत आहे.मान्यता देतांना आपण प्रोव्हिजनल टाकायच आणि कंडीशन नुसार सॅक्शंन आणि जरी आपण असे वाक्य टाकत असले तरी आपल्याला वाटत असले तरी अधिकार हे स्थायी समितीला असेल आणि दुर्देवाने जरी असा चुकीचा निर्णय घेतला गेला. असं होणार नाही कारण आपण कुठलाही चुकीचा निर्णय घेणार नाहीत.परंतू आपण जर चुकीचा निर्णय घेतला तर आपण चार जरीही वाक्य टाकली तर शेवटी जबाबदारी कोणाची की ज्याला अधिकार आहेत त्याची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** बरोबर आहे.

**मा.सभापती:-** आपल्या या संविदा या माहितीस्तव होत्या मंजुरीस्तव नव्हत्या आणि या विषयावर आपण जवळजवळ सर्व सन्मा.सदस्य आणि प्रशासन आपण चर्चा केली व याच्यावर सर्वांनी माहिती घेतली. आता या संविदांची आपण माहिती घेतली म्हणायला हरकत नाही.

**सौ.ज्योति चव्हाण :-** हो मग

**श्री.नितीन लढ्ढा:-** हो माहिती घेतली ना मग

**मा.सभापती:-** आपल्या सर्वांनी माहिती घेतलीच आहे आणि भविष्यात या संविदांच्या संदर्भात कुठलाही लेखापरिक्षणामध्ये आक्षेप आल्यास

**श्री.कुलभुषण पाटील :-** आमचे तेच म्हणणे आहे ना आमच्यापर्यंत काही यायला नको म्हणुनच मी चर्चा केली. हे पाहा भाऊ आम्हाला याच्यातील काही माहिती नाही. आम्ही शेंगा खाल्या नाहीत . शेंगा खाल्या असत्या तर काही हे नव्हते

**मा.सभापती:-** याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहील.

**श्री.प्रशांत नाईक:-** त्यांनी स्विकारलीच आहे ना प्रशासनाने त्यांनी घेतलीच आहे ना त्यांनी सांगुनच दिलेले आहे.

**मा.आयुक्त:-** शेंगा कोणी खाल्ल्या हे कुणालाच माहिती नाही.

**मा.आयुक्त:-** एकच मिनिंट आता सर्व सदस्यांच्या बैठकीचा मुद्दा होता अशी बैठक झालेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** हो मी

**मा.आयुक्त:-** अशी बैठक झालेली आहे. आपण नितीनभाऊंना किंवा पदाधिकाऱ्यांना विचारू शकता.

**श्री.नितीन लढ्ढा:-** हो मी होतो रियाज बागवान होते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही भाऊ रियाज भाऊंनीच सांगीतले होते की अशी कोणतीच बैठक झालेली नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा:-** कुलभुषण भाऊ मी स्वत: होतो, महापौरताई होत्या, भगतभाई होते

**मा.आयुक्त:-** त्या बैठकीस तत्कालीन .स्थायी समिती सभापती होत्या, आपले विधि सल्लागार होते

**श्री.नितीन लढ्ढा:-** वाहुळे साहेब होते सगळेच होते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** तत्कालीन सभापतींनी हेच सांगीतले की आपल्याला चर्चेला बोलवले होते. परंतू ज्या

**श्री.नितीन लढ्ढा:-** नाही नाही कुलभुषण भाऊ जवळपास एक तास चर्चा झाली त्या मिटींग मध्ये

**मा.आयुक्त:-** भाऊ ही जी चर्चा झालेली आहे आणि याची तत्कालीन त्यावेळेच्या जर वृत्तपत्रामधील जर बातम्या बघितल्या तर त्यामध्ये सुध्दा आले आहे की अश्या प्रकारची बैठक झाली. बैठक झाली नसतांना बैठक त्याच येण्याचे काही कारण नाही.

**श्री.नितीन लढ्ढा:-** हो झाली होती ना

**मा.आयुक्त:-** ही बैठक झाली त्यावेळी खरच माझा काही रोल नव्हता. आणि आपण जेव्हा हे दिली होती ते ही होतं.

**सौ.ज्योति चव्हाण :-** चालेल ना

**श्री.नितीन बरडे:-** महाबळ फायर स्टेशन चे काय आहे साहेब.

**श्री.शशिकांत बारी , अग्निशमन अधिकारी :-** सन्मा.सभागृह, साहेब आपल्याकडे फायरमन नाहीत. त्यामुळे

**श्री.नितीन बरडे:-** ड्रायव्हर किती रिकामे आहेत आता

**मा.आयुक्त:-** ड्रायव्हरच असे आहे कि

**श्री.शशिकांत बारी , अग्निशमन अधिकारी :-** सर आपल्याकडे फायरमन नाहीहेत

**मा.आयुक्त:-** ड्रायव्हर आहेत परंतू आपल्याकडे फायरमन नाहीत ,म्हणजेच फायरमन जे लागतात आपल्याकडे आग विझविण्यासाठी

**श्री.नितीन बरडे:-** आता किती आहेत तुमच्याकडे

**श्री.शशिकांत बारी , अग्निशमन अधिकारी :-** ड्रायव्हर का भाऊ

**श्री.नितीन बरडे:-** फायरमन किती आहेत

**श्री.शशिकांत बारी , अग्निशमन अधिकारी :-** फायरमन आपल्याकडे एकच आहे भाऊ, एक फायरमन आणि

**श्री.नितीन बरडे:-** फक्त एकच फायरमन आहे.

**मा.आयुक्त:-** तुमच्याकडे ड्रायव्हर, फायरमन असे एकूण किती कर्मचारी आहेत ते सांगा.

**श्री.शशिकांत बारी , अग्निशमन अधिकारी :-** भाऊ एक फायरमन,१० सहा.फायरमन आणि १९ शिपाई व मजुर कुली, वॉचमन असे आहेत. त्यात दोन महिला कर्मचारी आहेत.त्यामुळे त्यांना

**मा.आयुक्त:-** आता आपल्याला त्याच्यासाठी काय करता येईल हे बघुया. एक आपले जे एम.आय.डी.सी.चे फायरस्टेशन आहे. आपल्या एका बैठकीमध्ये झालेल्या सुचनेप्रमाणे आपण वर्ग करणार आहोत. कारण आपण त्यांची व्यवस्था होईपर्यंत वाहन चालकांची व्यवस्था ते कधी करत असतील तर आपण आपलं वाहन एम.आय.डी.सी. ला द्यायला काही हरकत नाही.

**श्री.नितीन बरडे:-** साहेब फक्त.

**मा.आयुक्त:-** एक आपल्याकडे मेन जे स्टेशन आहे म्हणजे एक जे येथे आहे आणि एक शिवाजी नगर या दोन ठिकाणी आपल्याला देणं गरजेच आहे. आता आपली जी सुचना आहे की जे आपलं महाबळच स्टेशन आहे तर कर्मचारी कमतरता असल्यामुळे आपले काही इतर खात्यातुन देणं तर आपण ते करू.

**श्री.नितीन बरडे:-** साहेब आपले कर्मचारी एम.आय.डी.सी. ला देणार आहेत का?

**मा.आयुक्त:-** नाही एम.आय.डी.सी. ला आपण देणार नाहीयेत. एम.आय.डी.सी. ने आपल्याला त्या फायरस्टेशनची मागणी केलेली आहे. त्यामुळे त्याप्रमाणे आपण त्यांना कळविले आहे.त्या ठिकाणी आपला जो डिझलं पंप आहे तो आपल्याला कंन्टिन्यु ठेवण्याचे अप्रुवल आहे. परंतू त्यांच म्हणणं असे आहे की त्याच्यामध्ये की आता आमच्याकडे वाहनं ही नाहीये आणि लेबरही नाहीये. तर त्याची व्यवस्था आम्ही करू आणि जर त्यांच्याकडुन जर लेबरची व्यवस्था होत असेल तर तोपर्यंत आपण आपले वाहनं देवु त्यांना असे आपण एम.आय.डि .सी करीता प्रयत्न करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** साहेब आता कमर्चारी कमतरता जवळपास सगळयाच विभागांमध्ये आहे. कि प्रत्येक ठिकाणी कुठे अधिकाऱ्यांची कमतरता आहे कुठे कर्मचाऱ्यांची कमतरता आहे.आणि याच अनुषंगाने कालच्या वृत्तपत्रामध्ये एक बातमी होती. लोकमतला की सात वर्षापासुन अनुकंपाधारक नियुक्तीच्या प्रतीक्षेत आणि मनपाकडुन आंदोलनाचा इशारा. आता याच्यातील स्टेटमेंट अत्यंत गंभीर स्टेटमेंट आहे. की अनुकंपाधारकांसाठी मनपाकडे अनेकवेळा प्रस्ताव सादर केलला आहे. महासभेमध्ये या विषयी अनेकवेळा प्रस्ताव मांडुन लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. आयुक्तांकडे देखील अनुकंपाधारकांनी समस्या अनेकवेळा मांडल्या. मात्र ढिम्म प्रशासन जर ऐकत नसेल.

तर प्रशासना विरोधात न्यायालयात जाण्याची भुमिका ते घेणार आहेत.प्रशासनाने अनुकंपाधारकांचा गांर्भीयाने विचार करावा कैलास सोनवणे, नगरसेवक यांचे हे स्टेटमेंट आहे.आता व्यथा म्हणुन दोघंही घटना दुख: देणाऱ्या आहेत मनाला एक तर जे अनुकंपाधारक आहेत.ज्यांच्यासाठी महानगरपालिकेमध्ये अनुकंपाधारकांसाठी जागा रिक्त आहेत.म्हणजे एकीकडे जागा रिक्त आहेत. दुसरीकडे अनुकंपाधारक त्रस्त आहेत आणि गेल्या सात वर्षापासुन, गेल्या सात वर्षापासुनची त्यातील मी माहितीही घेतली की खरोखरच की २०१३ मध्ये जे अनुकंपाधारक होते. त्यांना २०१६ मध्ये १६ लोकांना नियुक्त्या दिलेल्या आहेत. आणि त्याच्यानंतर आजपर्यंत कुठल्याही अनुकंपाधारकाला नोकरी देण्यात आलेली नाहीये.म्हणजे जागा रिक्त आहे. वेटींग लिस्ट जी आहे ती स्टँडींग आहे आणि तरी सुध्दा त्यांना न्याय मिळत नाही. दुसरी मनाला वेदना देणारी एक गोष्ट आहे की कैलासआप्पां सारखे ज्येष्ठ सदस्य आहे. या सभागृहातील सदस्य आहेत. परंतू ते या शहराच्या प्रथम नागरीक भारतीताई सोनवणे यांचे पती सुध्दा आहेत.त्यांना जर कधी प्रशासनाच्या बाबतीतील ही अश्या प्रकारची जर भुमिका स्विकारावी करावी लागत असेल.तर निश्चित पणे हि गंभीर बाब आहे. का म्हणुन यांना न्याय मिळत नाहीये.आज मला सांगा कि ज्या कर्मचाऱ्याने या महानगरपालिकेत कोणी १५ वर्ष सेवा केली असेल , कोणी २५ वर्ष सेवा केली असेल, कोणी ३० वर्ष सेवा केली असेल आणि तो कर्मचारी मयत झाल्यानंतर कायद्याने मिळणारा न्याय त्यांना द्यायचा आहे.कोणी त्यांच्यावर मेहरबानी करत नाहीये आणि अशा परिस्थितीमध्ये सात वर्ष आणि या सात वर्षामध्ये मोठी व्यथा ही आहे कि काही मंडळी याच्यामधुन ऐजबार होवुन जातात. एक महिला सदस्य आहे. महिला कर्मचारी आहे अर्चना तायडे म्हणुन ती दोन महिन्यांनंतर ऐजबार होईल. मला सांगा दलित कुटुंबातील महिला आहे.जर कधी दोन महिन्यानंतर तिला न्याय नाही मिळाला. तर तिला न्याय कोण देणार. तिची कायमची संधी हिरावली जाईल साहेब आणि अशा पध्दतीने आपण म्हणजे जे जवळपास महापौरांपासुन, उपमहापौरांपासुन, स्थायी समिती सभापतींपासुन, आमदार महोदयांपासुन सगळयांना भेटले. परंतू इतक्या सगळया प्रभावी पदाधिकाऱ्यांना भेटल्यानंतरही या सामान्य नागरीकांना जर कधी न्याय मिळत नसेल. तर गंभीर बाब आहे.का म्हणुन अशा पध्दतीने प्रशासन असे का वागतंय.

**श्री.किरण देशमुख, उपायुक्त (सा.प्र):-** मा.सभापती महोदय, सन्मा.सभागृह सर आपल्याकडे दोन वर्षात आपल्याकडे ६० पदं आपण निश्चित केलेली आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर

**श्री.किरण देशमुख, उपायुक्त (सा.प्र):-** आता यातील सर्व पदांसह २०११ ला दोन पदं भरण्यात आलेली आहेत. आणि २०१५-१६ ला नियुक्त्या दिलेल्या आहेत.आता वेळोवेळीच्या शासन निर्णयानुसार काही टक्केवारी ज्या निश्चित केलेल्या होत्या. ५ टक्के,१० टक्के,२० टक्के त्याच्यानुसार आपण ६० पदं निश्चित केलेली आहेत. आता हि जी सर्व पदं जी आहेत.आपण त्यातील प्रत्येक प्रकरणाची छाननी करत आहोत. त्याच्यामध्ये सगळया वेगवेगळया बाबी आहेत. कोणाचं कोर्ट मॅटर आहे का? सिनियॅरीटी लिस्ट आपण जी करतोय. कोणाचा वारस दाखला आहे का? किंवा कुंटुबातील सदस्यांचं संमती पत्र असायला हवं त्यांचे एज्युकेशनल कॉलीफीकेशन नंतर ती पदं

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर

**श्री.किरण देशमुख, उपायुक्त (सा.प्र):-** या सगळया बारीक सारीक बाबी तपासुन करतोय. म्हणजे असे नाही की आपण म्हणजे या सगळया बाबी प्रोसेस मध्ये आहेत. कामं थांबलेले आहे अश्यातील काही भाग नाहीये.आणि हि प्रोसेस गेल्या दोन तिन महिन्यांपासुन रेग्युलर सुरू आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** माझ म्हणणं ते नाहीये साहेब, माझं म्हणण काय आहे.

**श्री.किरण देशमुख, उपायुक्त (सा.प्र):-** एस सर

**श्री.नितीन लढ्ढा :-** जसे आपण म्हंटले की दोन तिन महिन्यापासुन सुरू आहे.

**श्री.किरण देशमुख, उपायुक्त (सा.प्र):-** एस सर

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी ॲग्री आहे तुमच्या उद्देशाशी परंतू २०१३ पासुन अनुकंपाधारकांना नियुक्त्या दिलेल्या नाहीत.ही एक निरंतरीत एक प्रक्रीया आहे. ही प्रक्रीया दरवर्षी ज्या पध्दतीने रिक्त होत असतील. त्या पध्दतीने अनुकंपाची यादी ही तयार व्हायला पाहीजे.आज मला सांगा सात वर्ष सात वर्षामध्ये ऐज बार होणार आहे.सात वर्ष त्यांना संधी नाही मिळाली आणि आता त्यांची जी ॲप्रीसिऐंशी जी कमी होतेय. त्या ॲप्रीसिऐंशीचा फटका कोणाला बसणार शेवटी आपल्यालाच बसणार आहे तो तर या प्रक्रीया निरंतर का चालत नाहीत? कारण कुठे तरी या सर्व विषयांना कुठेतरी वेळेचं बंधन घातल्याशिवाय आज आपण या सभागृहात चर्चा केली आता आपण आश्वासन कराल की या सगळया प्रोसेस सुरू आहेत. ॲग्री आहे मी ,मी कुठेचं म्हणंत नाही की तुम्ही नियम डावलुन किंवा बेकायदेशीर रित्या कोणाला आदेश द्या. अशातील माझी भुमिका नाहीये.परंतू कुठे तरी याला वेळेचं बंधन तर असायला हवं ना. म्हणजे सातत्याने आठ पंधरा दिवसांनंतर काय होतं की हा विषय पुन्हा थंड बस्त्यात

जातो . मग पुन्हा प्रकरण , फाईल उपायुक्तांकडे प्रलंबित आहे, उपायुक्त म्हणतात की आयुक्तांकडे प्रलंबित आहे.आयुक्तांकडे गेल्यानंतर पुन्हा म्हणतात की त्याच्यात काही त्रुटी होती म्हणुन ती पुन्हा खाली पाठवली गेली. या सगळया प्रक्रीयेमध्ये मग कालांतराने तुमच्या काही अर्जन्सी ज्या डिपार्टमेंटली असतात. कालांतराने त्या गोष्टींकडे दुर्लक्ष होतं.अशामध्ये या सात वर्षांचा स्पेंड गेलेला आहे साहेब माझं एकच म्हणणं आहे की जे देशमुख सोहब म्हणताहेत मी त्या गोष्टीशी सहमत आहे. की हि प्रक्रीया आणि त्याच्यावर काम सुरू आहे. परंतू याला कुठेतरी वेळेचं बंधन घालुन द्यावं.आणि ती कमिटमेंट मा.आयुक्त महोदय आणि आपण या सभागृहासमोर करावी.जेणेकरून सोमवारी हि सर्व मंडळी जी अनुकंपाधारक आहे हि सोमवारी उपोषणाला बसण्याचा इशारा त्यांनी दिलेला आहे.कुटुंबांसमवेत उपोषणाला बसण्याचा इशारा त्यांनी दिलेला आहे.या गोष्टी टाळता येवु शकतात. परंतू त्या टाळण्यासाठी कुठेतरी त्यांना आश्वस्त करायचं असेल. तर कुठेतरी आपल्याला एक वेळचं बंधन घालुन घ्यावं लागेल. तुम्ही वेळ मागुन घ्या.आता कमिटमेंट करण्याच्या पुर्वी विचार करा की याचा निर्णय घेणं आठ दिवसांचा वेळ अपेक्षित आहे. किंवा याच्यासाठी १५ दिवसांचा वेळ देणं अपेक्षित आहे.परंतू ती गोष्ट आणि ती वेळ टळणार नाही. असा विचार करूनच आपण आश्वासन द्या.काय आहे सामान्य कुटुंबातील लोकं आहेत . चतुर्थ श्रेणी मध्ये काम करणारा माणुस यांचे वयाचे सात सात वर्ष कि ते दुसरीकडे कुठेही काम धंदे करू शकत नाहीत.ते दुसरीकडे नोकऱ्या करू शकत नाही. येवुन येवुन पदाधिकाऱ्यांच्या खेट्या मारून चपला घासुन जातात बिचाऱ्यांच्या त्यांच्याकडे पाहिल्यानंतर दया येते हो.

**श्री.कुलभुषण पाटील :-** याच्यामध्ये साहेब जास्त कालावधी गेल्यानंतर ते अजुन जास्त ऐज बार होतील ते साहेब

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी तेच म्हणतोय ना

**श्री.कुलभुषण पाटील :-** याच्यामध्ये साहेब मी सुध्दा सांगीतले साहेब की तुम्ही आस्थापना विभाग आपल्याकडे आहे. या सर्व संबंधित प्रकरणांची माहिती आपल्याकडे उपलब्ध आहे साहेब

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि याच्याबाबतीत तुम्हाला काय आहे.की तुम्हाला एक डेडलाईन निश्चित करून द्यायची आहे

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपलं आस्थापना विभागाकडे सगळी माहिती उपलब्ध असतांना आपले आस्थापना विभाग काय करतयं

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि सोहब जे काही असेल मी म्हणतो की कामाचा व्याप आपल्याकडे असेल. परंतू कुठेतरी आपल्याला ईन्स्टंट बसुन बऱ्याचश्या लोकांनी यापुर्वी कामं केलेले असतील. ते जरी दुसऱ्या विभागात काम करत असतील. ते एक टास्क फोर्स म्हणुन नेमा कि हे काम आपल्याला दहा दिवसांमध्ये कंम्पलीट करायचं आहे. दिवस रात्र करायचं आहे. तुम्ही सुट्टी घेवु नका.अशक्य या जगामध्ये काहीच नाहीये साहेब त्यातच करण्याची एक मानसिक हि तयारी अपेक्षित आहे. कि हो मला दहा दिवसांत हे काम करायचं आहे.एक तुम्ही आदेश काढा. मी म्हणतो आठव्या दिवशी त्याच्यातुन सगळे एक कंप्लायंस पुर्ण होवुन निकाल लागेल त्या विषयाचा

**सौ.ज्योति चव्हाण :-** त्याच्यामध्ये राज्य शासनाची जी काय असेल ती मान्यता घेवुन करावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही ताई कुठलीच गरज नाहीये त्याच्यासाठी शासनाच्या कुठल्याच नियमात त्याच्यासाठी अडचण नाहीये.

**सौ.ज्योति चव्हाण :-** त्यांना काहीतरी टाईम पिरीएड ठरवनु घ्यावा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** एक लिमिट त्याला लागू करून द्या साहेब आपण जर एक लिमिट लावुन दिली ना तर साहेब ते काम मार्गी लागुन जाईल साहेब.

**सौ.ज्योति चव्हाण :-** आता या अर्चना तायडे यांचे दोन महिन्यामध्ये त्यांचे ४५ वर्ष पुर्ण होणार आहेत.म्हणजे ती आज दोन महिन्यांनी ऐजबार होईल. तर आता त्यांच्या फाईलची परिस्थिती काय आहे. हे जे आहेत त्यांच्या घरची परिस्थिती हि हलाखीची आहे.त्याचा आपण काहीतरी विचार केला पाहीजे आणि लवकरात लवकर मार्गी लावावेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही वेळेच बंधन द्या साहेब आज

**सौ.ज्योति चव्हाण :-** आज आम्हाला आश्वासन द्या की किती दिवसांत होईल. की ईतक्या दिवसांत आम्ही काम करतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ताई या गोष्टींसाठी आश्वसनांची गरज नाहीये.परंतु त्या प्रकरणांसाठी आपण सात सात वर्ष लावतो . ठिक आहे आज त्याच्या मागच्यांनी काय केले असेल.मागच्यांनी काय केले असेल ते जावु द्या. आज आपल्याकडे त्यांना न्याय देण्याच्या संदर्भात संधी आहे आणि आपण ती देवु शकतो आणि जे काही द्यायचे आहे ते नियमाने मागताहेत ते असे काही नाही की आपण

**सौ.ज्योति चव्हाण :-** आपण याकरीता काहीतरी निर्णय घ्यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** असेही काही नाही की आपण त्यांच्यावर मेहरबानी करतोय

**सौ.ज्योति चव्हाण :-** सोमवार पासुन त्यांनी आपल्याला इशारा दिला आहे.

**मा.आयुक्त :-** याच्यामध्ये यापुर्वी एक पॉलीसी आहे त्याच्यामध्ये काही सुचनाही दिलेल्या आहेत. दोन गोष्टी याच्यामध्ये आहेत की आपण २०११ नंतर जी साधारण २०१५-१६ मध्ये ज्या नियुक्त्या झालेल्या आहेत. पण २०१५-१६ मध्ये ज्यावेळेला म्हणजे फक्त २०१५-१६ च्या ज्या जागा रिक्त झाल्या त्याच्यात जेवढया जागा होत्या तेवढ्या जागा भरल्या गेलेल्या आहेत.त्याच्या अगोदर ज्या रिक्त झालेल्या जागा आहेत.त्या पर्यायी आहेत.आता त्या का भरल्या गेल्या नाहीत. आता त्याची फाईल बघितल्याशिवाय काही कारणं देता येणार नाहीत. आता फक्त मुद्दा याच्यामध्ये एवढाच उपस्थित होतोय की त्याच्यामध्ये आम्हाला काळजीपुर्वक थोडं जाव लागेल कि शासनाने दरवर्षी किती जागा भरायच्या आहेत.त्याचे निर्बंध लावलेले आहेत.तसे आता हे म्हणाले की एका वर्षी ५ टक्के त्याच्या पुढच्या वर्षी १० टक्के वगैरे आता ही प्रक्रीया काही वर्षामध्ये बंद झालेली आहे.आता भरत असतांना त्यावेळच्या तारखांना बॅकलॉग आज भरतांना त्यामुळे आज त्याचे एकदाच त्या पदांच्या जागा भरत असतांना असाही एक तांत्रिक मुद्दा त्याच्यामध्ये आहे.की जर त्याच्याबाबतीमध्ये जर गरज लागली. तर आम्हाला थोडसं सामान्य प्रशासन विभागाकडुन विचारुन घेवुन ते करावं लागेल. आता ह्या ६० फाईलींची तपासणी हे म्हणताहेत की महिन्याभरामध्ये आम्ही करून टाकु. आता ह्या ज्या महिला आहेत जे आता तुम्ही सांगीतले की यांची ४५ वर्ष वयोमार्यादा दोन महिन्यामध्ये पुर्ण होत आहे.

**सौ.ज्योति चव्हाण :-** होय

**मा.आयुक्त :-** आता या मध्ये परवाच्या दिवशी सुध्दा याच महिला माझ्याकडे आल्या होत्या . त्याच्यामध्ये तेही कारण होतं. आता तुम्ही जर नियुक्ती दिली नाहीतर तर आमची कायमची संधी गेली. पण मुळातच नियम असा आहे की कोणत्याही कारणांन भलेही कसा का असेना जर विलंब झाला आणि ४५ वर्ष उलटुन गेले तर त्याचे नांव वेटींग लिस्ट मधुन वगळुन जातं. म्हणजेच यांची कायमचीच संधी जाते

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.

**मा.आयुक्त :-** आता हि संधी त्यांची जावु नये . त्या दृष्टीने आता आपल्याला या दोन महिन्याच्या पिरीएड मध्ये निर्णय निश्चितच घ्यावा लागेल.एक महिन्याच्या पिरिएड मध्ये उपायुक्त सांगताहेत त्याप्रमाणे याचे नियोजन पुर्ण होईल. कागदपत्रं त्यांची आपल्याकडे त्यांची आहेत.त्या संबंधी माहिती ते घेवु शकता. पण एकाच वर्षामध्ये आठ वर्षाचा बॅकलॉग भरण्याच्या संदर्भात त्यावेळेचे पर्सेटेज या वर्षाचे जे काही असेल तर ते कदाचित त्यापेक्षा जास्त जाईल.याच्यामध्ये काही तांत्रिक अडचण येत नाहीना एवढीच फक्त खातरजमा करून घेवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** साहेब याच्यामध्ये आपण ६० जागा काढलेल्या आहेत.या २०१९ पर्यंतच्या काढलेल्या आहेत.

**मा.आयुक्त :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतू आता डिसेंबर म्हणजे आता २०२० ही संपायला आलेले आहे.तर डिसेंबर २०२० पर्यंत याच्यामध्ये कमीत कमी अजुन दहा एक उमेदवार वाढु शकतात.६० च्या ऐवजी जर कधी डिसेंबर २०२० पर्यंतच जर कधी आपण वर्कआऊट केलं

**मा.आयुक्त :-** नाही जागा वाढु शकत नाहीये असे पण नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही काय झालेय साहेब या २०१९ पर्यंत आपण जर कधी वर्कआऊट केलेले आहे. तर ६० जागा आपण भरू शकतो अशी परिस्थिती आहे.

**मा.आयुक्त :-** केसेस वर डिपेंड आहे ते किती झाल्या आहेत त्यावर

**सौ.ज्योति चव्हाण :-** १०९ जण आहेत साहेब ते

**मा.आयुक्त :-** आपल्याकडे रिक्त ज्या जागा आहेत त्या ६० आहेत.

**सौ.ज्योति चव्हाण :-** १०९ ची यादी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे साधारणत: १० /१५ जागा ज्या आहेत ना जे ६० लोक पात्र होताहेत निष्कर्षात जे पर्सेटेज आहेत ५ टक्के १० टक्क्यांच जे आलेल आहे.तर डिसेंबर २०२० पर्यंत जर कधी गृहीत धरलं. तर ६० च्या ऐवजी ७० , ७२ , ७५ जागा या भरल्या जावु शकता. म्हणजे ती प्रतिक्षा यादी अजुन कमी होवु शकेल. आणि आता आपण जर कधी म्हंटल की सामान्य प्रशासनाकडे या संदर्भातील विचारणा करून की तो बॅकलॉग कॅरी फॉरवर्ड करता येतो की नाही.परंतू कॅरी फॉरवर्ड करता येत नसला. मग त्याला जबाबदार कोण म्हणजे ज्याच्या आयुष्याची संधी हिरावली गेली आणि त्याला जो कोणी जबाबदार असेल. त्याच्याबाबतीत काय आहे. हा तर अन्यायच झाला ना मग त्या व्यक्तीवर जर कधी तशी परिस्थिती उदभवली. म्हणजे पोळण्याचा हक्क हिरावण्याचा हक्क यांना दिला कोणी. वास्तविक स्वतंत्र विभाग आस्थापना विभाग आहे यासाठी दरवर्षाला होणारे शासन निर्णय आहेत.अत्यंत सगळया बाबी स्पष्ट आहेत. हा बॅकलॉग संचित होण सुध्दा चुकीच आहे.यावेळेला एखाद्या वर्षामध्ये ज्या जागा रिक्त होतात. त्या जागेच्या रिक्त होण्याच्या पुर्वी ५ टक्के नंतर १० टक्के आणि आज २० टक्के अशा पध्दतीने रिक्त जागा भरण्याच्या संदर्भातील स्पष्ट शासन निर्देश आहेत. म्हणजे मग कोणी

कर्तव्यात कसुर केली. समजा त्या जागा सामान्य प्रशासनाने नाकारल्या. तर किती कुटुंबांच नुकसान झालेले असेल.त्यांनी कुणाकडे दाद मागावी. म्हणजे कुणाच्या चुकीचा फटका कुणी का सहन करावा.

**मा.आयुक्त :-** आता याच्यामध्ये

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे माझं म्हणणं एकच आहे बघा आयुक्त साहेब कि याच्या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडुन खुलासा मागवायचा असेल. तोही बायहँड मॅसेंजर मागवुन मागवावा एक दुसरी हि संपुर्ण प्रक्रीया आज तारीख ३० आहे ३० जानेवारी पर्यंत या संदर्भातील अंतिम निर्णय तुमच्या कडुन अपेक्षित आहे.३० जानेवारीला जर कधी हा निर्णय नाही झाला. १ फेब्रुवारीला त्यांच्या सगळया कुटुंबासोबत आम्ही आपल्या दालनात बसु आणि निश्चित आपल्याला जबाबदार धरण्यात येईल साहेब त्याला कारण आता याच्यावर चर्चा हि निष्फळ आहे. कारण अनेक वेळा चर्चा झालेली आहे या सभागृहामध्ये आम्हाल, तुम्ही लँडर आहात. तुम्ही प्रशासनातील सगळया बारकाव्या जाणुन आहात.या अनुषंगाने या अपेक्षा तुमच्याकडुन आहेत. मागच्यांनी काय केलं असेल. याच्यावर चर्चा करण्यामध्ये काही अर्थ नाहीये.परंतू आज आपण सक्षम आहात.म्हणुन आपल्याकडुन हि अपेक्षा व्यक्त करतोय आणि निश्चितपणे म्हणतो कि एका महिन्यात आपण त्यांना न्याय द्यावा.अन्यथा एक महिना एक दिवसानंतर तुम्ही आणि आम्ही दालनात भेटु.

**मा.आयुक्त :-** अशी वेळ नाही येऊ देऊ आपण. कारण आपण तो मुद्दा मांडलेला आहे. सन्मा.महापौर असतील कैलास अप्पा असतील, ते सुध्दा पाठपुरावा करत आहे. या बद्दल ही दुमत नाही. परंतु आता सद्या जी केसेस पेंडींग आहे ते का पेंडींग आहे. ते थोडस बघितल पाहिजे काही वेळेस अस होत. आज जर काही अडचण असतांना ते विचार नाही केला, तर भविष्यामध्ये पुन्हा आपल्यापुढे येतो, अनियमितता, नियमबाह्य, आमच्यावर जबाबदारी नको, हे प्रकार उदभवु नये म्हणुन आपण.

**सौ.ज्योती चव्हाण :-** एक महिन्याचा वेळ आहे साहेब.

**मा.आयुक्त :-** एक महिन्याचा वेळ आहे पण आपण त्या वेळेचा सदउपयोग करु या. ती जी अडचणी मी दाखविली त्याच्यावरती अजुन आपण अंतिम निर्णयाला आलेलो नाही. एक प्राथमिक जी शंका आहे की, हे करता येईल का ? या दृष्टीने दोन दिवसापुर्वीच मी सहाय्यक आयुक्तांना सांगितलेल आहे. या संदर्भामध्ये अनुकंपाचे सामान्य प्रशासनाचे शासन निर्णय आहेत. ते सर्व उपलब्ध करु न घ्या. जर नसतील तर इतर शासकीय कार्यालयातुन घ्या कारण त्यांचे आणि आपले नियम एकच आहे. या सर्व शासन निर्णयांचा अभ्यास करुन आपण हा निर्णय घेऊ या. जर आपल्याला त्याच्यामध्ये शासनाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता नसेल. आपल्या स्तरावर आपण निर्णय घेत असलो तर मग आपल्याला अडचण येणार नाही.पण जर आपल्याला शासनाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता लागली. ती सुध्दा तातडीने हातोहात आपल्याला आणता येईल अश्या दृष्टीने तो सुध्दा आपण प्रयत्न करु.

**श्री.नितीन लढढा :-** बऱ्याच ठिकाणी काय झालेले आहे की, पुर्वीच्या फ्लॉट सिस्टीम अपार्टमेंट आहे. आता तेथे नविन कनेक्शन देतांना त्याच्या संदर्भातली पॉलिसी डिसाईड झालेली आहे किंवा नाही फ्लॅट सिस्टीमच्या बाबतीतली. आणि त्याच्यामुळे तेथे वेगवेगळया पध्दतीचे वाद उपस्थित होत आहे. आता मल्टीस्टोरी फ्लॅट सिस्टीमचा कन्सेप्ट हा आता आला.पुर्वीची जी पाच फ्लॅट सिस्टीमची असतील दहाची असेल किंवा पंधरा फ्लॅटची असेल. जेथे ऑलरेडी स्वतंत्र फ्लॉट धारकाला स्वतंत्र कनेक्शन देण्यात आलेल आहे. परंतु आज त्या संपुर्ण फ्लॉट धारकांना एकच कनेक्शन प्रोव्हाईड केल जाईल अश्या पध्दतीच्या चर्चा तेथे होतात आणि त्यातील संपुर्ण फ्लॉट धारक कुठल्या न कुठल्या अधिकाऱ्याकडे या संदर्भात विचारणा करतो. त्याच्या संदर्भातली नेमकी पॉलिसी काय ? कारण ती पॉलिसी अजुन ठरली आहे किंवा नाही ठरली आहे. आता जुन्या फ्लॉट सिस्टीम मध्ये कुठेच अंडरग्राऊड टॅनिस नाही. नविन बिल्डींग परमीशन देत असतांना समझा मोठया स्किम असतील तर तेथे त्या प्रोव्हीजन्स आहेत. परंतु गेल्या २५-३० वर्षापुर्वी झालेल्या फ्लॉट सिस्टीम मध्ये कुठल्याच फ्लॉट धारकांनी मिळुन अंडरग्राऊंड स्टोअरेज टँक केलेल असल्याने आपण म्हणु की, आपण एकच कनेक्शन देऊ, त्यात एक फ्लॉट धारक म्हणतो मला गरज नाही मी कॉन्ट्रीब्युशन देणार नाही. अश्या वेगवेगळया प्रॉब्लम त्यांच्याकडुन क्रियेट होतात म्हणुन त्यांच्यामुळे काय होत आहे. कोणी कनेक्शन तोडु देत नाही किंवा कोणी कनेक्शन जोडु देत नाही. दररोज वाद उदभवतात तर त्याच्या संदर्भातील भुमिका काय ?

**श्री.सुशिल साळुंखे :-** एक पॉलिसी अशी आहे की, एक बिल्डींग एक नळ, आता तुमच म्हणण अस्तीत्वात असलेली बिल्डींग बद्दल आहे की, नविन बिल्डींग बद्दल आहे.

**श्री.नितीन लढढा :-** अस्तीत्वात असलेल्या.

**श्री.सुशिल साळुंखे :-** आता ज्या कॉमनच्या बिल्डींगमध्ये नळ कनेक्शन अस्तीत्वात आहे. त्याच्यात आठपेक्षा जास्त जर फ्लॉट असेल. तेवढया फ्लॉटची संख्या गुनीला दोन हजार, इतके पैसे आपल्याला कमीतकमी त्या फ्लॉट धारकांकडुन मिळायला पाहिजे. त्याप्रमाणे आपण त्यांना दोन योजना देऊ. समझा. तेथे २० फ्लॉट आले तर २०X२

म्हणजे रु.४००००/- तर रु.४००००/- चे त्यांना दोन कनेक्शन घ्यावे लागतील. यासाठी आपण त्यांना नोटीसं देणे सुरु केलेले असुन एका महिन्यात त्यांनी हे सर्व करणे बंधनकारक आहे.

**श्री.नितीन लढढा :-** रु.१६०००/- तर देतील, आठ फ्लॅट धारक आहे, आठ जणे रु.१६०००/- देतील, रु.२०००/- प्रमाणे ते द्यायला तयार आहे.

**श्री.सुशिल साळुंखे :-** असे नाही. आहे म्हणजे जेवढे फ्लॅाट धारक आहे त्यांना प्रति फ्लॅाट धारकाला रु.२०००/-, असे रु.२०००/- प्रमाणे आपल उत्पन्न रु.४०,०००/- यायला पाहिजे. याप्रमाणे जर नळ कनेक्शन दिले तर एका कनेक्शनला रु.१४०००/- असे एकुण १४X२ असे रु.२८०००/-

**मा.आयुक्त :-** कनेक्शन किती देणार ? ते विचारत आहे ते.

**श्री.सुशिल साळुंखे :-** दोन कनेक्शन देणार.

**श्री.नितीन लढढा :-** आता पुर्वी पासुन तेथे आठ कनेक्शन सुरु आहे. अस्तीत्वात असलेली लाईनवर आता दोनच कनेक्शन दिल्यानंतर ते आठ फ्लॅट धारकांमध्ये भांडण होतील ना की, कोणी किती पाणी युज कराव.

**श्री.सुशिल साळुंखे :-** भाऊ, हा विषय आठ कनेक्शन असलेले धारकांसाठी नाही. ज्या बिल्डींग मध्ये आठ फ्लॅाट धारक आहे त्यांना तिथे हे संम्प करणे जरुरीच आहे.

**श्री.नितीन लढढा :-** विषय तोच आहे ना की, संमच खर्च करावा कोणी. बघा सर कस आहे माझ्या कुटुंबात १० व्यक्ती राहत आहे आणि याच्या कुटुंबात २ व्यक्ती राहत आहे. माझ्या पाण्याच्या लिफ्टींग कॅापॅसीटी पाहता, आज तेथे आठ कनेक्शन अस्तीत्वात आहे. आठ कनेक्शन अस्तीत्वात असतांना त्यांना आपण दोनच कनेक्शन दिलेले आहे. दोन कनेक्शनच पाणी कुठे जाईल एक तर अंडरग्राऊंड टॅंकला जाईल किंवा वरच्या टॅंकला जाईल.परंतु वापरावरुन भांडण होतील.कोणी किती पाणी वापरल याची निश्चिती कोणी करायची. तो म्हणेल मी दोन हजार देतो आहे. मी म्हणेल मी पण दोन हजार देतो आहे. मी पुर्वी दोन हजार द्यायचो. दहा लोकांसाठी पाणी वापरायचो. मी जास्त पाणी वापरल, याच पाणी संपल हा वाद उपस्थित करेल. अस काही धोरण ठरविलेल आहे का आपण ?

**श्री.सुशिल साळुंखे :-** अमृत मध्ये जे डायमेन्शन आहे त्याच्या प्रमाणे आम्ही केलेल आहे.

**श्री.नितीन लढढा :-** तर अस काही धोरणात्मक प्रस्ताव सभागृहासमोर तुम्ही आणला का कधी ?

**श्री.सुशिल साळुंखे :-** आणु ना.

**श्री.नितीन लढढा :-** आणु म्हणजे काय. पहिले तुम्ही इम्प्लीमेंटेशन करतात. पहिले तुम्ही अंमलबजावण्या करतात. लोकांनी कनेक्शन घेतलेले आहे ना. फ्लॅट धारकांचे कनेक्शन आज गणेश कॅालनीचाच म्हणतो मी. गिताशंकर अपार्टमेंट आहे. गिताशंकर अपार्टमेंट मध्ये नविन नळ जोडणीच्या संदर्भात हाच वाद उदभवत आहे.माजी महापौरांचा वार्ड आहे तो.माजी उपमहापौरांचा वार्ड आहे तो. परंतु तेथे हेच वाद होतात. परंतु जो पर्यंत तुमची पॅालिसी ठरत नाही. मग तुम्ही त्याच आज कनेक्शन कट करुन टाकाल का ?

**श्री.सुशिल साळुंखे :-** भाऊ, हा विषय अमृतच्या जोडणीसाठीच आहे फक्त, त्यात कुठलही दुमत नाही ते चालु राहणार आहे.

**श्री.नितीन लढढा :-** पण अमृतच्या या पॅालिसीला ठरविणेच्या संदर्भात तुम्ही प्रस्ताव करुन धोरणात्मक निर्णय का मागविला नाही आता पर्यंत. आज मला सांगा शहरात ५०% च्या जवळपास काम झालेल आहे.

**मा.आयुक्त :-** अमृतमध्ये जे ऐक्जीस्टींग कनेक्शन आहे त्यांना प्रॅाब्लम नाही. फक्त भविष्यामध्ये जे काही नविन कनेक्शन येणार आहे त्याच्या बाबतीत आम्ही म्हणत आहोत. तर याची काही धोरण आपल्याला ऐक्जीस्टींग किंवा भविष्यामध्ये अमृतच्या लाईनी जोडण्याच्या संदर्भात आहे. एक आपण पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊ या. त्याच्यामध्ये आपल जे काही पर्सनल धोरण आहे किंवा जे काही आपण नोटीसी दिल्यात. त्याच्या अनुषंगाने चर्चा करु .आणि सर्वांना मान्य असेल तसे करुन ठरवुन घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** त्याच्याने काय होत आहे आज. नागरीक त्रस्त होत आहे ना.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नितीन भाऊ मी आता नाही. खासदार साहेबांनी जेव्हा मिटींग घेतली होती तेव्हाही मी हेच प्रश्न उपस्थित केले होते.कारण माझ्या वार्डामध्ये जो प्रॅाब्लम यायचा कनेक्शनच्या वेळेस, कारण अपार्टमेंटवाल्यांना दिल जायचे ते. त्यावेळेला मी साहेबांना व्यक्तीश: फोन करुन पण विचारल होत. आणि दोन तीनदा सभेमध्ये ही विचारल.

**मा.आयुक्त :-** आपण या दोन तीन दिवसांमध्ये सगळया पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करु .

**श्री.नितीन लढढा :-** पण कस आहे सर, पॉलिसी ठरली तर कमीत कमी आम्हाला नागरीकांना समजविण पण योग्य राहत.आम्हालाही समजत ते. त्याच्यामधुन काय अडचण निर्माण होत असतील.त्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीकोणातुन पॉलिसीमध्ये पण आपण फेरबदल करु शकतो.

**मा.आयुक्त :-** या दोन तीन दिवसांमध्ये बैठक आयोजित करण्याची व्यवस्था करा.

**श्री.सुशिल साळुंखे :-** यामध्ये ८ च्यावर जर फ्लॅाट असेल तर अडचण निर्माण होते.

**मा.आयुक्त :-** या सर्व चर्चा आम्ही त्या वेळेला करु.

**नगरसचिव :-** संविदांची माहिती घेतली ना कुलभुषण भाऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हो घेतली.

**नगरसचिव :-** नवनाथ भाऊ, किशोर भाऊ माहिती घेतली ना.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हो घेतली.

**श्री.किशोर बाविस्कर :-** हो घेतली.

**नगरसचिव :-** नितीनभाऊ, माहिती घेतली ना संविदांची

**श्री.नितीन लढढा :-** हो, घेतली.कुलभुषणभाऊच्या भुमिकेला समर्थन आहे माझ.

**मा.आयुक्त :-** माहिती घेतली म्हणण्या ऐवजी सविस्तर माहिती घेतली अस म्हणा.

**नगरसचिव :-** या संदर्भात सन्मा.स्थायी समिती सदस्या श्रीमती सैईदाबी शेख युसुफ यांच मा.सभापती महोदय यांच्याकडे एक पत्र प्राप्त झालेल आहे. सदर पत्रावर नगरसचिव यांना सदर सभेत पत्राचे वाचन करावे इतिवृत्तात नोंद घ्यावी असे सन्मा.सभापती यांचे निर्देश झालेले आहे. सदर पत्रामध्ये विषय क्र.१४ मधील १,२,३,४,६,७,८ या संविदांना विरोध असुन नामंजुर असल्याबाबत असे नमुद केलेल आहे आणि या ज्या संविदा आहे. मी नामंजुर करीत आहे. तरी कृपया आजच्या महासभेत म्हटलेल आहे त्यांनी स्थायी समिती सभापतींना त्यांनी ॲडरेस केलेल आहे. उपरोक्त विषयाबाबत माझे अधिकृत विरोधाची नोंद घेण्यात यावी. अस त्यांनी पत्रात नमुद केलेल आहे.

सन्मा.स्थायी समिती सदस्या श्रीमती सैईदाबी शेख युसुफ यांचे दिलेले पत्र खालील प्रमाणे

जळगांव शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा क्र.३९ आज दि.३०/१२/२०२० रोजी ठेवण्यात आलेली आहे. या सभेच्या संदर्भिय सुचनेनुसार विषय क्र.१४ मधील पोट विषय क्र.१,२,३,४,६,७ आणि ८ हे लोकहिताचे नसुन मला मान्य नाही म्हणुन उपरोक्त विषय मी नामंजुर करीत आहे. तरी कृपया आजच्या स्थायी समिती सभेत उपरोक्त विषयांबाबत माझ्या विरोधाची अधिकृत रित्या नोंद घेण्यात यावी ही विनंती.

**नगरसचिव :-** तद्नंतर दि.२९/१२/२०२० रोजी सन्मा.स्थायी समिती सदस्य श्री.किशोर रमेश बाविस्कर यांचे मा. सभापती महोदय, स्थायी समिती यांच्या नावे पत्र ॲडरेस झालेल आहे. त्याची प्रत माहितीसाठी नगरसचिव यांना मिळालेली होती.सदर पत्र मा.सभापती यांच्याकडे अवलोकानार्थ नगरसचिव यांनी सादर केलेले आहे. सदर पत्रामध्ये सुध्दा सन्मा.सदस्य श्री.किशोर रमेश बाविस्कर यांनी या ठिकाणी संविदा जो आहे. संविदांच्या संदर्भात भविष्यात ऑडीट ऑब्जेक्शन निघाल्यास रिकव्हरी स्थायी समिती सदस्य म्हणुन आपणांवर व समितीच्या सदस्यांवर येणार नाही याची दक्षता आपण जबाबदार सभापती या नात्याने घ्यावी व सदर विवादीत संविदा बद्दल प्रशासनाकडुन जो पर्यंत समाधानकारक लेखी खुलासा येत नाही तो पर्यंत पटलावर घेऊ नये व आजच्या सभेत सदर संविदा तहकुब ठेवावा व माझा लेखी आक्षेप पटलावर नोंदवावा

सन्मा.स्थायी समिती सदस्य श्री.किशोर रमेश बाविस्कर यांचे दिलेले पत्र खालील प्रमाणे

मी स्थायी समितीचा नविन सदस्य असुन माझी आज रोजी दि.३०/१२/२०२० ही Offline (ऑफलाईन) पहीलीच स्थायी समितीची सभा आहे, ही सभा सभागृहात आयोजित करण्यात येणार असुन मी अजेंडा वरील विषय क्र.१४ मधील संविदा क्र.१,२,३,४,५,६,७,८ बाबत मला शंका वाटत असुन मी स्थायी समिती सभापती व आयुक्त साहेब, महापौर महोदया, उपमहापौर साहेब, नगरसचिव यांना माहितीसाठी पत्र देत आहे. मला माझ्या प्रश्नांचे जो पर्यंत लेखी स्वस्प्रात समाधानकारक खुलासा मिळत नाही तो पर्यंत विषय क्र. १४ संविदा क्र.१,२,३,४,५,६,७,८ हा विषय तहकुब ठेवावा. मागील माजी सभापती ॲड.सौ.शुचितात‍ाई हाडा व मागील विद्यमान स्थायी समिती सदस्य यांनी प्रशासनाला वेळोवेळी संविदा बद्दल लेखी खुलासा मागीतलेला होता तो आजपर्यंत समाधानकारक खुलासा मिळाला नाही. मला खालील प्रश्नांचा खुलासा मिळावा. १) माहे मार्च, एप्रिल,मे, जुन या दरम्यान दैनंदिन रस्ते व गटार साफसफाई करीता कामगार पुरविणे करीता आरोग्य विभागाकडील विना निविदा केलेले काम हे कायदेशीर रित्या नियमीत आहे का ? २)बांधकाम विभागाकडील मजुर निविदा प्राप्त ठेकेदार यास आरोग्य विभागाकडील कामगार पुरवठा करण्याचे काम विना निविदा देणे हे कायदेशीर रित्या नियमित आहे का ? ३) बांधकाम विभागाकडील काम करण्याकरीता निकष लावलेले कामगार आणि आरोग्य विभागाकडील काम करण्याकरीता

निकष लावलेले सफाई कामगार यांची कार्यपध्दती जबाबदारी ही एकच आहे का ? ४) सदर बांधकाम विभागाकडील मजुर पुरविणेसाठी मंजुर असलेल्या ठेकेदारास फक्त ९ मजुर पुरविणेसाठी कार्यादेश असतांना किमान ६०० व ७०० आरोग्य विभागाकडील सफाई कामगार ते कायदेशिर रित्या उपलब्ध करुन देऊ शकतात का ? सदर विषयी कायदेशीर रित्या खात्री केलेली आहे का ? ५) वॉटर ग्रेस कंपनीला दिलेला सफाई ठेका हा रद्द झालेला नसल्याने त्यांचे कार्य असमाधान कारक असल्याने प्रशासनाने त्याचे अधिकारात घेतलेल्या हा निर्णय कायदेशीर रित्या योग्य नियमित आहे का ? ६) सदर कामाकरीता झालेला खर्च हा वॉटर ग्रेस मक्तेदाराकडील देय रक्कमेतुन सुरक्षा ठेवी मधुन वसुल करणेबाबत आरोग्य विभागाने दक्षता घ्यावी अशी प्रशासनाची टिपणी आहे. त्यानुसार सदर रक्कमेची वसुली होईल का ? नसल्यास सदर रक्कमेची वसुली करण्याकरीता प्रशासनातील जबाबदार अधिकारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा यांची तपशिलवार माहिती मिळावी. ७) सदर ठेकेदाराने सफाई कामगारांचे नियमानुसार सर्व वेतन भत्ते वगैरे नियमित पणे भरल्याबाबतची आपलेकडुन लेखी माहिती मिळावी तसेच नसल्यास संबंधीत अधिकारी कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर काय कार्यवाही करणार या बद्दल तपशिलवार माहिती मिळावी. ८)सदर विषय विना निविदा केलेला स्थायी समितीपुढे माहितीस्तव आणणे मा.आयुक्त यांना बंधनकारक आहे का ? नसल्यास सदर विषय स्थायी समितीपुढे का आणला याचा खुलासा करावा असल्यास सदर विषयाचे आर्थिक जबाबदारी कोणाची या विषयी लेखी खुलासा करावा. ९) सदर विषयास अनियमितता झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील का? १०) महानगरपालिका मधील एखाद्या विशिष्ट विभागातील काम निविदा प्रक्रिया राबवुन एखादे मक्तेदारास दिल्यानंतर त्याच मक्तेदारास इतर विभागातील काम विना निविदा देता येईल का ? या ठिकाणी पारदर्शकताचा नियमभंग होत नाही का? तरी देखील आपल्या माजी सभापती सौ.शुचिता हाडाताई व स्थायी समितीचे माजी सदस्य यांनी वेळोवेळी देखील सगळा पत्र व्यवहार अवगत करुन सुध्दा, आपण वादातील संविदा अजेंडयावर घेतल्याचे दिसुन येत आहे. याची मला खंत वाटत आहे. संविदाची एकुण रक्कम रु .२,५८,९३,३६९/- प्रशासनाने नियम बाह्य रित्या करुन टाकलेली आहे. तरी सदरील संविदा पोटी दिलेल्या रक्कमेची भविष्यात ऑडीट ऑब्जेक्शन निघाल्यास रिकव्हरी स्थायी समिती सदस्य म्हणुन आपणावर व समिती सदस्यांवर येणार नाही याची दक्षता आपण जबाबदार सभापती या नात्याने घ्यावी व सदर विवादीत संविदा बद्दल प्रशासनाकडुन जो पर्यंत समाधानकारक लेखी खुलासा येत नाही तो पर्यंत पटलावर घेऊ नये व आजच्या सभेत सदर संविदा तहकुब ठेवावा व माझा लेखी अक्षेप पटलावर नोंदवावे ही विनंती.

**श्री.नितीन लढढा :-** झाल ना आता गोराणे साहेब, निर्णय झाला सदस्यांनी चर्चा करुन झाली.

**श्री.कुलभुषण पाटील :-** निर्णयसाठी होतच नाही ते.

**नगरसचिव :-** सन्मा.सभागृहाला अवगत करण माझ कर्तव्य आहे. मी अवगत केलेला आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सर एक छोटासा विषय होता, साहेब माझ्या वार्डामध्ये एक काम आहे २५ कोटी अंतर्गत वायर आणि स्ट्रीटपोल उभे करण्याच एक काम रविंद्र चौधरी असे काही तरी कॉन्ट्रॅक्टरला दिलेल होत. तर साहेब तेथे २०-२५ वर्षापासुन स्ट्रीट लाईटच नाही, खंडेराव नगर मध्ये, तर ते आपला २५ कोटीतला ते काम केला गेला, तेथे पोल उभे पण केले, तसे फेज वायर पण ओढल्या गेल्या. परंतु साहेब त्या कॉन्ट्रक्टरने ते स्ट्रीट लाईटचे जे कन्डक्टर आहे त्या क्रॉस पध्दतीने टाकल्याकारणाने मागील दिड वर्षापासुन ते काम होऊन देखील तेथे आपल्याला स्ट्रीट लाईट लावता येत नाही. म्हणजे स्ट्रीट कन्डक्टर इतक्या क्रॉस पध्दतीने टाकलेल आहे की, जर तेथे लाईट लावायला म्हटले फेज वायरला टाकुन तर पुर्ण खंब्यांमध्ये ते करंट उतरेल.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री.एस.एस.पाटील :-** सन्मा.सभापती, आपले त्या ठिकाणी पुर्वी स्ट्रीट लाईट कन्डक्टर होते, स्ट्रीट फेज होते, स्ट्रीट लाईट सुध्दा होते. मग महावितरण कंपनीकडुन ते कन्डक्टर वगैरे सगळे निष्कासीत करण्यात आलेले होते. कारण त्या ठिकाणी त्यांची एक तक्रार अशी होती खंडेराव नगर मध्ये विज चोरीमुळे त्यांनी ते कन्डक्टर काढुन टाकले होते. नंतर नगरीकांची मागणी व तेथील सदस्य जे होते वेळोवेळी त्यांची मागणीनुसार आपण त्याठिकाणी पुर्ण खंडेराव नगर मध्ये स्ट्रीट लाईट फेज ओढण्याकरीता २५ कोटी निधीतुन आपण ते प्रस्तावीत केल. २५ कोटी निधी मधील आपण काही काम केलेल आहे पुर्ण जळगांव शहरात, खंडेराव नगर मध्ये, ते महावितरण कंपनीच्या सुपरव्हिझन मध्ये आपण हे काम केलेल आहे. ते जे आपण कन्डक्टर ओढण्याच काम केलेल आहे. ते त्यांच्या अंदाजपत्रकानुसारच केलेल आहे. त्यांच्या सुपरव्हिझन मध्ये आपण हे काम केलेल आहे. आणि जे काही आपण कन्डक्टर ओढण्याच काम केलेल आहे. हे त्यांच जो तेथील सुपरव्हिझन अधिकारी आहे, तेथील इंजिनिअर आहे संबंधीत त्यांच्या सुपरव्हिझन मध्येच केलेल आहे. त्यांनी त्याच कंम्पलीशन रिपोर्ट सुध्दा आपल्याला दिलेला आहे. आणि त्याच्यानंतर खंडेराव नगर मध्ये, महावितरण कंपनी मार्फत एक स्कीम मध्ये, ती जी स्कीम आहे त्यांची स्वत:ची, त्यात त्यांनी केबल ओढण्याच काम करुन दिलेल आहे. त्यावेळेला संबंधीत सदस्यांनी

याच्या संदर्भात सांगितल होत. त्यावेळेला संबंधीत इंजिनिअरला ही मी सांगितल तुम्ही तुमच्या स्कीम मध्ये काम करत आहे केबल टाकुन तुम्ही तुमच चालु ठेवा परंतु आम्ही आज २५ कोटीच्या शासकीय निधीतुन काम केलेल आहे. त्या ठिकाणी आपला आजही स्ट्रीट लाईट कनेक्शन आहे. आम्हाला पर स्ट्रीट लाईट कनेक्शन जे आहे ते आम्हाला चार्ज करुन द्या. आम्हाला त्याच्यावरती स्ट्रीट लाईटची व्यवस्था करायची आहे. त्यांनी फक्त एक वेळेला आपल्याला सांगितल होत की, आमचही स्कीम मध्ये काम चालु आहे तुम्ही थांबा, त्या गोष्टी करीता २ -३ महिने आपण थांबलो, परंतु संबंधीत इंजिनियरने रिजेक्ट केल्यानंतर, त्यांचे जे कार्यकारी अभियंता आहे त्यांच्या लक्षात ही बाब आणुन दिली. आणि त्या कार्यकारी अभियंत्यांनी ही सांगितल की, २-३ महिन्यात मी काम पुर्ण करुन देतो. आणि तुमचा जो स्ट्रीट लाईट आहे हा आम्ही तुम्हाला चालु करुन देऊ. त्या ठिकाणी तुम्ही स्ट्रीट लाईट पथदिवे बसविण्याची व्यवस्था करु शकता. आता त्यांच्या कार्यकारी अभियंत्यांपर्यंत आपण गेलेलो आहे. या १५ दिवसापासुन त्यांच्याकडुन कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तर याच्या संदर्भात अधिक्षक अभियंताकडे संबंधी इंजिनिअरबाबत आपण तक्रार करण्याची आपण प्रोव्हीजन करु.

**श्री.कुलभुषण पाटील :-**साहेब जस आपण सांगितल तर यांना आणि तिथले आपले लाईट विभागाचे कर्मचारी यांना सर्वांना घेऊन सर्व्हे करा. त्या एम.एस.ई.बी. वाल्यांच म्हणण आहे की, आम्हाला ज्या वेळेस हे स्ट्रीट लाईट आणि वायर ज्यावेळेला टाकले, आमच्या सुपरव्हिजनात टाकलेच नाही. यांनी आम्हाला बोलविलेच नाही. मग मी आपल्या कर्मचाऱ्यांना विचारल, त्यांनी म्हटल, हो, यांना आम्ही त्या वेळेस बोलविल नव्हत पण याच्या कानावर टाकल होत, म्हणजे साहेब ते येतील का आपल्यासाठी, आपण त्यांना फक्त सांगुन दिल म्हणजे आपल काम झाल का ? त्यांच्या ऑब्जर्वेशन मध्ये हे काम झालेल नाही. दुसरी गोष्टी ज्या वेळेस ते स्ट्रीट वायर आणि पोल टाकण्याच काम चालु होत त्यावेळेला आपले महानगरपालिकेचे इंजिनिअर आणि कर्मचारी देखील नव्हते. साहेब जर ते राहिले असते तर मला सांगा क्रॉस कन्डक्टर टाकतांना कॉन्ट्रॅक्टर क्रॉस कन्डक्टर टाकतो आहे. त्यावेळेला आपला जर टेक्नीकल माणुस राहिला असता तर त्यानी त्या वेळेलाच थांबविल असत की, तु हे क्रॉस टाकत आहे, याच्याने पोलमध्ये करंट उतरेल आणि पथदिवे लावता येणार नाही. साहेब ही सर्वस्वी जबाबदारी कोणाची होती. फक्त सुपरव्हिजन करण्याची गरज होती ना. मी त्या वेळेस देखील त्यांना सांगितल होत. ते म्हणे आम्ही उभे राहुन काम करतो आहे. त्यावेळेला मोरे होते, मला वाटत बाबा साळुंखेंकडे काम होत. मी त्यांच्या पण कानावर हा विषय टाकला होता. साहेब दिड वर्ष होऊन गेल काम होऊन जर साहेब आपण त्या विकास कामासाठी उपाययोजना करतो आहे. जर ते कामच होत नाही उपयोगच होत नाही तर फायदा काय त्या विषयाला. दिड वर्ष झाले साहेब ते पोल आणि वायर टाकुन फक्त ७०-८० हजाराचा खर्च आहे ते कन्डक्टर बदलविणेसाठी. मला एकच सांगायच आहे आता स्ट्रीट कन्डक्टर क्रॉस टाकल्यामुळे आपण तेथे पथदिवे लावु शकत नाही. त्यांची ती दिवाळीपण आंधारात गेली आणि त्यांचे सगळे सण आंधारात गेले. म्हणजे दिड वर्षापासुन हो खेळ चाललेला आहे साहेब.

**मा.आयुक्त :-** आता आपल्याला किंवा एम.एस.ई.बी.ला काय केल पाहिजे ते करा आणि ते स्ट्रीट लाईट चालु करा.त्यांच म्हणण आहे की, कन्डक्टर जे जोडले गेलेले आहे ते चुकीचे जोडले गेलेले आहे म्हणुन अडचण आहे.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री.एस.एस.पाटील :-** सर आता स्ट्रीट लाईट लावायचे जे हे काम आहे. हे आपण एम.एस.ई.बी ने हे काम हे त्यांच्या सुपरविजन मध्ये काम केलं गेलेल आहे. त्यांनी कॉन्ट्रॅक्टरला काम दिलेल आहे , त्या कॉन्ट्रॅक्टरने काम केलेलं आहे.आता याचे जे कंप्लीशन आहे त्यांचा जो कंप्लीशन रिपोर्ट आहे. म्हणजे त्यांनी पुर्ण केलेले आहे आणि

**श्री.कुलभुषण पाटील :-** चुकी तुमची का त्यांची ? हे त्यांच्या आंगावर ढकलत आहे ते यांच्या आंगावर ढकलत आहे. या ढकलाढकलीमुळे हे काम करता येत नाही साहेब.

**मा.आयुक्त :-** आपल्या इंजिनिअरची चुक आहे की, कॉन्ट्रक्टरांची चुक आहे. जर काही असे प्रॉब्लम असेल तर आपल्या कॉन्ट्रॅक्टरकडुन ती दुरुस्त करुन घ्या.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री.एस.एस.पाटील :-** त्यांचे कार्यकारी अभियंतानेही आम्हाला काय सांगितल होत की, आमच फक्त २-३ महिन्यात केबल टाकण्याच काम झाल की, करतो, एक वर्षापासुन ते काम दिलेल आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** दिड वर्ष झाल ते तेच सांगत आहे, साहेब, मला सांगा, जर आपल्या कर्मचारीची चुक नसती. साहेब सादा विषय आहे जर आपल्या ऑब्जर्वेशन मध्ये काम झाल असत पण चुकीने झाल, याचा अर्थ काय की, आमच्या ऑब्जर्वेशन मध्ये काम झाल पण चुकीने झाल. हे मान्य करुन घेत आहे.

**मा.आयुक्त :-** आता हे दुरुस्ती होऊन चालु कधी होणार ते सांगा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब, हे तत्काळ सुरु करण्यात याव ही विनंती आहे साहेब.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री.एस.एस.पाटील :-** साहेब याच्या संदर्भात कार्यकारी अभियंतांशी बोललो आहे मी, त्यांच्या युनिट इंजिनिअरने इन्स्ट्रक्शन दिलेल्या आहेत.साधरणता आपण त्यांच्याकडुन पाठपुरावा करु न १५ ते २० दिवसामध्ये काम करुन घेऊ या.

**मा.आयुक्त :-** मी त्यांच्या इंजिनियरशी बोलतो, तुम्ही कॉन्ट्रक्टरला सांगा, आपण त्यांना दोष देणे आणि त्यांनी आपल्याला दोष देणे याच्याने नागरीकांची अडचण दुर होणार नाही. मी त्यांच्याशी बोलतो आणि हा विषय मार्गी लावतो.

**सौ.ज्योती चव्हाण :-** तीच परिस्थिती रायसोनी नगर मध्येपण आहे. तेवढ बघा. तेथे पोल आहे लाईट नाही.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री.एस.एस.पाटील :-** तेथील काम केलेल आहे आपण स्ट्रीट लाईटच.

**सौ.ज्योती चव्हाण :-** तेथे पण हीच परिस्थिती आहे बघुन घ्या.

**मा.सभापती :-** या आधी आपण सार्वजनिक शौचालयावर खुप चर्चा केली. मी आता शनिवारी आणि रविवारी आपल्या घरपट्टी संदर्भात प्रत्येक प्रभाग समितीमध्ये भेट दिली आढावा घेण्यासाठी. आणि त्याठिकाणी असलेल्या समस्या सुध्दा जाणुन घेतल्या. तर प्रभाग समिती क्र.०४ या ठिकाणी आपली जी घरपट्टी भरणा खिडकी आहे. त्याच्या शेजारी शौचालय आहे. त्या शौचालयाचे सर्व दरवाजे तुटलेले आहे. आणि नागरीक तेथेच उघडयावरती करतात. आणि त्याची येणारी दुर्गंधींचा त्रास येणाऱ्या नागरीकांना होतो. त्या ठिकाणी माता-बघिणीं तेथे घरपट्टी भरणा करणेसाठी येत असतात. तर आपण लवकरात लवकर हे सर्व शौचालय प्रभाग समितींमध्ये दुरुस्ती करण्यात याव्या. तसेच तेथे ज्या इमारती आहे त्या गळत आहे. मला वाटत १५ ते २० वर्षाच दप्तर आपला त्या ठिकाणी आहे. तर त्याची अवस्था आपले जे संबंधीत असतील त्यांनी बघाव. वरतुन पाणी पडल, त्या पाण्यातुन ते दप्तर खराब झाले. आणि ते महत्वाचे कागदपत्र आहेत. त्याची काळजी घेणे आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे. एकतर त्या इमारती दुरुस्त करा किंवा त्या इमारती डिमॅलिश करुन तेथे नविन इमारती बांधण्यात यावी. अस सर्वांना सुचित करण्यात येत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** आता तुम्ही प्रत्येक प्रभाग समितीला भेट द्याल आणि नागरीकांच्या भेटी घ्याल. त्यावेळेस नागरीकांचा गेल्या सहा महिन्यापुर्वी आपण एक ठराव केला आहे की, ५०% घरपट्टी मध्ये सुट देण्याच्या संदर्भातला, तर त्या ठरावाच्या प्रती नागरीक घेऊन येतील की, याच काय झाल. त्याच्या बद्दल तुम्हाला काही तरी एक उत्तर तयार करु न ठेवाव लागेल. तो आपण मान्य ही केलेला आहे ठराव.

**श्री.कुलभुषण पाटील :-** विखंडनाला पाठवुन दिलेला आहे तो, आहे ना उत्तर आहे ना.

**श्री.नितीन लढढा :-** मग ठराव करायचाच कशासाठी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र./आरोग्य/०३/ दि.१६/०५/२०२० अन्वये दि.१६/०५/२०२० ते दि.१४/०६/२०२० पावेतो कोविड केअर सेंटर मधील रुम आणि शौचालय, बाथरुम, पॅसेज व परिसर स्वच्छ ठेवणे कामी प्रती दिवस ५० कामगार पुरवणे कामी मक्तेदार मे.एस.के.कॉन्ट्रक्टर,जळगांव यांचे बांधकाम विभागाकडील मंजूर दरानुसार दर स्विकारुन रक्कम रु.७,८०,०००/- मात्र खर्चाची संविदा.
२. प्रशासकीय आदेश क्र./आरोग्य/०४/ दि.२९/०५/२०२० अन्वये दि.०१/०६/२०२० ते ३०/०६/२०२० पर्यंत घनकचरा व्यवस्थापनाची कामे करण्यासाठी प्रती दिन २५० कामगार, प्रती कामगार खर्च रक्कम रु. ५२०/- प्रमाणे एकूण ३० दिवसांचे कालावधीसाठी कामगार पुरवणे कामी मक्तेदार मे.एस.के.कॉन्ट्रक्टर,जळगांव यांचे मंजूर दरानुसार दर स्विकारुन रक्कम रु.३९,००,०००/- मात्र खर्चाची संविदा.
३. प्रशासकीय आदेश क्र./आरोग्य/०५/ दि.२९/०५/२०२० अन्वये दि.०१/०६/२०२० ते ३०/०६/२०२० पर्यंत दैनंदिन रस्ते व गटार साफ सफाई करिता प्रती दिन ४०० कामगार, प्रती कामगार खर्च रक्कम रु. ५२०/- प्रमाणे एकूण ३० दिवसांचे कालावधीसाठी कामगार पुरवणे कामी मक्तेदार मे.एस.के.कॉन्ट्रक्टर,जळगांव यांचे बांधकाम विभागाकडील मंजूर दरानुसार दर स्विकारुन रक्कम रु.६२,४०,०००/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र./आरोग्य/०६/ दि.१७/०६/२०२० अन्वये कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढत असून शहरात बाधित रुग्णांची संख्या वाढत असल्याने अशा रुग्णांना स्वतंत्र रित्या उपचार करणे कामी स्थापन केलेल्या कोविड केअर सेंटर मधील रुम आणि शौचालय, बाथरुम, पॅसेज व परिसर स्वच्छ ठेवणे कामी दि.१५/०६/२०२० ते दि.१४/०७/२०२० पर्यंत प्रती दिवस ५० कामगार पुरवणे कामी मक्तेदार मे.एस.के.कॉन्ट्रक्टर,जळगांव यांचे बांधकाम विभागाकडील मंजूर दरानुसार दर स्विकारुन रक्कम रु.७,८०,०००/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./१२/ दि.२९/०५/२०२० अन्वये जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर तीन ठिकाणी सुरक्षा रक्षक पुरविणे कामाच्या मंजुर दरात शासकीय तंत्रनिकेतन, आवारात आवश्यक त्याठिकाणी सुरक्षा रक्षक पुरविणे कामी मक्तेदार शिवा सिक्युरिटी सर्व्हीसेस,जळगांव यांचे मंजुर दर स्विकारुन रक्कम रु.१६,७१,७६८/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र./आरोग्य/०७ दि.३०/०६/२०२० अन्वये दि.०१/०७/२०२० ते दि.३१/०७/२०२० पर्यंत दैनंदिन रस्ते व गटार साफ सफाई करिता प्रती दिवस ४०० कामगार पुरवणे कामी मक्तेदार मे.एस.के.कॉन्ट्रक्टर,जळगांव यांचे बांधकाम विभागाकडील मंजूर दरानुसार दर स्विकारुन रक्कम रु.६४,४८,०००/- मात्र खर्चाची संविदा.

७. प्रशासकीय आदेश क्र./आरोग्य/०८ दि.३०/०६/२०२० अन्वये दि.०१/०७/२०२० ते दि.३१/०७/२०२० पर्यंत दैनंदिन घनकचरा संकलन व वाहतूक करणारे घंटागाडी, ट्रॅक्टर, डंम्पर, स्किप लोडर व कॉम्पॅक्टरवर २८० मजूरांचा पुरवठा करणे कामी मक्तेदार मे.एस.के.कॉन्ट्रक्टर,जळगांव यांचे मंजूर दरानुसार दर स्विकारुन रक्कम रु.४५,१३,६००/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र./आरोग्य/०९ दि.१५/०७/२०२० अन्वये कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढत असुन शहरात बाधित रुग्णांची संख्या वाढत असल्याने अशा रुग्णांना स्वतंत्र रित्या उपचार करणे कामी स्थापन केलेल्या कोविड केअर सेंटर मधील रुम आणि शौचालय, बाथरुम, पॅसेज व परिसर स्वच्छ ठेवणे कामी दि.१५/०७/२०२० ते दि.१४/०८/२०२० पर्यंत प्रती दिवस १०० कामगार पुरविणे कामी मक्तेदार मे.एस.के.कॉन्ट्रक्टर जळगांव यांचे मंजूर दरानुसार दर स्विकारुन रक्कम रु.१५,६०,०००/- मात्र खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्र./८४ दि.१९/११/२०२० अन्वये वार्ड क्र.१३ मधील मेहरुण स.नं.४१५ ओपनस्पेसला चेनलींग फेन्सींग करणे कामी मक्तेदार श्री.पी.एस.कुमावत,जळगांव यांचे वाटाघाटी अंती निविदा रकमेवर ३% जास्तीचे दर स्विकारुन रक्कम रु.९,८१,७६३/- मात्र खर्चाची संविदा.

१०. प्रशासकीय आदेश क्रं.९० दि.०९/१२/२०२० अन्वये जळगांव शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागा अंतर्गत सन २०२०-२१ या वर्षाकरिता वार्षिक पाणी वितरण व्यवस्थेतील नादुरुस्त व्हॉलचा दांडा व मणी दुरुस्ती कामी स्पेअर पार्टस नमुन्याप्रमाणे तयार करुन पुरविणे कामी मक्तेदार रेवती इंजिनिअरींग वर्क्स,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेवर ११% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.४,४२,३३०/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्रं./सा.बा./८७ दि.१५/१२/२०२० अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.०८ निमखेडी शिवार १९/३अ+९८/१+२ विठ्ठलवाडी येथे महानगरपालिका मालकीच्या खुल्या जागेस चेनलिंक फेन्सींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०.६६% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१३,२२,७२२/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

उपरोक्त संविदा क्रं.१,२,३,४,६,७,८ संदर्भात भविष्यामध्ये लेखापरिक्षणात काहीएक आक्षेप निघाल्यास किंवा कायदेशीर बाबी उपस्थित झाल्यास त्यास स्थायी समितीतील सदस्य जबाबदार राहणार नाहीत त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- १२** **प्रतिकुल मते :- ०१**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**